# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ३१.०३.२०१२

**दि.३१.०३.२०१२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

११

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक ३१/३/२०१२ रोजी ५.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. लाल देवनदास पंजाबी | सभापती |
| २ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | सदस्य |
| ३ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ४ | श्री. सुंदर (बाबु) आसनदास मंगतानी | सदस्य |
| ५ | श्री. बी.बी. मोरे | सदस्य |
| ६ | श्रीमती ज्योती शाम माने | सदस्या |
| ७ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) आयलानी | सदस्य |
| ८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे | सदस्य |
| ९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१.श्री. जीवन (राजु) चंद्रभान इदनानी, २.श्री. धनंजय बाबुराव बोडारे, ३.डॉ. निना प्रकाश नाथानी, ४.श्री. म्हस्के निवृत्ती अंकुश, ५.श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी, ६.श्रीमती संगिता राजेश कंडारे, ७.श्रीमती शिला सुभाष मनसुलकर

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. विजयकुमार मसाळ, उप—आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
५. डॉ. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
६. श्री. प्रल्हाद होगेंपाटील, नगररचनाकार
७. श्री. एम.जी गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
९. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१०.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
११. श्री. रमेश काजळे, उप कर निर्धारक व संकलक
१२. श्री. बबीश गंगारामानी, उप—अभियंता, विद्युत
१३. श्री. सी.आर.पवार, लिपिक, भाडांर विभाग
१४. श्री. राजेश घनघाव, लिपिक, मालमत्ता विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीम.नर्गिस खान

श्री. विजयकुमार मसाळ, उप–आयुक्त मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

सायंकाळी ६.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ३१/१२/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:–**मागील सभेचे दिनांक ३१/१२/२०११ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ३१/१२/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. सुंदर मंगतानी

**स्थायी समिती ठराव क्र. :–** १४१अ

**दिनांक : ३१/०३/२०१२**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ३१/१२/२०११ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :–** उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत, निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये, व मतमोजणी केंद्र येथे कायम स्वरुपी व किरकोळ दुरुस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य पुरविणेकामी मे. जकनुश मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित यांच्याशी केलेल्या सविदेंस कार्योत्तर मंजुरी देणे.

---

**काही सदस्य:–** विषय क्र. २,३,५ व ६ हे धोरणात्मक निर्णयाचे नाहीत त्यामुळे हे विषय पारीत केले जावेत विषय क्र. १० नाकारले जावे, कारण महापालिकेने स्वत:चे वाहन उपलब्ध करुन घेतले आहे व बाकी उर्वरित विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळले जावेत.

**सभापती, श्री. लाल पंजाबी:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :–** उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत, निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये, व मतमोजणी केंद्र येथे कायम स्वरुपी व किरकोळ दुरुस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य पुरविणेकामी मे. जकनुश मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित यांच्याशी केलेल्या सविदेंस कार्योत्तर मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकाच्या सार्वत्रिक निवडणुक जाहिर झाल्याने निवडणुकीच्या कामा साठी खालील दिलेले दोन अंदाज पत्रक मंजूर करुन ते थेट में. जकनुश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर,जि.ठाणे. यांना सोपवण्यात आले.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजुर रक्कम | कराराचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिकाचे सार्वत्रिक निवडणुक २०१२ साठी लागाणारे विविध साहीत्य भाडे तत्वावर घेणे करीता. | ५,८०,०००/– | ०३/०१/२०१२ |
| २ | उल्हासनगर महानगरपालिकाचे सार्वत्रिक निवडणुक २०१२ साठी आर.ओ. ऑफिसेस व मतमोजनी केंद्र व्ही.टी.सी. स्पोर्टस कॉम्प्लेक्स या ठीकाणी कायम स्वरुपी व कीरकोळ दुरुस्ती साठी लागाणारे साहीत्या करीता. | २,५६,०००/– | ०३/०१/२०१२ |

सदर काम हे अती तातडीचे व निवडणुकीचे असल्याने ते थेट स्थानिक मजूर कामगार सहकारी संस्था मे. जकनुश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर,जि.ठाणे. यांना देण्यात आले. तरी यांस कार्योत्तर मंजूरी

**स्थायी समिती ठराव क्र.** १४२ **दिनांकः— ३१/०३/२०१२**

सूचकाचे नांव श्री. जमनादास पुरस्वानी:

अनुमोदकाचे नांव :श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत, निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये, व मतमोजणी केंद्र येथे कायम स्वरुपी व किरकोळ दुरुस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य पुरविणेकामी मे. जकनुश मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित यांच्याशी केलेल्या सविदेंस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

तसेच या ठरावाअन्वये घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अमंलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :—** विद्युत विभागा अंतर्गतच्या १७ विविध कामांच्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३** :— विद्युत विभागा अंतर्गतच्या १७ विविध कामांच्या संविदेची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( ड ) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजुर रक्कम | कराराचा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर — ३, येथिल उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्यालया तील पॅसेजंर लिफट करीता विद्युत व्यवस्था (पॉवर) व लायटींगची व्यवस्था करण्या साठी. | १,००,०००/—. | ३०/११/२०११ | में.हरीओम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | उल्हासनगर म.न.पा.च्या क्षेत्रातील उल्हासनगर ४, येथील वॉर्ड क्रंमाक. ५१. मधील समता कॉलनीयेथील समाज मंदिराच्या, कच्छीपाडा येथील समाज मंदिराच्या व कानोजिया येथील समाज हॉल  विद्युत व्यवस्थे साठी. | २,५०,०००/—. | ३०/११/२०११ | में.रूचिका मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ३ | प्रभाग क्र.३६ मध्ये वर्षे २०११ — २०१२ च्या नगरसेवक निधीतुन रस्त्यावर  विद्युत व्यवस्था करणे. | १,००,०००/—. | २६/१२/२०११ | में. साईनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ४ | उल्हासनगर म.न.पा.च्या क्षेत्रातील समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्थे साठी.(१) मिलींद नगर, प्रभाग क्र.४८.येथील समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्थे साठी.(२) बॅरेक नंबर — १०४९,सेक्शन — २४.येथील समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्थे साठी. (३) बुध्दनगर विठ्ठल वाडी उल्हासनगर ३, हाजेरी शेड  येथील येथील समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्थे साठी. आणि (४) उल्हासनगर म. न.पा.च्या क्षेत्रातील ,उल्हासनगर — ३, स्वीमींग पुल येथील म.न.पा.चे मुख्य एस.आय.कार्यालय विद्युत व्यवस्थे साठी | १,५०,०००/—. | २६/१२/२०११ | में.ओमसाईराम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ५ | उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर — ४, प्रभाग क्र.५१ मध्ये वर्षे २०११ — २०१२ च्या नगरसेवक निधीतुन सोनार चौक येथिल कांरजाचे राहीलेले काम पुर्ण करण्यासाठी. | २,००,०००/— | २६/१२/२०११ | में.गुरुदेव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ६ | उल्हासनगर म.न.पा.च्या क्षेत्रातील उल्हासनगर २, येथील वॉर्ड क्रंमाक. ३४.येथिल स्मशानभुमीमधील कांरजाचे विद्युतीकरन , वर्षे २०११ — २०१२ च्या नगरसेवक निधीतुन करण्या करिता | १,२५,०००/—. | २७/१२/२०११ | में.अंनत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ७ | उल्हासनगर म.न.पा.च्या क्षेत्रातील उल्हासनगर — ३ , येथिल सपना गॉर्डन मध्ये गॉर्डन लाईटची व्यवस्था वर्षे २०११ — २०१२ च्या नगरसेवक निधीतुन करण्या करिता | १,००,०००/—. | २७/१२/२०११ | में.अंनत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ८ | उल्हासनगर म.न.पा.च्या क्षेत्रातील.(१)  वॉर्ड क्रंमाक.३४, मधिल रामरख्यॅानी उदयान .येथील समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्थे साठी. आणि हाजेरी शेड बॅरेक नंबर ५४३ आणि ५४७ येथिल समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्थे साठी. (२) वॉर्ड क्रंमाक.३५, मधिल बॅरेक नंबर ६७७, समोरील समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्थे साठी. (३) वॉर्ड क्रंमाक.०५, मधिल अमर डाय रोड हाजेरी शेड येथील विद्युत व्यवस्थे साठी. | १,१५,०००/—. | २७/१२/२०११ | में.अंनत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ९ | प्रभाग क्र.३८ मध्ये वर्षे २०११ — २०१२ च्या नगरसेवक निधीतुन रस्त्यावर  विद्युत व्यवस्था करणे. | १,००,०००/— | २७/१२/२०११ | में.साईनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १० | प्रभाग क्र.७५ मध्ये वर्षे २०११ – २०१२ च्या नगरसेवक निधीतुन रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे. | २,००,०००/– | २७/१२/२०११ | में.साईनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |
| ११ | प्रभाग क्र.१८ मध्ये वर्षे २०११ – २०१२ च्या नगरसेवक निधीतुन रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे. | १,००,०००/– . | २७/१२/२०११ | में.श्रीसदगुरुकृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. कल्याण ,जि.ठाणे. |
| १२ | उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर – ४, प्रभाग क्र.६४,येथिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात विद्युत व्यवस्था करण्या करीता. | १,५०,०००/– | ०२/०१/२०१२ | में.निरंकारी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. कल्याण ,जि.ठाणे. |
| १३ | उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर – १, गोल मैदान येथिल महीला बचत गट कार्यालयांच्या विद्युत व्यवस्था करण्या साठी. | १,००,०००/–. | ०२/०१/२०१२ | में.विजय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर ,जि.ठाणे. |
| १४ | उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर – ५, प्रभाग क्र.६८,येथिल ब्लॉक नं. ७४५, प्रेमनगर ,येथिल स्व.श्रीमती भगवंती रुपचंदानी समाज मंदिराच्या विद्युत व्यवस्था करण्या साठी. | १,५०,०००/–. | ०२/०१/२०१२ | में.महादेवकृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर ,जि.ठाणे. |
| १५ | उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर – ३, सिव्हील कोर्ट येथिल आशियाना आर्पाटमेन्ट समोरील कांरजाचे तसेच उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर – ४, ओटी सेक्शन साई बाबा मंदिरा जवळील कांरजाचे आणि उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर – ३, सेक्शन – २०, येथिल कांरजाचे विद्युतीकरन आणि पलबिंग इत्यादी कामे करण्या करीता. | ५,५०,०००/– | ०२/०१/२०१२ | में.आशा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर ,जि.ठाणे. |
| १६ | उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर – ४, प्रभाग क्र.४९,पाण्याच्या टाकी जवळील उद्यानात विद्युत व्यवस्था करण्या साठी. | २,९०,०००/– | ०२/०१/२०१२ | में.धनलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | उल्हासनगर महानगरपालिकाच्या क्षेत्रातील उल्हासनगर – ४,विर बाजीप्रभु चौक येथिल कांरजाचे काम पुर्ण करण्यासाठी तसेच विद्युतीकरन करण्या साठी, वर्षे २०११ – २०१२ च्या नगरसेवक निधीतुन करण्या करीता. | १,५०,०००/–. | ०२/०१/२०१२ | मे.ओमसाईराम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |

**स्थायी समिती ठराव क्र.** १४३ **दिनांकः– ३१/०३/२०१२**

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विद्युत विभागा अंतर्गतच्या १७ विविध कामांच्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

तसेच या ठरावाअन्वये घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अमंलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

**काही सदस्य :–** हा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळला जावा.

---

⇨ **विषय क्र. ४ :–** महापालिका मालकीची उदयाने, मैदाने, समाज मंदीरे, व इतर जागा या ठिकाणी वापर परवाना नियमन व नियंत्रण करणे.

---

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ४ :—** महापालिका मालकीची उदयाने, मैदाने, समाज मंदीरे, व इतर जागा या ठिकाणी वापर परवाना नियमन व नियंत्रण करणे.

**प्रस्तावना**

मालमत्ता विभागामार्फत गणेशौत्सव, नवरात्रौत्सव, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी उत्सवांसाठी तात्पुरता मंडप परवानगी, महानगरपालिका मालकिचे रस्ते, उदयाने व मैदाने, शाळेचे स्टेज त्यांची मैदाने यांची ठिकाणी कार्यक्रम परवानगी, फटाकास्टॉल परवानगी तसेच महानगरपालिका मालकिची समाजमंदिरे या सर्वाचे नियमन व नियत्रंण करणे आणि मालमत्ता विभागामार्फत कायम उत्पन्नाचा नविन स्त्रोत तयार करणेसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**(१) तात्पुरता मंडप परवानगी:—**

| कार्यक्रम तपशिल | मंडपाचे मोजमाप (फुटामध्ये) | प्रतिदिन परवानगी शुल्क | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| गणेशौत्सव व नवरात्रौत्सव | १० X १० | २०/— रूपये | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |
| गणेशौत्सव/नवरात्रौत्सव उत्सवा व्यतिरीक्त इतर सार्वजनिक कार्यक्रम | १० X १० | १००/— रूपये | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |
| वाणिज्य वापर कार्यक्रम | १० X १० | ७००/— रूपये | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |

(२) **उदयाने/मैदाने कार्यक्रम परवानगी:—**

| कार्यक्रमाचे ठिकाण | प्रतिदिन परवानगी शुल्क | अनामत रक्कम |
|---|---|---|
| महासभा ठराव क्र. ०८ दि. २४/०५/२००२ यामधील नमुद उदयाने व मैदाने | ५००/— रूपये | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |
| महासभा ठराव क्र. ०८ दि. २४/०५/२००२ व्यतिरीक्त इतर उदयाने व मैदाने (सपना गार्डन वगळून) | ५००/— रूपये | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |
| महापालिका शाळांचे स्टेज त्यांची मैदाने | ५००/— रूपये | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |

(३) **समाजमंदिर कार्यक्रम परवानगी:—**

| समाजमंदिराचे मोजमाप | प्रतिदीन/२४ तासांसाठी परवानगी शुल्क | अनामत रक्कम |
|---|---|---|
| ४०० चौ. फुटापर्यंत | ५००/— रूपये प्रतिदिन | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |
| ४०० चौ. फुटापेक्षा अधिक | १०००/— रूपये प्रतिदिन | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |

(४) **तात्पुरता फटाका स्टॉल परवानगी:—**

| ठिकाण | परवानगी शुल्क | अनामत रक्कम |
|---|---|---|
| गोलमैदान | महासभा ठराव क्र. ४४ दिनांक १९/१०/२००२ नुसार परवानगी शुल्क | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |
| दसरा मैदान | | एकुण परवानगी शुल्काच्या दोन पट |

**उपरोक्त कार्यक्रमांना परवानगी देणे आणि परवानगी नंतर परवानगी धारकांवर नियंत्रण करणे यासाठी खालील प्रमाणे सर्वसाधारण नियम राहतील.**

१) कार्यक्रम परवानगी साठीचा विनंती अर्ज, कमाल दिवस ३० आणि किमान ०४ दिवस आगोदर करणे आवश्यक आहे. प्रथम अर्ज करणाऱ्या व्यक्तिस किंवा संस्थेस प्रथम परवानगी देणेत येईल.
२) परवानगी शुल्क व अनामत रक्कम जमा केल्यानंतर परवानगी देण्यात येईल.
३) सर्व तात्पुरता मंडप परवानगीसाठी वाहतुक पोलिस विभागाचा ना हरकत दाखला बंधनकारक राहील.
४) कार्यक्रम परवानगी देणे, परवानगी रद्द करणे, परवानगीचे दिवस व अनामत रक्कम, अटी शर्ती इत्यादी कमी अधिक करण्याचे किंवा फेरबदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहतील.
५) अनामत रक्कम परत करण्याबाबत अटी शर्तीचा भंग झाला आहे किंवा कसे? या बाबतच्या संबंधित प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी यांचे अहवालावरून निर्णय घेण्यात येईल. उपरोक्त परवानगीसाठी पुढील प्रमाणे अटी व शर्ती रहातील.

**<u>अटी व शर्ती</u>**

१) ध्वनीक्षेपक लावणे आणि कायदा व सुव्यवस्था राखणे यासाठी पोलिस विभागाची परवानगी स्वतंत्रपणे घ्यावी.
२) कार्यक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या इतर शासकिय परवानग्या स्वतत्रपणे घेणेत याव्यात.
३) परवानगीची मुदत समाप्त होताच सदर जागेवर कुठल्याही प्रकारचा कचरा/घाण/ टाकावु पदार्थ इत्यादी अवशेष ठेवु नये.
४) परवानगीची मुदत संपताच मंडप तात्काळ काढुन घेणेत यावा.
५) सदर परवानगी तात्पुरत्या स्वरूपाची असेल आणि त्या ठिकाणी परवानगी धारकाला कोणताही मालकी हक्क सांगता येणार नाही.
६) कार्यक्रमाच्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था राखणे आवश्यक आहे.
७) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील सर्व तरीतुदी परवानगी धारकास लागु राहतील.
८) परवानगी धारकाने अग्निशमन प्रतिबंधक सर्व उपाययोजना कराव्यात.
९) प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियम पाळावेत.
१०) परवानगीच्या ठिकाणी कोणतेही बांधकाम करू नये.
११) मंडप उभारतांना रस्त्यांवर खड्डे खोदु नये. आणि रस्ता २/३ वाहतुकिसाठी मोकळा ठेवावा.
१२) ज्या उद्देशासाठी परवानगी देण्यात आली आहे त्याच उद्देशाकरीता वापर करण्यात यावा.
१३) कार्यक्रमाचे ठिकाणी फटाके किंवा स्फोटक पदार्थ वाजवु नये.
१४) महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान करू नये.
१५) परवानगी दिलेल्या ठिकाणी कोणत्याही कारणास्तव जिवीत अथवा वित्तहानी होणार नाही याची सर्व दक्षता परवानगीधारक यांनी घ्यावी.
१६) परवानगी दिलेल्या ठिकाणी जिवीत अथवा वित्तहानी यासाठी परवानगीधारक जबाबदार राहील तसेच महानगरपालिका याबाबत कोणतीही भरपाई देणार नाही.

उपरोक्त तात्पुरता मंडप परवानगी, उदयाने व मैदाने परवानगी, समाजमंदिर, फटाकास्टॉल यांचे नियमन व नियत्रंण करणेसाठी सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करणेत येत आहे.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार श्री एम. व्हि चाफेकर, सेवानिवृत्त मेस्त्री, हे नियत वयोमानानुसार सन २००८ मध्ये पाणी पुरवठा उत्तर क्षेत्र, उ.म.पा. उल्हासनगर–३ या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेत, त्यांच्या पश्चात मेस्त्री या पदावर अनुभवी व कार्यक्षम कर्मचारी उपलब्ध न झाल्याने पाणी पुरवठा वितरण व्यवस्था व देखभाल दुरूस्तीची कामे वेळीच करणे कठीण झाले आहे, तसेच सद्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर कामी नवीन जलवाहिन्या टाकतांना जुन्या जलवाहिन्यांची माहिती असणारा जुना कर्मचारी नसल्याने श्री एम. व्हि चाफेकर, सेवानिवृत्त मेस्त्री, यांची या कार्यालयास आवश्यकता भासत आहे,

श्री एम. व्हि चाफेकर, सेवानिवृत्त मेस्त्री, यांना मुदतवाढ द्यावयाची असल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) नुसार ०६ महिन्यांच्या कालावधी संपुष्टात आल्यानंतर मूदतवाढ देणेकामी महानागरपालिका स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तरी श्री

एम. व्हि चाफेकर, सेवानिवृत्त मेस्त्री, या पदाच्या मंजुरीकरीता मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४३ अ **दिनांकः–**

**३१/०३/२०१२**

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती महापालिका मालकीची उदयाने, मैदाने, समाज मंदीरे, व इतर जागा या ठिकाणी वापर परवाना नियमन व नियंत्रण करणेकामीचा विषय पुढील सभेत घेण्याप्रयोजनार्थ या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :–** श्री. एम. व्ही. चाफेकर (सेवानिवृत्त मेस्त्री) यांना मेस्त्री या पदावर ६ महिन्याच्या कालावधीसाठी नेमणुकीस मंजुरी देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५** :– श्री. एम. व्ही. चाफेकर (सेवानिवृत्त मेस्त्री) यांना मेस्त्री या पदावर ६ महिन्याच्या कालावधीसाठी नेमणुकीस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार श्री एम. व्हि चाफेकर, सेवानिवृत्त मेस्त्री, हे नियत वयोमानानुसार सन २००८ मध्ये पाणी पुरवठा उत्तर क्षेत्र, उ.म.पा. उल्हासनगर–३ या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेत, त्यांच्या पश्चात मेस्त्री या पदावर अनुभवी व कार्यक्षम कर्मचारी उपलब्ध न झाल्याने पाणी पुरवठा वितरण व्यवस्था व देखभाल दुरूस्तीची कामे वेळीच करणे कठीण झाले आहे, तसेच सद्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर कामी नवीन जलवाहिन्या टाकतांना जुन्या जलवाहिन्यांची माहिती असणारा जुना कर्मचारी नसल्याने श्री एम. व्हि चाफेकर, सेवानिवृत्त मेस्त्री, यांची या कार्यालयास आवश्यकता भासत आहे,

श्री एम. व्हि चाफेकर, सेवानिवृत्त मेस्त्री, यांना मुदतवाढ द्यावयाची असल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) नुसार ०६ महिन्यांच्या कालावधी संपुष्टात आल्यानंतर मूदतवाढ देणेकामी महानागरपालिका स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तरी श्री एम. व्हि चाफेकर, सेवानिवृत्त मेस्त्री, या पदाच्या मंजुरीकरीता मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४४ **दिनांकः–** ३१/०३/२०१२

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. एम. व्ही. चाफेकर (सेवानिवृत्त मेस्त्री) यांना मेस्त्री या पदावर, दिनांक १५/०९/२०११ पासून पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी मुदत वाढ देण्यास मंजुरी देत आहे. तसेच या ठरावाअन्वये घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अमंलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :–** कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र.२२बीआय०१६६७३७०० (जुना क्र ०२२/१४०६) चे खात्यात प्रथम कर निर्धारणा पासून समाविष्ट असलेली पाणीपटटी निर्लेखित करुन वर्ष २०११–१२ करीता सुधारीत बिल लागु करणेस मान्यता देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ६ :—** कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र.२२बीआय०१६६७३७०० (जुना क्र ०२२/१४०६) चे खात्यात प्रथम कर निर्धारणा पासून समाविष्ट असलेली पाणीपटटी निर्लेखित करुन वर्ष २०११—१२ करीता सुधारीत बिल लागु करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

**सक्रेटरी, भोलासाई अपार्टमेंट, बॅरेक नं. ४३४, रूम नं. १, पॅसेज/स्टेअरकेस/ पार्किंग/ओपन टेरेस, उल्हासनगर—२ यांनी दि. ४/११/२०११ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. २२बीआय०१६६७३७०० (जुना क्रमांक २२/१४०६) चे खात्यात समाविष्ट असलेली पाणीपट्टी रद्द करणेसाठी विनंती केलेली आहे.**

**विषयांकित प्रकरणी स्थळ पाहणी करण्यात आली असुन त्यांनी सादर केलेला पाहणी अहवाल पुढीलप्रमाणे आहे.**

**१. मिळकतीचे करपात्र बाबींमध्ये इमारतीची टेरेस, जिना, पार्किंग, ओपन टेरेसचे इत्यादी क्षेत्राचा समावेश आहे.**

**२. सदरील क्षेत्रामध्ये पाण्याचा वापर होत नाही.**

**उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. २२बीआय०१६६७३७०० (जुना क्रमांक २२/१४०६) चे खात्यात प्रथम कर निर्धारणापासुन समाविष्ट असलेली पाणीपट्टी आकारणी वसुल न होण्याजोगे आहे, असे इकडील मत आहे.**

**सबब, महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. २२बीआय०१६६७३७०० (जुना क्रमांक २२/१४०६) चे खात्यात प्रथम कर निर्धारणापासुन समाविष्ट असलेली पाणीपट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करून वर्ष २०११—१२ करीता सुधारीत बिल लागु करणेसाठी मंजुरीसाठी स्थायी समिती पटलावर शिफारस करण्यात येत आहे.**

**स्थायी समिती ठराव क्र.** १४५ **दिनांक:— ३१/०३/२०१२**

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. २२बीआय०१६६७३७०० (जुना क्र०२२/१४०६) चे खात्यात प्रथम कर निर्धारणा पासून समाविष्ट असलेली पाणीपटटी निर्लेखित करुन वर्ष २०११—१२ करीता सुधारीत बिल लागु करणे मान्यता देत आहे.

तसेच या ठरावाअन्वये घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अमंलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :—** महापालिका विस्तारीत प्रशासकिय इमारतीचे ग्रीन बिल्डींग कन्सेप्टसाठी

मेसर्स गोदरेज ॲण्ड बॉयस कंपनी यांची सल्लागार म्हणून नेमणूकीच्या संविदेस मान्यता देणे.

———————————————————————————————————————————

**काही सदस्यः—** हा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळला जावा.

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७:—** महापालिका विस्तारीत प्रशासकिय इमारतीचे ग्रीन बिल्डींग कन्सेप्टसाठी मेसर्स गोदरेज ॲण्ड बॉयस कंपनी यांची सल्लागार म्हणून नेमणूकीच्या संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेची सद्यस्थितीत अस्तित्वात असलेली इमारत विविध विभागाच्या कामाकरीता अपुरी पडत असल्याने प्रशासकीय इमारतीचे मोकळया जागेवर विस्तारीत प्रशासकीय इमारत बांधणेसाठी मे.अनिरुध्द नाखवा, वास्तुविशारद यांचेकडून प्राकलन व नकाशे तयार करणेत आले आहे

विस्तारीत प्रशासकीय इमारत बांधणेच्या कामाची प्राकलनिय किंमत रु.१,५१,९९,२२५/— इतकी होती. सदर प्राकलनास मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६ दिनांक ७/१२/२००९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

सदर काम करणेसाठी निविदा मागविण्यात आली. व सदर काम मे.ए.एम.रामचंदानी यांना दिलेले आहे. यासाठी रु.१.७४ कोटी इतका खर्च होत आहे. सदर निविदेस मा.स्थायी समिती ठराव क्र.१० दिनांक ६/५/२०१० अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. सध्या जागतिक स्तरावर पर्यावरणास अग्रस्थानी ठेवून विविध योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. इमारत बांधकामातही या बाबीचा विचार करुन ग्रीन बिल्डिंगची संकल्पना अस्तित्वात आली आहे. जास्तीत जास्त स्थानिक व पुनर्वापर करण्यायोग्य सामुग्री वापरुन इमारत बांधणी करण्यावर भर देणे आहे. जेणेकरुन पर्यावरणास बाधा न आणता जास्तीत जास्त नैसर्गिक स्तोत्र वापरुन उर्जाबचत, पाणी बचत होईल. अशा रचनेने इमारत बांधण्यासाठी प्रयत्न होत आहे.

जागतिक स्तरावर अशा प्रकारे ग्रीन इमारत बांधण्यासाठी USGBC ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेसारखी भारतात Leadership in engraving in Envirnment Design (LEED) ही संस्था अस्तित्वात आहे. ही संस्था या कंन्सेप्टने बांधकाम करण्यास आवश्यक असलेली गुणवारी ठरवून त्याआधारे खालील प्रमाणे इमारतीची प्रतवारी ठरवून देते.

| | |
|---|---|
| १) LEED Certificate | २६ ते ३२ गुण |
| २) LEED Certificate Silver Level | ३३ ते ३८ गुण |
| ३) LEED Certificate Gold Level | ३९ ते ५१ गुण |
| ४) LEED Certificate Platinum Level | ५२ ते ६१ गुण |

अशा पध्दतीने बांधकाम करण्यासाठी या क्षेत्रातील नामवंत तज्ञ संस्था सल्लागार यांची आवश्यकता असते. उल्हासनगर महानगरपालिकेचे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.आयलानी यांनी मे.गोदरेज ॲण्ड बॉयस कं. या संस्थेशी संपर्क केला होता.

सदर इमारत ग्रीन कन्सेप्ट ने बांधणेबाबत दिनांक ३१/५/२०१० रोजी मा.आयुक्त सो. यांचे दालनात चर्चा करण्यात आली. सदर चर्चेच्या वेळी मे.अनिरुध्द नाखवा यांचे समवेत मे.गोदरेज ॲण्ड बॉयस कं.लिमि. चे प्रतिनिधी उपस्थित होते. मे.गोदरेज ॲण्ड बॉयस कं.लिमि. यांनी सदर इमारत ग्रीन कंन्सेप्ट मध्ये बांधण्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान मार्गदर्शन व इमारतीस ग्रीन बिल्डिंग पध्दतीने बांधकाम व वापर करणेसाठी आवश्यक ते मार्गदर्शन सह पत्रव्यवहार कागदोपत्री पूर्तता इत्यादी पुरवून LEED कडून उपरोक्त ४ पैकी एका स्तरावरील गुणांकन मिळवून देण्यासाठी करावयाची कार्यवाही करुन देण्यास सल्लागार राहण्याची तयारी दर्शविली. याकामी त्यांनी त्यांचे सेवाशुल्क रु.८.०० लक्ष (कर वगळून) आकारण्यात येतील असे कळविले आहे.

सार्वजनिक बांधकाम खातत सध्या कार्यरत असलेले सल्लागार मे.अनिरुध्द नाखवा हे या इमारतीचे स्थापत्य सल्लागार आहेत. ग्रीन बिल्डिंगसाठी त्यांच्या निविदेमध्ये तरतूद नाही त्यामुळे सदर संकल्पनेनुसार

उल्हासनगर महानगरपालिकेची नियोजित विस्तारीत प्रशासकीय इमारत ग्रीन बिल्डिंग संकल्पनेने बांधण्यासाठी त्या क्षेत्रातील नामवंत सल्लागार असणे आवश्यक आहे. जेणेकरुन या संकल्पनेनुसार LEED कडून Certificate मिळविता येईल. तरी मे.गोदरेज ॲण्ड बॉयस कं. यांचेकडे या क्षेत्रातील असलेल्या कामाचा अनुभव व या कंपनीची Reputation चा विचार करुन तसेच या इमारतीचे स्थापत्य सल्लागार मे.अनिरुध्द नाखवा यांनी ही मे.गोदरेज ॲण्ड बॉयस कं. यांची व त्यांनी दिलेल्या दराप्रमाणे नियुक्ती करण्यास शिफारस पाहता मे.गोदरेज ॲण्ड बॉयस कं. यांची त्यांनी दिलेल्या रु.८.०० लक्ष शुल्क (कर वेगळे) देऊन ग्रीन कंन्सेप्टसाठी सल्लागार म्हणून नेमण्यास स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४५अ **दिनांक:–**

**३१/०३/२०१२**

सूचकाचे नांव : श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नांव : श्री. सुंदर मंगतानी

ही स्थायी समिती महापालिका विस्तारीत प्रशासकिय इमारतीचे ग्रीन बिल्डींग कन्सेप्टसाठी मेसर्स गोदरेज ॲण्ड बॉयस कंपनी यांची सल्लागार म्हणून नेमणूकीच्या संविदेस मान्यता देणेकामीचा विषय पुढील सभेत घेण्याप्रयोजनार्थ या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

——————————————————————————————————————————

**विषय क्र. ८ :–** श्री. जगन महादेव अहिरे या अपंग व्यक्तीस १) महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट, उल्हासनगर–३, २) प्रांत कार्यालय, उल्हासनगर–३, ३) बोट क्लब, उल्हासनगर–३ या ठिकाणापैकी एका ठिकाणी एसटीडी/पीसीओ बुथ चालविण्याकामी जागा वापर परवाना देणे.

——————————————————————————————————————————

**काही सदस्य:–** हा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळला जावा.

**सभापती, श्री. लाल पंजाबी:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८ :—** श्री. जगन महादेव अहिरे या अपंग व्यक्तीस १) महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट, उल्हासनगर—३, २) प्रांत कार्यालय, उल्हासनगर—३, ३) बोट क्लब, उल्हासनगर—३ या ठिकाणापैकी एका ठिकाणी एसटीडी/पीसीओ बुथ चालविण्याकामी जागा वापर परवाना देणे.

**प्रस्तावना**

अर्जदार श्री. जगन महादेव अहिरे रा.भैयासाहेब आंबेडकर सोसायटी, हिराघाट, उल्हासनगर—३, जि. ठाणे. यांनी

१. महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट, उल्हासनगर—३.
२. प्रांत कार्यालय, उल्हासनगर—३.
३. बोट क्लब, उलहासनगर—३.

या ठिकाणी पैकी एका ठिकाणी एस.टी.डि/पी.सी.ओ. बुथ लावणेस परवानगी मिळणेस विनंती केलेली आहे. या अंनुषंगाने दि. २०/८/२००८ रोजीच्या पत्रान्वये नगररचनाकार, उमपा, प्रभाग अधि— कारी व वाहतूक शाखा उल्हासनगर यांना उक्त जागांबाबत ना हरकत दाखला देणे बाबत कळविले आहे.

त्या अन्वये नगररचनाकार, नगररचना विभाग, यांनी नमुद केलेप्रमाणे अर्जदाराने सोबत नकाशामध्ये दर्शविलेली जागा ही रस्त्याच्या कडेला फुटपाथवर आहे. तरी सदर जागेवर एस.टी.डी./ पी.सी.ओ. बुथ साठी रहदारीस कुठलाही अडथळा निर्माण होणार नाही असे अभिप्राया प्राप्त झालेले आहेत.

तसेच प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.३ यांचे कडुन जागेसंबंधी व वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शहर वाहतुक नियत्रंण शाखा उल्हासनगर यांचा रहदारीच्या दृष्टीने अभिप्राय मागविण्यात आला होता. त्या प्रमाणे हिराघाट बोट क्लब, शिवसेना शाखेच्या बाजुला फुटपाथवर, उल्हासनगर —३. या ठिकाणांबाबत त्यांचा ना हरकत दाखला व अभिप्राय या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

महापालिका ठराव क्र.१६, दि.२०/५/२००५ अन्वये अर्जदाराने १) नगरसेवक उल्हासनगर महानगरपालिका यांचे पत्र २) अपंग असल्याबाबतचा पुरावा ३) मागणी केलेल्या जागेचा कच्चा नकाशा ४) रहिवाशी असल्याबाबतचा दाखला ५) रेशनकार्डची झेरॉक्स व शाळा सोडल्याचा दाखला या कार्यालयात सादर केलेला आहे.

प्रस्तावित जागा विकास योजनेत बाधीत होत नसल्यास व रहदारीस अडथळा नसल्यास सदर जागा मा. आयुक्त सो. विकास यांच्या मंजुरीने अर्जदारास वितरीत करण्यात येते. अर्जदाराकडुन महासभा ठराव क्र. १६ दि.२०/५/२००५ अन्वये अनामत रक्कम रु.१८००/— व प्रतिमहा भाडे रु. १५०/— प्रमाणे तीन महिन्यांचे भाडे आगाऊ घेऊन ठरावाप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी अटी व शर्ती नुसार मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** **१४५ ब** **दिनांक:— ३१/०३/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती महापालिका श्री. जगन महादेव अहिरे या अपंग व्यक्तीस १) महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट, उल्हासनगर—३, २) प्रांत कार्यालय, उल्हासनगर—३, ३) बोट क्लब, उल्हासनगर—३ या ठिकाणापैकी एका ठिकाणी एसटीडी/पीसीओ बुथ चालविण्याकामी जागा वापर परवाना देणेकामीचा पुढील सभेत घेण्याप्रयोजनार्थ या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९ :—** प्रभाग क्र. १९, बॅ.नं. १२५ बी व बॅ.नं. ११६ बी, बसवेश्वर अपार्टमेंट जवळ उल्हासनगर—१ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

---

**काही सदस्य:—** हा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळला जावा.

**सभापती, श्री. लाल पंजाबी:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :—** प्रभाग क्र. १९, बॅ.नं. १२५ बी व बॅ.नं. ११६ बी, बसवेश्वर अपार्टमेंट जवळ उल्हासनगर—१ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

प्रभाग क्र. १९, बॅ. नं. ११५ बी व बॅ. नं. ११६ बी बसवेश्वर अपार्टमेंट जवळ उल्हासनगर—१ येथिल १० सीट्चे ५ पुरुषांचे, ५ स्त्रियांचे जुने शौचालय नागरीकांच्या मागणीनुसार निष्कासित करणेबाबत मा. महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधी व नगरसेवक श्री. धनंजय बोडारे उल्हासनगर महानगरपालिका यांनी विनंती केलेली आहे.

प्रभाग क्रद १९ए बॅ. नं. ११५ बी व बॅ. नं. ११६ बी, बसवेश्वर अपार्टमेंट जवळ १० सिट्चे ५ पुरुषांचे, ५ स्त्रियांचे शौचालय मोडकळीस आलेले आहे, असा संबंधीत आरोग्य निरिक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन पंचनामा सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता प्रस्तावित शौचालय निष्कासित करुन सदर मालमत्तेवर मनपाची भांडारखोली/सीसी पॅसेज बांधणेसाठी निधी उपलब्ध होताच व कामाचे कार्यादेश दिल्यावर प्रस्तावित शौचालय निष्कासित करणेबाबतच्या निर्णयास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४५क **दिनांकः—**

**३१/०३/२०१२**

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव : डॉ. निना नाथानी

ही स्थायी समिती महापालिका प्रभाग क्र. १९, बॅ.नं. १२५ बी व बॅ.नं. ११६ बी, बसवेश्वर अपार्टमेंट जवळ उल्हासनगर—१ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणेकामीचा विषय पुढील सभेत घेण्याप्रयोजनार्थ या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

**विषय क्र. १० :—** ४ फिरते मोबाईल स्प्रेईंग मशिनद्वारे संपुर्ण शहरात जंतुनाशकांची फवारणी करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या मे. सिटीगार्ड, अंबरनाथ यांच्याशी मागील निविदेतील अटी व शर्तीवर मुदतवाढीच्या संविदेस मान्यता देणे.

———————————————————————————————————————

**काही सदस्यः—** या विषयास मान्यता नाकारली जावी, कारण महापालिकेने स्वतःचे वाहन उपलब्ध करुन घेतले आहे.

**सभापती, श्री. लाल पंजाबीः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १० :—** ४ फिरते मोबाईल स्प्रेईंग मशिनद्वारे संपुर्ण शहरात जंतुनाशकांची फवारणी करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या मे. सिटीगार्ड, अंबरनाथ यांच्याशी मागील निविदेतील अटी व शर्तीवर मुदतवाढीच्या संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

आरोग्य विभागामार्फत नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पावर स्प्रे पंपद्वारे जंतूनाशक फवारणीचे काम मे. सिटीगार्ड, अंबरनाथ यांना देण्यात आलेले आहे. परंतु सदरचे काम ५ ऑगस्ट २०११ रोजी संपुष्टात आले आहे. तरी शहरातील नागरीकांचे आरोग्य अबाधित राहणेसाठी नियमीत जंतुनाशक फवारणी होणे अत्यावश्यक आहे. करीता कोणत्याही प्रकारे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू नये म्हणून मे. सिटीगार्ड, अंबरनाथ यांना मोबाईल स्प्रे पंपद्वारे जंतूनाशक फवारणी कामासाठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे. मा. स्थायी समितीने ठराव क्र. १३८ दिनांक ३१/०३/२०१० रोजीच्या मान्यता अन्वये मे. सिटीगार्ड, अंबरनाथ यांना दिनांक ५/४/२०१० पासून ४ मोबाईल स्प्रेईंग मशिनद्वारे जंतुनाशक फवारणीचे कार्यादेश देण्यात आलेले होते. सदरचे काम दिनांक ४/४/२०११ रोजी संपुष्टात आली होती. तद्नंतर सदर कामास तिन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. सदरची मुदत वाढ दिनांक ५ ऑगस्ट २०११ रोजी संपुष्टात आले आहे. नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून नियमीत जंतुनाशक व किटकनाशक फवारणी करणे आवश्यक असते. त्यानुसार आरोग्य विभागासाठी ४ मोबाईल स्प्रेईंग मशिन खरेदी करण्याचे वाहन विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. परंतु सदर खरेदेची संपुर्ण कार्यवाही होण्यासाठी किमान दिड ते दोन महिन्यांचा कालावधी अपेक्षित असल्याचे वाहन विभागामार्फत उमपा/वाहन/११४ दि. १/८/२०११ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे सदर स्वमालकीचे स्प्रेईंग मशिन उपलब्ध होईपर्यंत व सध्या पावसाळा सुरु असल्याने शहरात नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने नियमीत जंतुनाशक/किटकनाशक औषध फवारणी करणे अत्यावश्यक आहे. तरी वाहन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार किमान दोन महिन्यांसाठी किंवा पावसाळा कालावधी असल्याने फवारणीसाठी आवश्यक मोबाईल स्प्रेईंग दोन महिन्यात वाहन विभागाकडून उपलब्ध न झाल्यास सदर कामास किमान ३ महिन्यांसाठी (९० दिवसांसाठी) मुदत वाढ देण्यास मान्यता मिळावी. मोबाईल स्प्रेईंग मशिनचे ४ सेट भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी रुपये ६,४८,०००/— खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०११—१२ अर्थसंकल्पातील सी—२ मलेरीया व डेंगू प्रतिबंधक या लेखा शिर्षकात रुपये ५०,००,०००/— ची तरतूद करण्यात आलेली असुन रुपये ३३,७०,७८०/— शिल्लक आहेत त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी मागील निविदेतील अटी व शर्तीच्या आधीन राहून ४ फिरते मोबाईल स्प्रेईंग मशिनद्वारे संपुर्ण शहरात फवारणी करण्याच्या कामास मे. सिटीगार्ड, अंबरनाथ यांना ९० दिवसांसाठी मुदतवाढ देण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४६ **दिनांकः—**

**३१/०३/२०१२**

सूचकाचे नांव : श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानी

अनुमोदकाचे नांव : श्री. बी.बी. मोरे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ४ फिरते मोबाईल स्प्रेईंग मशिनद्वारे संपुर्ण शहरात जंतुनाशकांची फवारणी करणेकामी सध्या कार्यरत असलेल्या मे. सिटीगार्ड, अंबरनाथ यांच्याशी मागील निविदेतील अटी व शर्तीवर मुदतवाढीच्या संविदेस मान्यता देत नाही.

कारण

महापालिकेने स्वताचे वाहन उपलब्ध करून घेतले आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सभापती, श्री. लाल पंजाबीः—** आजची ही सभा आमच्या कार्यकालावधीची शेवटची सभा आहे, वर्ष भराच्या कालावधीमध्ये आम्हांस फक्त आठ महिन्याचा कालावधी मिळाला कारण की ४ जानेवारी २०१२ पासून उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागु झाली होती, या अगोदर ज्या दोन सार्वत्रिक निवडणूका झाल्या त्यावेळी स्थायी समितीला एवढा कमी कालावधी मिळाला नव्हता.

काही दिवसापूर्वी शासनाने एक परिपत्रक काढुन ज्या महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या आहेत आणि नविन सदस्य निवडणून आले आहेत त्या महापालिकांनी सद्या कोणतेही धोरणात्मक तसेच आर्थिक बाबीचे संबंधीत असे निर्णय घेवु नये असे सुचित केले आहे. शासनाच्या या पत्राबाबत आपल्या महापालिकेच्या मा. महापौर व स्थायी समिती सभापती या नात्याने मी शासनाला पत्र लिहिले आहे, त्या पत्राचे अद्याप शासनाकडुन कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही. आम्हांस कमी कालावधी मिळाला आहे परंतु या कालावधीत आपण सर्वांनी आम्हांस जे सहकार्य केले त्याबदद्‌ल मी आपणांस सर्वाचे जाहिर आभार मानतो विशेष करुन मा. आयुक्त, महापालिका सचिव यांच्याकडुन वेळोवेळी अतिशय चांगल्याप्रकारचे सहकार्य मिळाले त्यांचबरोबर आपण सर्व सदस्यांनी मला चांगले सहकार्य दिले त्यामुळेच माझे हे सभापती पदाच्या कालावधीत अतिशय सौदाहपूर्ण वातावरणात कामे झाली आहेत. यास्तव मी सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानतो. सार्वत्रिक निवडणूकीनंतर नविन सदस्य निवडून आलेले आहेत, काही पूर्वीचे सदस्यही निवडून आलेले आहेत, महानगरपालिकेचे कामकाज चालू राहीलच, आम्ही काही सदस्य निवडून आलो नसलो तरी शहराच्या हितासाठी आम्ही वचनबध्द आहोत. आपण लोक जसे सेवा करत आहात तसेच आम्हीही शहराची सेवा करत राहु. आणि पुन्हा एकदा आपणा सर्वांचे आभार मानतो.

---

सायकांळी ६.१५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. लाल पंजाबी यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—९/५/२०१२

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ९/५/२०१२ रोजीच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक ९/५/२०१२ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **श्री. के.व्ही. कुरुंदकर, जिल्हाधिकारी, ठाणे** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण | सदस्य |
| २ | श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ३ | सौ. ज्योती गायकवाड | सदस्या |
| ४ | सौ. नेहा भोईर | सदस्या |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवानी | सदस्य |
| ६ | सौ. मिना कुमार आयलानी | सदस्या |
| ७ | कु. जयश्री जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| ८ | श्री. अकुंश म्हस्के | सदस्य |
| ९ | डॉ. महेश गावडे | सदस्य |
| १० | सौ. पचंशीला नाना पवार | सदस्या |
| ११ | श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर | सदस्य |
| १२ | श्री. राजू रामसिंग कंडारे | सदस्य |
| १३ | सौ. जया मोहन साधवनी | सदस्या |
| १४ | श्री. गोदुमल किशनानी | सदस्य |
| १५ | श्रीमती आशा गुप्ता | सदस्या |

तर

सदस्या १. सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी हया अनुपस्थित होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त
२. श्री. मनोज रानडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) ठाणे
३. श्री. मिनिनाथ दंडवते, जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
४. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
५. श्री. शेखर गाडगे, तहसिलदार, उल्हासनगर
६. श्री. राजेंद्र चव्हाण, उप—आयुक्त
७. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
८. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
९. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
१०.श्री. विनोद डवले,सहा. आयुक्त
११.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१२.डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय अधिकारी
१३.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१४.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्री. शाम शिवनानी

३. श्रीमती अमिता संखे
४. श्रीमती नर्गिस खान

सकाळी ११.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—** मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये स्थायी समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. के. व्ही. कुरुंदकर, जिल्हाधिकारी, ठाणे हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १ :—** स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

**श्री. के.व्ही. कुरुंदकर (पीठासीन अधिकारी):—**
**स्थायी समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक ४/५/२०१२** रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ५ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. रमेश महादेव चव्हाण | श्रीमती नेहा नंदु भोईर | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड |
| २ | श्री. रमेश महादेव चव्हाण | श्री. राम फुंदुमल पारवानी | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| ३ | श्री. रमेश महादेव चव्हाण | श्री. महेश गजानन गावडे | कु.जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ४ | श्री. राजु रामसिंग कंडारे | श्री. नरेंद्र केवलराम ठाकुर | श्रीमती जया मोहन साधवानी |
| ५ | श्री. राजु रामसिंग कंडारे | श्री. नरेंद्र केवलराम ठाकुर | श्रीमती जया मोहन साधवानी |

वरील नामनिर्देशन पत्रातील श्री. रमेश महादेव चव्हाण यांचा नामनिर्देशन पत्र क्र.. ३ हा रद्द करण्यात येत आहे कारण त्यातील अनुमोदक कु. जयश्री जीवनलाल जग्यासी हया नामनिर्देशन पत्र भरण्याच्या दिवशी अनुपस्थित होत्या. तसेच त्यांची स्वाक्षरी सुध्दा जुळत नाही. त्यामुळे श्री. रमेश महादेव चव्हाण यांचे नामनिर्देशन पत्र क्र. ३ अवैध ठरविण्यात येत आहे. **३** नामनिर्देशन पत्रांपैकी **२** नामनिर्देशन पत्र योग्य असल्याने वैध ठरविण्यांत येत आहेत. श्री. राजु रामसिंग कंडारे यांचे २ नामनिर्देशन पत्र योग्य असल्याने वैध ठरविण्यात येत आहेत. असे एकुण **४** नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यांत येत आहेत.

**स्थायी समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छानना केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची (आडनावाने सुरुवात केलेली) नावे मराठी वर्णानुक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. कंडारे राजु रामसिंग |
| २. | श्री. चव्हाण रमेश महादेव |

यावेळेस ११.४० मिनिटे झाली आहेत.

वरील २ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

यावेळी सदस्या श्रीमती आशा गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री. के.व्ही. कुरुंदकर (पीठासीन अधिकारी):—**आता ११.५५ वाजले आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये कोणत्याही उमेदवाराने आपली **उमेदवारी मागे घेतली नाही.**

आता, स्थायी समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी खालील २ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमाने नावे पुढील प्रमाणे आहेत :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. कंडारे राजु रामसिंग |
| २. | श्री. चव्हाण रमेश महादेव |

स्थायी समिती सभापती पदासाठी मराठी वर्णानुक्रमाने अनु. क्र. १ आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात येतील. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांच्या नावांची नोंद घेण्यात येईल. हात वर केलेल्या प्रत्येक सदस्याच्या नावासमोर ‘‘होय’’ म्हणुन नोंद घेण्यात येईल.

सर्वप्रथम स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार श्री. कंडारे राजु रामसिंग यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. कंडारे राजु रामसिंग यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर |
| २ | श्री. राजू रामसिंग कंडारे |
| ३ | श्रीमती आशा गुप्ता |

त्यानंतर स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार श्री. चव्हाण रमेश महादेव यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. चव्हाण रमेश महादेव यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण |
| २ | श्री. सुरेश जाधव |
| ३ | सौ. ज्योती गायकवाड |
| ४ | सौ. नेहा भोईर |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवानी |
| ६ | सौ. मिना कुमार आयलानी |
| ७ | कु. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ८ | श्री. अकुंश म्हस्के |
| ९ | डॉ. महेश गावडे |
| १० | सौ. पचंशीला नाना पवार |

**स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणकीमध्ये ज्या सदस्यांनी मतदान केले नाही अशा सदस्यांच्या मताची नोंद पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १. | सौ. जया मोजन साधवानी |
| २. | श्री. गोदुमल किशनानी |

आता निवडणूक प्रक्रिया संपल्याने निवडणूक लढविलेल्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या व निकाल घोषणा मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

## निकाल घोषणा

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कंडारे राजु रामसिंग | ३ |
| २. | श्री. चव्हाण रमेश महादेव | १० |
| **एकुण मतदान संख्या –** | | **१३** |
| **तटस्थ** | | **२** |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–६ मधील पोटनियम (७) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये **स्थायी समिती सभापती** पदाचे उमेदवार ***श्री. चव्हाण रमेश महादेव*** यांना एकुण १३ मतांपैकी **१०** इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची ***स्थायी समिती*** **सभापती** पदी रितसर नेमणूक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :–९/५/२०१२

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
स्थायी समिती सभागृह

(के.व्ही. कुरुंदकर)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी दुपारी १२.०७ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**मान्य**
(के.व्ही. कुरुंदकर)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
स्थायी समिती सभागृह

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—११/५/२०१२

**दि. ११/५/२०१२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिति सभेचे इतिवृत्त.**

२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक ११/५/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिति सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण | सभापती |
| २ | श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ३ | सौ. ज्योती गायकवाड | सदस्या |
| ४ | सौ. नेहा भोईर | सदस्या |
| ५ | कु. जयश्री जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| ६ | डॉ. महेश गावडे | सदस्य |
| ७ | सौ. पचंशीला नाना पवार | सदस्या |
| ८ | श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर | सदस्य |
| ९ | श्री. राजू रामसिंग कंडारे | सदस्य |
| १० | सौ. जया मोहन साधवनी | सदस्या |
| ११ | श्री. गोदुमल किशनानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राम (चार्ली) पारवानी, २. सौ. मिना कुमार आयलानी, ३. श्री. अकुंश म्हस्के, ४. सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी, ५. सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१५. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
१६. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१७. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
१८. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१९. श्री. ह.न. जमादार, उप—मुख्य लेखा परिक्षक
२०. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
२१. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२२. श्री. एस.ए. माली, उप—अभियंता, पाणी पुरवठा
२३. श्री. डी.एन.बागुल, उप—अभियंता, पाणी पुरवठा
२४. श्री. जी.पी. सुंदरम, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
२५. श्री. के.ए. शानबाग, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
२६. श्री. के.जे. पारेख, उप अभियंता, साबांवि
२७. श्री. विजय रिजवानी, उप—अभियंता, साबांवि
२८. श्री. बबीश गंगारामानी, उप—अभियंता, विद्युत
२९. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
३०. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
३१. श्री. सुरेश मरळे, लिपिक, लेखा विभाग
३२. श्री. दिपक शहरी, लिपिक, लेखा विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गीस खान

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

सांयकाळी ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**अर्थसंकल्पाविषयीची या महत्वपुर्ण सभेत आयुक्त साहेब हजर नाहीत. महासभांना ते उपस्थित राहत नाहीतच परंतु या अर्थसंकल्पाच्या सभेस ते उपस्थित नाहीत ही अतिशय दु:खाची गोष्ट आहे.

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**ते वैयक्तीक काही महत्वाच्या कामासाठी बाहेरगावी गेले असल्यामुळे या सभेस आले नाहीत.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**त्यांनाच कामे असतात काय दुस–यांना कामे नसतात काय? अर्थसंकल्पाच्या या महत्वपुर्ण सभेस त्यांनी उपस्थित राहावयास पाहिजे होते.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**अर्थसंकल्पीय सभेस आयुक्तांनी उपस्थित राहणे आवश्यक होते.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**महासभांनाही ते उपस्थित राहत नाहीत. स्थायी समिती सभेस सुध्दा हजर राहत नाहीत. आज अर्थसंकल्पाची महत्वपुर्ण सभा असतांनाही ते हजर नाहीत. यास्तव आम्ही सभात्याग करतो.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–** ५ तारखेला मी एक पत्र दिले आहे. १ एप्रिल पासुन १९ एप्रिल पर्यंत स्थानिक संस्था कराच्या रुपाने किती वसुली झाली आहे. त्याची मी माहिती मागितली आहे, त्या पत्राचे मला अदयाप उत्तर देण्यात आलेले नाही. तुमचा अर्थसंकल्प कशावर तयार होतो, येणारे उत्पन्न आणि होणारा खर्च यावरच तयार केला जातो ना?

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**अर्थसंकल्पावर चर्चा चालु असतांना श्री. म्हसाळ साहेब, आपल्या भ्रमणध्वनीवर बोलत आहेत. हे काय चालले आहे? यांना विषयाचे गांर्भिय नाही काय?

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**स्थायी समितीमध्ये आज अर्थसंकल्प सादर केला जात आहे. सर्व शहरवाशियांचे लक्ष आज स्थायी समिती व आयुक्तांवर केंद्रीत झालेले आहे. येणा–या कालावधीत करांचे दर काय असतील याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. मी दिलेल्या पत्राचे आपण उत्तर दिले असते तर त्यानुसार मी आपणांस आणखी प्रश्न विचारले असते. १ एप्रिल पासुन स्थानिक संस्था कर लागु होणार आहे हे आपणांस माहित होते काय?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**होय माहित होते.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**जर आपणांस माहित होते तर याबाबतचे आपणच उत्तर दया. आणि आयुक्तांची खुर्ची आपणच सांभाळा. तसेही आज आयुक्त नाही आहेत. श्री. म्हसाळ साहेब, ''आप इतना क्युं मुस्कुरा रहे हो, क्या गम हे जो छुपा रहे हो।''

यावेळी श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**आपण आता याचा खुलासा करा.

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**३१ मार्च २०१२ रोजी सांयकाळी आमच्याकडे फॅक्स आला की आज रात्री १२.०० वाजेपासुन म्हणजेच १ एप्रिल पासुन स्थानिक संस्था कर लागु करायचा आहे. त्यानुसार जकात नाक्यांवर येणा–या बिलांचे छायांकित प्रती काढण्यासाठी आम्ही जकात नाक्यांवर झेरॉक्स मशीन उपलब्ध करुन दिल्या होत्या. कर्मचा–यांना प्रशिक्षण दिले होते व नोंदणीसाठी आवश्यक असलेले फॉर्म छपाई करुन जकात नाक्यांवर उपलब्ध करुन दिले होते.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**जकात कर जावुन स्थानिक संस्था कर लागु होणार आहे याचा आपणांस काही अंदाज होता का? आणि असेल तर त्याबाबत आपण काय केले? १ तारखेपासुन १९ तारखेपर्यंत स्थानिक संस्था करापोटी किती रक्कमेची वसुली झाली? या १९ दिवसाच्या नुकसानीची भरपाई कोण करेल?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**व्यापा–यांची नोंदणी झाल्यानंतर त्यांनी डिक्लेरेशन भरुन दिल्यानंतर किती कर भरायचा आहे याच रिटर्न्स भरुन दिले जाते.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**१ तारखेपासुन जकात व स्थानिक संस्था कर या दोन्ही करांची वसुली बंद असल्यामुळे या १९ दिवसाचे महापालिकेचे किती रुपयाचे नुकसान झाले? कोनार्क कंपनी एका दिवसाच्या जकात वसुलीपोटी आपणांस किती रक्कम देत होते ते जैन साहेब आपण सांगा.

**श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी :–**प्रति दिन ४० लाख रुपये याप्रमाणे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**कोनार्क कंपनी ४० लाख रुपये या हिशोबाने देत आहे. मोनार्च कंपनी प्रति दिन किती रक्कम देणार होती?

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**प्रति दिन ४० लाख या हिशोबाने १९ दिवसाचे ७ कोटी ६० लाख रुपये कोण भरुन देणार आहे?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**शासन अधिसूचना निघाल्यानंतरच स्थानिक संस्था करासंबंधात व्यापा–यांचे नोंदणी केली जाते. आणि त्यानंतरच स्थानिक संस्था कराची वसुली केली जाते.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**कोणत्या दिवसापासुन स्थानिक संस्था कर लागु करण्यात येणार आहे हे आपणांस माहित होते काय?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**स्थानिक संस्था कर नेमक्या कोणत्या तारखेपासुन लागु होणार आहे याची मला माहिती नव्हती. परंतु स्थानिक संस्था कर लागु होणार आहे अशी सर्वत्र चर्चा चालु होती.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**मागील महासभेत कुणीतरी एक सदस्याने म्हटले आहे की, जकात कर रद्द करण्यात आलेलाच नव्हता. अशी इतिवृत्तामध्ये नोंद आलेली आहे. ज्या ७ कोटी ६० लाख रुपये गेले कोठे? ते उंदराने खाल्ले काय? १ एप्रिल पासुन १९ एप्रिलपर्यंत किती व्यापा–यांची नोंदणी झाली? आणि त्यानुसार स्थानिक संस्था करापोटी आपणांस किती रक्कम मिळणार आहे?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–**१९ दिवसामध्ये काही व्यापा–याची नोंदणी झालेली नाही, मात्र सेंच्युरी रेयॉन व इतर यांना आपल्याकडील मिळकत कर विभागामध्ये जे ८ युनिट आहेत त्यांच्या मार्फत ८७० नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**७ कोटी ६० लाख रुपये अर्थसंकल्पात आपण कोठे दर्शविले आहेत? त्याशिवाय आपण अर्थसंकल्पीय अंदाज कसा तयार करु शकता? आपण स्थायी समितीची दिशाभुल करत आहात. आणि जकात कर ३१ जुनपर्यंत आपण वसुल करणार आहात त्यानंतर १ जुलै पासुन स्थानिक संस्था कर वसुली संदर्भात आपण काय तयारी केली आहे?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**कर्मचा–यांना प्रशिक्षण देणे चालु केले आहे. व्यापा–यांची नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेले फॉर्म वाटप करण्यास

सुरुवात केली आहे. वर्तमानपत्रांमध्ये जाहिर सूचना प्रसिध्दीस दिली आहे. स्थानिक वृत्तवाहिन्यांवर जाहिरात प्रसिध्द केली जात आहे व शहरात ठिकठिकाणी फलक लावण्यात आला आहे.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**१ एप्रिल पासुन जकात कर वसुली बंद, स्थानिक संस्था कर वसुली बंद केल्यामुळे जकातीपोटी महापालिकेला प्रति दिन ४० लाख रुपये या हिशोबाने जे पैसे मिळत होते, ते बद झाले आहे, त्यामुळे १९ दिवसाचे ७ कोटी ६० लाख रुपयाचे उत्पन्न महापालिकेला मिळाले नाही. याबाबतीत आयुक्त साहेब आपण उत्तर दया. स्थायी समितीची दिशाभुल करु नका.

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**शासन अधिसूचनेनुसार १ एप्रिल २०१२ पासुन स्थानिक संस्था कर लागु करण्यात आले आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**१/४/२०१२ पासुन काय झाले आहे?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**१ एप्रिल २०१२ पासुन स्थानिक संस्था कर लागु झाला आहे.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**श्री. म्हसाळ साहेब, आपणांस बरोबर समजावुन सांगत नाहीत. आपणांस समजावुन सांगतो की, १९ दिवसाचे हे जे ७ कोटी ६० लाख रुपये आहे याची भरपाई कशी केली जाईल?

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**१९ दिवसाचे जकात करापोटी जे ७ कोटी ६० लाख रुपये येणार होते त्याबदल्यात स्थानिक संस्था कराच्या रुपयाने किती रक्कम येणार आहे?

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**स्थानिक संस्था कर लागु होण्याच्या किमान ८ दिवस अगोदर शासनाने तसे कळविणे आवश्यक होते.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**हे ७ कोटी ६० लाख रुपये आयुक्तांच्या पगारातुन वसुल करायचे की, अधिका—यांचे पगार बंद करायचे?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**१ एप्रिलपासुन स्थानिक संस्था कर लागु करण्यासंदर्भात शासनाची जी अधिसूचना आहे ती मराठीत आहे. ती मी आपणांस वाचुन दाखवितो.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कर लागु करण्यात आला होता त्यावेळेस सुरुवातीला त्यांचे जे नुकसान झाले होते त्याची शासनाने त्यांना भरपाई करुन दिली होती.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**औरंगाबाद महानगरपालिकेत जर त्याची भरपाई मिळाली असेल तर आपणांसही नुकसान भरपाई मिळाली पाहिजे, त्यासाठी आपण शासनाकडे एक सर्वपक्षिय शिष्टमंडळ घेवुन जावे.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:—**आयुक्तांनी अर्थसंकल्पीय अंदाज काय तयार केला आहे? तो त्यांना वाचुन दाखवु दया.

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—** सन २०१२—१३ साठी तयार केलेला अर्थसंकल्पीय अंदाज मी आपणांस वाचुन दाखवितो.

**मा. स्थायी समिती सभापती , नुकत्याच गठीत झालेल्या 16 व्या स्थायी समितीचे नवनिर्वाचित सन्माननिय सदस्य व अधिकारी आपणा सर्वांना अर्थसंकल्पाच्या हार्दीक शुभेच्छा .**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम 63 व 66 अन्वये पार पाडाव्या लागणा—या कार्य व कर्तव्यासाठी मर्यादित उत्पन्नाच्या स्त्रोत्राव्दारे प्राप्त होणा—या उत्पन्नामधून पायाभूत सुविधांना प्राधान्य देणारा , अपूर्ण कामांना पुर्णत्वाकडे नेणारा व समाजातील सर्व घटकांना न्याय देणारा वर्ष 2012—2013 साठी जमा व खर्चाचा अंदाज सादर करण्यात येत आहे .**

अधिनियमातील कलम 95 नुसार आयुक्तांनी उत्पन्न व खर्चाचे अंदाज मा. स्थायी समिती समोर सादर केल्यानंतर त्यामधून मा. स्थायी समितीने अंदाजपत्रक तयार करावयाचे असते . सदर प्रक्रिया पुर्ण करणेसाठी उत्पन्न व खर्चाच्या विविध लेखा शीर्षातून अपेक्षित उत्पन्नाचा व खर्चाचा तपषिल सादर करणे आवष्यक आहे व तो पुढील प्रमाणे आहे .

स्थानिक संस्था कर :—

आपणा सर्वांना ज्ञात आहे की, राज्य शासनाने दिनांक 31/3/2012 च्या अधिसूचनान्वये उल्हासनगर शहरात उपयोग , उपभोग व विक्री साठी आयात होणा—या मालावर जकातीऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्याचा निर्णय घेतला आहे . त्यानुसार स्थानिक कराची अंमलबजावणी करणेकरिता कर्मचा—यांना प्रषिक्षण व शहरातील व्यापा—यांची (Dealer) नोंदणी करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे . सदर कराची वसुली करण्यासाठी आवष्यक मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येत असून वर्तमानपत्रे, बॅनर, होर्डींग, व इंटरनेट यांच्या माध्यमातून स्थानिक संस्था कराबाबतचे नियम इत्यादी बाबत जनजागृती करण्याचे काम सुरु आहे . वित्तीय वर्ष 2012—13 मध्ये स्थानिक संस्था करापोटी रुपये 155 कोटी रक्कम वसूल करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. स्थानिक संस्था कर हा नविन उपक्रम असून जकाती एवढे उत्पन्न साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात येईल . येथे असे नमूद करावेसे वाटते की, महापालिका म्हणजे जगन्नाथाचा रथ असून तो हाकण्यासाठी सर्व नागरिकांचा सहभाग असणे आवष्यक आहे . सर्वांच्या सहभागाषिवाय रथ हाकणे शक्य होणार नाही त्यासाठी सर्व शहरवासियांनी आपले विविध कर वेळेत भरुन महापालिकेचा आर्थिक गाडा रुळावर आणणे आवष्यक आहे.

मालमत्ता कर :—

महापालिकेचे कार्य व कर्तव्ये पार पाडण्यासाठी मालमत्ता कर हे महापालिका उत्पन्नाचे दुसरे मुख्य साधन आहे . मालमत्ता करात सामान्य कर, रस्ता कर, साफ सफाई कर, वृक्ष कर, पाणी पुरवठा लाभ कर, मल पुरवठा लाभ कर इ. या सर्व करांचा समावेष आहे . प्रत्येक कर आकारणी पोटी सार्वजनिक हित हा एक उद्देष आहे . सदर कर आकारणी मधून महानगरपालिकेला वित्तीय वर्ष 2012—13 साठी रुपये 75 कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

पाणी पट्टी :—

पाणी पुरवठा ही शहराची ज्वलंत समस्या असून ती समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नागरी पुर्नरुत्थान योजने अंतर्गत शहरातील विविध ठिकाणी जलकुंभ उभारणे, पाईपलाईन टाकणे इत्यादी कामाचा रुपये 160 कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेतलेला आहे व त्यातर्गत जवळ जवळ 70 टक्के काम पुर्ण करण्यात आलेले असून ते या वर्षात पुर्ण करण्यात येईल. तसेच सदर प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर प्रत्येक जोडणीवर जलमापक बसविण्यात येणार असून त्यामूळे पाण्याचा अनावष्यक वापर टाळता येईल. तसचे नविन पाईप लाईन मूळे पाणी गळती रोकण्यात यषस्वी झाल्यामूळे महाराष्ट्र

जीवन प्राधिकरणाकडून पाणी खरेदीत बचत होणार आहे . पाणी पट्टीपोटी या वित्तीय वर्षात रुपये 4 कोटी उत्पन्न होईल असे गृहीत धरण्यात आले आहे .

एमआरटीपी अधिनियमाखालील वसुली :—

शहरातील बांधकाम व त्याच्यासाठी परवाने एम.आर.टी.पी. ॲक्ट मधील तरतूदीनुसार देण्यात येतात . सदर परवानगीपोटी विकास शुल्क छाननी फी, रस्त्यावर साहित्य ठेवणे , फी व प्रिमियम इत्यादीची वसुली करण्यात येते . या सर्व बाबींपोटी अर्थसंकल्पीय वर्षात रुपये 7.83 कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त होवू शकेल .

जे.एन.एन.यु.आर.एम. योजना अनुदान व कर्ज :—

जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेतर्गत पाणी पुरवठा, ई—गव्हनर्स व बी.एस.पी. प्रकल्प सुरु आहेत . सदर प्रकल्प राबविण्यासाठी केंद्रषासनाकडून 35 टक्के राज्य शासनाकडून 15 टक्के व 50 टक्के महापालिका हिस्सा आहे . शासन अनुदान व एम.एम.आर.डी.ए. कर्ज या दोन्ही बाबीपोटी या वित्तीय वर्षात रुपये 89 कोटी रक्कम अपेक्षित आहे .

महानगरपालिका मालमत्ता व इतर सेवा :—

महापालिका मार्केट, टाउन हॉल, स्वीमिंग पुल, परवाने व इतर सेवा इत्यादी या माध्यमातून वित्तीय वर्षात रुपये 13.42 उत्पन्न अपेक्षित आहे .

संकीर्ण :—

उपरोक्त सर्व बाबी वगळता उदा. निविदा फॉर्म विक्री, गुंतवणूक व्याज, भंगार विक्री, विविध प्रकारची सुट इत्यादी या बाबीतून रक्कम रुपये 3.84 अपेक्षित आहे .

## खर्च :–

अधिनियमाचे कलम 63 व 66 मध्ये विहित बांधील व ऐच्छिक कार्य व कर्तव्यासाठी उपरोक्त रक्कमेचा विनियोग करण्याबाबतचा तपषिल पुढील प्रमाणे .

वेतन , भत्ते व प्रशासकीय खर्च :—

शहरवासियांना पुरविण्यात येणा–या मुलभूत सेवा व सुविधासाठी कर्मचा–यांची मुख्य भुमिका असते. महापालिकेच्या आस्थापनेवर अंदाजे 2700 कर्मचारी व अधिकारी आहेत व 1246 सेवा निवृत्त कर्मचारी आहेत. शहर विकासाची कामे करतांना सदर कर्मचा–यांना महापालिकेकडून विविध प्रकारची साधनसामुग्री, गणवेष व वाहने इत्यादी पुरवावी लागतात. सदर बाब विचारात घेवून चालू अर्थसंकल्पात रुपये 86.21 कोटी रक्कमेची तरतूद करावी लागणार आहे .

शहर बांधणी व निगा :—

शहरातील मुख्य रस्त्यांची लांबी एकूण — कि.मी. आहे . यापैकी प्रत्येक कॅम्पमधील ब–याच रस्त्यांचा विकास करण्यात आलेला आहे. मागील वर्षात शेवटच्या त्रैमासिक काळात 12 रस्त्यांचे काम हाती घेण्यात आले होते. या अगोदर इतर 8 (आठ) मुख्य रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरण व डांबरीकरण करण्याचे काम सुरु करण्यात आले होते. या सर्व रस्त्यांचे सुधारित प्राकलनासाठी व इतर कामे हाती घेण्यासाठी रुपये 15 कोटी सिमेंट कॉक्रीटीकरण व 10 कोटी डांबरीकरण करण्यासाठी चालु वित्तीय वर्षात तरतूद प्रस्तावीत केली आहे .

घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक आरोग्य :—

शहरातील निर्माण होणा–या कच–याचे संकलन साठवण व वाहतूक या कामासाठी खाजगी ठेकेदारामार्फत करण्यात येत आहे . त्यासाठी आगामी अर्थ संकल्पात ––– कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे तसेच शहरातील नागरिकांना साथीचे रोग व इतर संसर्गजन्य रोग होवू नयेत म्हणून किटकनाशके व जंतुनाशके फवारणीसाठी खरेदी करावी लागणार आहेत व त्यासाठी रक्कम रुपये 9.37 कोटी निधी उपलब्ध करावा लागणार आहे .

महाराष्ट्र अग्निशमन सेवा सुरक्षा अभियान :—

शहराची वाढती लोकसंख्या झपाटयाने होत असलेला शहर विकास तसेच औघोगिकीकरण यामूळे शहरातील आपत्ती व्यवस्थापनासाठी व अग्निशमन यंत्रणा बळकट व सुसज्ज ठेवण्यासाठी तसेच शहरातील नागरिकांचे जिवित व वित्तीय हानी टाळण्यासाठी आवश्यक ती यंत्र सामुग्री , वाहने व अग्निशमन इमारत इत्यादी साठी 4.24 कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आह . त्यापोटी महाराष्ट्र शासनाकडून शासन हिस्सा 35 टक्के रक्कम अनुदान म्हणून प्राप्त होणार आहे .

कुष्ठरोगी व वेडयासाठी सुविधा व इतर राष्ट्रीय कार्यक्रम :—

शासन धोरणानुसार शहरातील अंध, अपंग, वेडे व कुष्ठरोगी यांना सेवा व सुविधा पुरविणे गरजेचे आहे. अशा पिडित व शोषित लोकांना मुलभूत सेवा सुविधा पुरविण्यासाठी महापालिकेचा काही हिस्सा राखून ठेवणे आवश्यक आहे व त्यासाठी रुपये 1.15 कोटीची तरतूद करावी लागणार आहे .

बागबगिचे वृक्ष लागवड व निगा :—

उल्हासनगर शहरामध्ये अनेक छोटी मोठी उदयाने आहेत. सदर उदयानाचा अनेक शहरवासीय लाभ घेत आहेत. सदरची उदयाने सुशोभित ठेवण्याची सर्व जबाबदारी महापालिकेची आहे. उदयाने सुशोभित व सुंदर असली तरच शहराचे सौदर्यात भर पडते. तसेच शहरातील सध्या अस्तित्वात असलेले वृक्ष व शासकीय योजनेनुसार नव्याने लावण्यात येणारी झाडे यांची लागवड देखभाल व दुरुस्ती इत्यादीसाठी महापालिकेस चालू वित्तीय वर्षात ––– कोटी रक्कमेची तरतूद करणे भाग आहे .

## विदयुत रोशनाई :––

महानगरपालिका अंतर्गत करण्यात आलेल्या शहरातील रस्त्यावरील दिव्याची देखभाल दुरुस्ती तसेच नुतनीकरण करणेच्या अनुषंगाने नविन साहित्य खरेदी साठी तसेच राष्ट्रीय व सार्वजनिक उत्सवाचे ठिकाणी विदयुत रोशनाई साठी चालु आर्थिक वर्षात एकूण 6.89 कोटीची तरतूद करण्याचे ठरविले आहे .

## महिला व बाल विकास :––

महाराष्ट्र अधिनियम 1965 व शासन निर्णय क्र. जीईएन–1093/1998/नवि–14 दिनांक 14 जुलै 1993 नुसार महानगरपालिकेने निव्वळ उत्पन्नाच्या 5 टक्के निधी महिला व बाल कल्याणासाठी राखून ठेवणे आवश्यक आहे व महापालिका या तरतूदीनुसार सदर कार्यक्रम राबविण्यासाठी सातत्याने झटत आहे व त्यासाठी खर्च सुध्दा करीत आहे . या योजनेअंतर्गत महापालिकेने अनेक गरजु महिलांना शिलाई मशिन व इतर वस्तुचे वाटप केलेले आहे. व चालु आर्थिक वर्षात या कामासाठी रुपये 3 कोटी तरतूद उपलब्ध करुन दयावी लागणार आहे.

## शिक्षण मंडळ :––

शहरातील महापालिका शिक्षण मंडळ व्दारा संचालित एकूण ------ प्राथमिक शाळा सुरु असून त्यामध्ये एकूण 11 हजार विदयार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना गणवेश, वहया, बुट, रेनकोट इत्यादी तसेच शाळा दुरुस्ती व कर्मचारी वेतनासाठी रुपये 12.85 कोटीची तरतूद चालु अर्थसंकल्पात करावी लागणार आहे.

## एम.आय.डी.सी. व पाणी पुरवठा :–

उल्हासनगर महानगरपालिकेची स्वतःची पाणी स्त्रोत नसल्यामूळे महानगरपालिकेला शहरवासियांना देण्यात येणा–या पाण्याची गरज भागविण्यासाठी एम.आय.डी.सी. कडून शुध्द पाणी खरेदी करुन वाटप करावे लागते. जलवाहिनी, पंप व संपाची देखभाल व दुरुस्ती रुपये 43.53 कोटीची तरतूद करावी लागणार आहे. तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत रुपये 10.6 कोटीची तरतूद करणे आवश्यक आहे.

## जल निसःरण :––

उल्हासनगर शहरातील सांडपाणी वाहून नेण्यासाठी तसेच पावसाचे पाणी व्यवस्थित निचरा होण्यासाठी शहरातील अनेक भागात नविन नाले बांधण्यात येतात . तसेच आस्तित्वातील नाल्याची देखभाल व दुरुस्ती करण्यात येते . यासाठी रुपये 9.66 कोटीची तरतूद करावी लागणार आहे तसेच खेमानी नाला मल निसारण व्यवस्थेसाठी रुपये 10 कोटीची तरतूद करावी लागणार आहे . अशा प्रकारे एकूण 19.66 कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे.

## मल निसःरण :––

उल्हासनगर शहरामध्ये ब–याच वर्षापुर्वी भुयारी गटार योजना राबविण्यात आलेली असून सदर योजना ही लोकसंख्येच्या प्रमाणात अपुरी पडत आहे , ती मोडकळीस आली असून सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी महापालिकेस अनेक अडचणीतून मार्ग काढावा लागत आहे . सदर योजना व्यवस्थीत ठेवण्यासाठी महापालिकेने चालु आर्थिक वर्षात रुपये 5.33 कोटी तरतूद करणे आवश्यक आहे .

नुकत्याच पार पडलेल्या सार्वजनिक निवडणूकीमध्ये नागरिकांनी मोठया अपेक्षा ठेवून नविन सदस्यांना नागरी सेवांचे योग्य नियोजन करुन नागरी समस्या सोडविण्यासाठी मोठया विश्वासाने जनतेचे प्रतिनिधी म्हणून भरघोस मतांनी निवडून दिलेले आहे . त्यांच्या भावनांचा आदर करुन नव निर्वाचित सदस्यांना काही कठोर परंतु जनहिताचे निर्णय घेणे आवश्यक आहे आणि ते घेतील याची मला खात्री आहे .

स्वालंबन व काटकसर या धोरणाशिवाय प्रगती नाही . सदर धोरणानुसार प्रत्येक पै न पै चे योग्य नियोजन करुन शहरवासियांना आवश्यक सेवा व सुविधा पुरविण्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करण्याचे दृष्टीने सन्माननीय सदस्य निर्णय घेतील व एक वास्तववादी व वस्तुनिष्ट अंदाजपत्रक बनवतील अशी आशा बाळगून मी माझे दोन शब्द संपवितो .

जयहिंद !

जय महाराष्ट् !

**विषय :— महानगरपालिकेच्या सन २०११—२०१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१२ —२०१३ चे मुळ अंदाजपत्रक.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज आयुक्तांनी तयार करावयाचे आहे . सदर अंदाजात अधिनियमाचे विविध कलमान्वये महानगरपालिकेस पार पाडावयाची कार्य व कर्तव्ये तसेच प्राथमिक शिक्षण निधीत घ्यावयाच्या अनुदानाची रक्कम अशा बाबींसंबधी कराव्या लागणा—या खर्चाची तरतुद करणे आवश्यक आहे . तसेच पुढील वर्षात या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे कर लादणे आवश्यक असेल अशा कराधानासंबधीच्या प्रस्तावांचे विवरण पत्र व कराधाना पासून मिळणा—या जमा रक्कमांचे अदांज ही सादर करणे आवश्यक आहे .

वरील सर्व बाबी लक्षात घेता, प्रत्येक बाबी अंतर्गत अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च यांचे वर्गीकरणासहित अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रयोजनासाठी सादर करण्यांत येत आहेत. सन २०११—२०१२ चे सुधारीत अंदाज व सन २०१२—२०१३ चे मूळ अंदाजपत्रकासंबधी तपशिल पुढील प्रमाणे.

**सन २०११ — २०१२ चे सुधारीत अंदाजपत्रक :—**

सन २०११—२०१२ साठी एकूण रुपये **४५०.४१ कोटी** चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते . मागील ८ महिन्याचे प्रत्यक्ष उत्पन्न लक्षात घेता, २०११—२०१२ वर्षासाठी खालीप्रमाणे सुधारीत अंदाज तयार करण्यात आले आहे .

**(आकडे हजारात)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | २१४६५९१ | |
| **ब अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | ५९८ | |
| **क अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | ७३४०३७ | २८८१२२६ |
| | | | | |
| **अ अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | १८२३३९९ | |
| **ब अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये** | १८७ | |
| **क अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | १०५६२५८ | २८७९८४४ |

मालमत्ता कर, पाणी पट्टी व अन्य करापोटी अधिक वसुली होईल, महानगरपालिका मालमत्ता विनियोग करण्यात येईल, बांधकाम परवाना फी जास्त जमा होईल असे गृहित धरुन स्थायी समितीने अंदाज तयार केले होते तथापी त्यानुसार वसुली व विनियोग करण्यात आला नाही. प्रत्येक वर्षात विविध कराच्या दरात वाढ न करता उत्पन्नाचे अवास्ताविक अंदाज गृहित धरुन विविध लेखाशीर्षातर्गत विविध प्रकल्पासाठी तरतूद करण्यात येते . वर्षाअखेर उत्पन्नाचे अवास्ताविक उद्दिष्टे पार पाडणे शक्य होत नाही परंतु खर्च मात्र पुर्ण करण्यात येतो . काही वर्षापासून सुरु असलेल्या या प्रथेमूळे कर्जाची अदायगी शक्य होत नाही व ठेकेदार व पुरवठादारांचे थकीत देयकांचे प्रमाणही वाढत चालले आहे . ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे कर्मचा—यांच्या पगारात २० ते २५ टक्के वाढ झालेली आहे. मासिक वेतनात शिफारसीप्रमाणे वाढ देण्यात येत आहे. परंतु कर्मचा—यांना २००६ पासूनची थकबाकी अद्याप अदा करावयाची आहे . महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेत काही प्रकल्प हाती घेतले असून त्यासाठी वर्ष १२—१३ मध्ये महापालिकेस मोठया प्रमाणावर स्वत:चा हिस्सा म्हणून रक्कम गुंतवणूक करावयाची आहे . पाणी पुरवठा योजनेसाठी महापालिकेने ६३ कोटी कर्जाची एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेकडून उभारणी केलेली आहे परंतु प्राकलनीय रक्कमेत अपेक्षीत वाढीमुळे अतिरिक्त १५ कोटी रूपये पर्यंत कर्जाची उभारणी करावी लागेल. त्याची परतफेड पुढील वर्षात सुरु होणार आहे. राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे जकात ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करावयाचा प्रस्ताव विचाराधीन असून सुरुवातीच्या काही वर्षात जकाती ऐवढे उत्पन्न मिळणे कठीण होईल असे वाटते. या सर्व बाबी लक्षात घेता, महापालिकेच्या वित्तीय स्थितीत सुधार होईपर्यंत यापूढे सर्व कामांना पुर्णविराम न दिल्यास तसेच कर व दरात वाढ न केल्यास महापालिकेचे संपूर्ण व्यवस्थापन कोलमडून पडेल अशी शक्यता नाकारता येत नाही.

**सन २०१२—२०१३ चे मूळ अंदाजपत्रक :—**

आर्थिक वर्ष २०११—२०१२ साठी तयार करण्यात आलेला उत्पन्न व खर्चाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

**(आकडे हजारात)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | २४२७५८३ | |
| ब अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | ६६२ | |
| क अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये | १२६०६७८ | ३६८८९२३ |
| अ अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | २०१६४४७ | |
| ब अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | १९३६ | |
| क अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये | २११९५०५ | ४१३७८८८ |

आर्थिक वर्ष २०११—२०१२े अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता, रहाणारी तुट **रुपये** ४४.८९ एवढी पाणी पट्टी, जकात , मालमत्ता कर , टॅंकर भाडे व इतर कर व दरामध्ये वाढ करुन ती भरुन काढणे आवश्यक आहे . मालमत्ता कर, पाणी पट्टी, अग्निशमन फी, टॅंकर भाडे व इतर फी यासंबधीच्या दरात वाढ करणेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात आला आहे .

सबब पुढील आर्थिक वर्षाकरिता करांचे दर निश्चित करणे व अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समितीने अर्थ संकल्पीय अंदाज तयार करणेसाठी कलम ९५ नुसार उत्पन्न व खर्चाचे अंदाज स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

## विषयः— सन् २०१२ — २०१३ या आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता करांचे दर निश्चित करणेबाबत .

सन् २०१२ — २०१३ या आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता करांचे दर निश्चित करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवून महापालिकेने करांचे दर पुढील सरकारी वर्षासाठी प्रकरण ११ मधील विहित केलेल्या मर्यादेस व शर्तीस अधीन राहून निश्चित करणे आवश्यक आहे .

**करांचे प्रचलित व प्रस्तावीत दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे .**

१) **पाणी पटटी :—**

उल्हासनगर शहरातील अनिवासी / वाणिज्य वापर असलेल्या ज्या मिळकतींना नळ जोडणी नाही किंवा महानगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून थेट पाणी पुरवठा केला जात नाही अशा मिळकत धारकाकडून कर योग्य मुल्याच्या १०% दराने पाणी पटट्ी आकारणे प्रस्तावित आहे. सदर वाढ मंजूर केल्यास वार्षिक मागणी मध्ये रुपये २.५० कोटीची भर पडेल. निवासी मिळकती व ज्या मिळकतींना नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा केला जातो अशा मिळकत धारकांकडून आकारावयाच्या पाणी पटट्ीचे दर निर्धारित करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १३० अन्वये स्थायी समितीपुढे स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. .

२) **पाणी पुरवठा लाभ कर :—**

अधिनियमाचे कलम १३०(२)मधील तरतुदीनुसार पाणी पुरवठा लाभ कर महापालिका क्षेत्रात स्थित सर्व जागांच्या बाबतीत आकारण्यात येतो. सद्या या कराचा दर करयोग्य मुल्याच्या ४ % आहे. उल्हासनगर शहराच्या सर्व भागात समान तत्वावर पाणी वितरण करण्यासाठी जवाहरलाल नेहरु योजनेतर्गत १६६ कोटी रक्कमेचे प्रकल्प सुरु करण्यात आला आहे व त्यासाठी एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेकडून ६३ कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात आले आहे. सदर कर्जाची परतफेड व्याजासह पुढील १५ वर्षात करावी लागणार आहे . अधिनियमाचे कलम १२९ (अ) (अ) नुसार भांडवली स्वरुपाचा पाणी पुरवठा करण्यासाठी हे कर लागू करण्याची तरतूद आहे . सदर प्रकल्पासाठी अपेक्षीत एकूण १६६ कोटी रुपयांचे खर्चापैकी फक्त ६३ कोटी कर्जापोटी दरवर्षी अंदाजे ७.५० कोटी रुपयाची परतफेड करावी लागेल . या सर्व बाबींचा विचार करता या कराच्या दरामध्ये

वाढ करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सर्व मिळकतीवर करयोग्य मुल्याचा ५ टक्के दराने कर लावण्याचे प्रस्तावीत आहे. सदर दर वाढीमुळे महसुली उत्पन्नात ०.६० कोटी वाढ अपेक्षित आहे .

३) **मलप्रवाह कर:—**

मलप्रवाह कर किंवा साफसफाई कर कोणत्या जागांवर बसवावयाचा याचा तपशिल अधिनियमाचे कलम १३१ मध्ये देण्यात आलेले आहे. सद्या करयोग्य मुल्याच्या ६ % दराने हा कर आकारला जातो. शहरातील साफसफाई कर मोठया प्रमाणावर होणारा खर्च लक्षात घेता , यामध्ये १ % दरवाढ प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर दर वाढीमुळे महसुली उत्पन्नात ०.६० कोटी वाढ अपेक्षित आहे .

४) **मलप्रवाह सुविधा लाभ कर:—**

सद्या या कराचा दर करयोग्य मुल्याच्या २ % आहे. महापालिकेने वर्ष १९८०—८६ दरम्यान शहरातील भुयारी गटार योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत अंदाजे ११ कोटी रुपयांची कर्ज उभारणी केली होती. व त्यापोटी सध्या महापालिकेस प्रति वर्ष अंदाजे रुपये १ कोटी कर्ज परत फेड करावी लागत आहे. शिवाय जेएनएनयुआरएम योजनेत २५७ कोटीचा भुयारी गटार प्रकल्प सादर करण्यात आला आहे महापालिकेने भुयारी योजने अंतर्गत घेतलेल्या कर्जाची परतफेड व जवाहरलाल नेहरु योजनेतर्गत सुधारित प्रकल्प राबविणेसाठी लागणा—या निधीचा विचार करता सध्याचे महापालिकेचे उत्पन्न कमी वाटत आहे . .त्यामुळे सदर करात वाढ करून तो ३ टक्के करावा असे प्रस्तावित असुन त्यापोटी ०.६० कोटी उत्पन्न होईल.

५) **सामान्य कर:—**

अधिनियमाचे कलम १२९ (क) मधील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्रातील मिळकतींच्या करयोग्य मुल्याच्या १२ % पेक्षा कमी नसतील या दराने सामान्य कर आकारण्यात येतो. सद्या करयोग्य मुल्याच्या २६ % दराने सामान्य कर आकारणी केला जातो. यात २ % दर वाढ प्रस्तावित आहे. सदर दर वाढीमुळे महसुली उत्पन्नात १.२० कोटी वाढ अपेक्षित आहे .

५ अ) **अग्निशमन कर:— (Fire Tax)**

शहरातील आग विझविण्यासाठी व आगीपासून जिवित व मालमत्ता यांचे संरक्षण करण्यासाठी योग्य त्या यंत्रसामुग्रीसह सुसज्ज असे अग्निशमन पथक तयार ठेवणे अशा बाबीसाठी तरतुद करणे महापालिकेस बंधनकारक आहे . अशी सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी करयोग्य मुल्याच्या कमीत कमी १/८ टक्के इतकी आणि जास्तीत जास्त २ टक्के इतके मुल्य सामान्य करात समाविष्ट करण्याचे अनुज्ञेय आहे. वरील कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी सर्व प्रकारच्या मालमत्तांवर अग्निशमन कर २ टक्के दराने आकारण्याचे प्रस्तावीत आहे. व त्यामुळे महापालिकेस १.२० कोटी रुपये मिळतील.

६) **रस्ता कर :—**

अधिनियमाचे कलम १४८ (क) मधील तरतूदीनुसार महापालिका क्षेत्रातील इमारती व जमीनीवर कर योग्य मुल्याच्या १०% हून अधिक होणार नाही या दराने रस्ता कर बसविता येतो. सद्या सदर कर करयोग्य मुल्याचे ६ % आकारला जातो. महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत मुख्य रस्त्यांचा विकास कार्यक्रम हाती घेतलेला होता. सदर विकास कार्यक्रमांअतर्गत रुपये १६.५ कोटी कर्ज मुंबई महानगर विकास प्राधिकरण मार्फत घेतलेले आहे. या कर्जाच्या सहव्याज परतफेडीसाठी रुपये २ कोटी २८ लक्ष प्रतिवर्ष भरावे लागत आहे. शिवाय जेएनएनयुआरएम अंतर्गत नवीन रस्त्यांचे विकास कार्य महानगरपालिकेने हाती घेण्याचे योजले आहे. महानगरपालिका क्षेत्रात

नविन रस्त्यांची बांधणी करणे व अस्तित्वातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती साठी लागणा—या निधीची तीव्र टंचाई भासत आहे. व ती अल्पशा: प्रमाणात दुर करण्यासाठी रस्ता करामध्ये दर वाढ प्रस्तावित करण्यात येत असून तो कर योग्य मुल्याच्या ७% दराने आकारण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे महापालिकेस ०.६० कोटी उत्पन्न प्राप्त होणार आहे .

अधिनियमातील तरतुदी विचारात घेवून मालमत्ता कर, शिक्षण उपकर, अग्निशमन कर रस्ता कर व वृक्ष उपकर या करांच्या कमाल व किमान मर्यादा व प्रचलित दर व प्रस्तावित दर परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केले आहेत, कृपया त्याचे अवलोकन व्हावे .

सबब, सन् २०१२—२०१३ या आर्थिक वर्षासाठी कराचे दर निश्चित करण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

## परिशिष्ट

## सन २०१२ — २०१३ या सालासाठी मालमत्ता कर व इतर करांचे प्रस्तावित केलेले दर

| करांचे नाव | कायद्यातील तरतुदी | किमान दर (%) | कमाल दर (%) | सन २०११ —१२ चे प्रचलित दर (%) | सन२०१२—१३ साठी प्रस्तावित दर करयोग्य मुल्यावर (%) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| पाणी पट्टी | १२९ (अ) | — | — | — | १० | दर वाढ प्रस्तावित (फक्त अनिवासी वाणिज्य मिळकतीसाठी ज्यांना नळ जोडणी नाही.) |
| पाणी पु लाभ कर | १२९ (अअ), १३० (२) | — | — | ४ | ५ | दर वाढ प्रस्तावित |
| मल कर/साफस कर | १२९ (ब), १३१ | | | ६ | ७ | दर वाढ प्रस्तावित |
| मलप्रवाह सुविधा लाभ | १२९ (बब), १३१ | | | २ | ३ | दर वाढ प्रस्तावित |
| सामान्य क | १२९ (क), १३२ | १२ | — | २६ | २८ | दर वाढ प्रस्तावित |
| अग्निशमन | १२९ क | १/८ | २ | — | २ | दर वाढ प्रस्तावित |
| रस्ता कर | १४८ (क) | — | १० | ७ | ८ | दर वाढ प्रस्तावित |

<u>विषयः- वर्ष २०१२-१३ करीता भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणेबाबत.</u>

सद्यस्थितीत शहरात अस्तित्वात असलेल्या इमारतीचे किंवा जमिनीचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार (आरसीसी, पत्रेविटा, टियर

गरडर), मिळकतीचा वापर (निवासी/अनिवासी) व परिसरातील उपलब्ध मुलभूत सोयीसुविधा यावर आधारीत करयोग्य मुल्यावर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येत आहे.

राज्य शासनाने सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करून इमारती व जमिनीचे भांडवली मुल्यावर मालमत्ता कर बसविण्याचे प्रयोजन केले आहे. त्याचा सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**भांडवली मूल्य**

मालमत्ता कर आकारणी योग्य असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य निश्चित करण्यासाठी, आयुक्त, मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या तरतुदीन्वये तयार केलेले मुंबई मुद्रांक (संपत्तीचे वास्तवीक बाजार मूल्य ठरविणे) नियम १९९५ अन्वये तयार केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये दर्शविलेले कोणत्याही इमारती किंवा जमिनीचे मुल्य लक्षात येईल अथवा जिचे भांडवली मूल्य निर्धारीत करणे आवश्यक आहे अशी इमारत किंवा जमिन ज्या क्षेत्रातील असेल अशा कोणत्याही विशिष्ट क्षेत्रातील कोणत्याही मालमत्तांचे मूल्य मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये दाखविण्यात आले नसेल तर किंवा एखादया वेळी असे मुद्रांक शुल्क सिध्द गणक अस्तित्वात आले नसेल तर, त्याबाबतीत आयुक्तास, अशा इमारतीचे किंवा जमिनीचे बाजार मूल्य आधारभूत मूल्य म्हणुन, विचारात घेवून, तसेच पूढील घटक देखील विचारात घेवून तिचे भांडवली मूल्य निश्चित करता येईल.

(क) जमिनीचे स्वरूप व प्रकार आणि इमारतीची संरचना;

(ख) जमिनीचे क्षेत्र किंवा इमारतीचे चटई क्षेत्र;

(ग) वापरकर्ता प्रवर्ग म्हणजे (एक) निवासी, (दोन) वाणिज्यिक (दुकाने, किंवा तत्सम), (तीन) कार्यालये, (चार) हॉटेले (चार तारांकितपर्यंत), (पाच) हॉटेले (चार तारांकितपेक्षा अधिक), (सहा) बॅंका, (सात) उद्योग व कारखाने, (आठ) शालेय व महाविद्यालयीन इमारत किंवा शैक्षणिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी इमारत (नऊ) मॉल, आणि (दहा) वरीलपैंकी कोणत्याही प्रवर्गामध्ये समाविष्ट नसलेली अन्य कोणतीही इमारत किंवा जमिन;

(घ) इमारत किती वर्ष जूनी आहे; किंवा

(ड) पोट नियम (२) अन्वये केलेल्या विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे अन्य काही घटक.

(२) आयुक्त, पोट-नियम (१) अन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता स्थायी समितीच्या मान्यतेने, इमारतीच्या किंवा जमिनीच्या प्रवर्गाचा तपशिलांच्या बाबतीत अशा विविध प्रवर्गाना नेमून घावयाच्या बहुविध भारांकाच्या बाबतीत विनियम तयार करील.

(३) कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे पोट-नियम (१) अन्वये निश्चित केलेले भांडवली मूल्य दर पाच वर्षांनी सुधारित करता येईल.

**मालमत्ता करांमध्ये समाविष्ट असलेले कर व आकारणी दर :- या अधिनियमाअंतर्गत पुढीलप्रमाणे करांचा समावेश असेल.**

१. या अधिनियमान्वये शहरातील इमारती व जमिनी यांवर बसवता येण्याजोग्या मालमत्ता करात, पाणीपट्टी, पाणी लाभ कर, मलनिःसारण कर, मलनिःसारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार यांचा समावेश होईल.

२. भांडवली मूल्याच्या ०.१ टक्क्यांहून कमी नाही आणि १ टक्क्यांहून अधिक नाही असा सर्वसाधारण कर.

३. प्रकरण- सोळा अन्वये बसवता येण्याजोगा सुधार आकार

**मर्यादा**

या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, परंतु पोट-कलम (१) च्या परंतुकामध्ये व स्पष्टीकरणामध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त महानगरपालिकेला कलम ९९ च्या तरतुदीनुसार तिला निर्धारीत करता येईल अशा दरांनी व अशा दिनांकास आणि त्या दिनांकापासुन इमारतीच्या व जमिनीच्या भांडवली मूल्यांच्या आधारे शहरातील इमारतींवर व जमिनींवर मालमत्ता कर बसविण्याची पध्द्त स्वीकारण्याचा ठराव संमत करता येईल.

परंतु, भांडवली मूल्यावर असा मालमत्ता कर बसविण्यात आला असेल अशा दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी, असा कर-

(एक)निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतींच्या बाबतीत, अशा दिनांकाच्या लगतपुर्वीच्या वर्षामध्ये त्यांच्याबाबतीत बसवता येण्याजोग्या असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या दुप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही, आणि

(दोन)अनिवासी प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत, अशा दिनांकाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये त्यांच्याबाबतीत बसवता येण्याजोग्या असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या तिप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही;

परंतु, आणखी असे की, अनूसूची 'ड' च्या प्रकरण आठ मधील कराधान निमयाच्या नियम ७-अ च्या पोट नियम (३) अन्वये सुधारीत केलेल्या कोणत्याही इमारतींच्या किंवा जमिनींच्या, भांडवली मूल्याच्या आधारे बसवलेला मालमत्ता कर हा, काहीही झाले तरी, अशा सुधारणा केलेल्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये देय असलेल्या मालमत्ता कराच्या ४० टक्के इतक्या रकमेहून अधिक असणार नाही

परंतू तसे, या पोट-कलमान्वये भांडवली मूल्य हा आधार सूमजून मालमत्ता कर बसविण्याचा स्वीकार केल्याच्या वर्षापासून सुरू होणाऱ्या पाच वर्षाच्या कालावधीकरीता ४६.४५ चौरस मीटर (५०० चौरस फुट) किंवा त्यापेक्षा कमी फरसबंद क्षेत्र असलेल्या निवासी इमारतीच्या किंवा निवासी गाळयाच्या संबंधात बसवावयाची मालमत्ता कराची रक्कम, भांडवली मूल्य हा आधार समजून मालमत्ता कर बसविण्याचा स्वीकार केल्याच्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये बसविलेल्या व देय असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण**:- या कलमाच्या प्रयोजनांसाठी, महानगरपालिकेने, भांडवली मूल्य हा आधार समजून, मालमत्ता कर बसविण्याच्या स्वीकार केल्यानंतर, करयोग्य इमारतींच्या संबंधातील मालमत्ता करांमध्ये, प्रत्येक पाच वर्षानंतर सुधारणा करण्यात येईल आणि अशा प्रत्येक सुधारणेनंतर, अशी मालमत्ता कराची रक्कम, कोणत्याही बाबतीत सुधारणा केल्याच्या वर्षाच्या लगत पुर्वीच्या वर्षामध्ये बसविलेल्या व देय असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या चाळीस टक्क्यांहून अधिक असणार नाही.

**भाडेमूल्यावर आधारीत करआकारणी खालीलप्रमाणे असते.**

**जागेचे वार्षिक भाडे** त्र जागेचा उल्हासनगर महानगरपालिकेने विभागवार ठरविलेले मार्गदर्शक भाडयाचा दर ग १२

**करयोग्य मूल्य** त्र जागेचे वार्षिक भाडे - १० टक्के वजावट

**देय कराची रक्कम** त्र करयोग्य मुल्य ग कराचा दर

यानुसार एखादी बांधलेली रहिवासी जागा ५०१ चौ.फुट ;चटई क्षेत्रद्ध ;शिवाजी चौक, उल्हासनगर-३ आतील भागद्ध आहे. उल्हासनगर महानगरपालिका मार्गदर्शक दर रू. २०.३०८ प्रति चौ.फुट प्रति वर्ष. जागेवरील बांधकाम आरसीसी प्रकार व निवासी वापर. वर्ष २००३ नंतरचे बांधकाम असेल तर करयोग्य मुल्यावर आधारीत कर आकारणी खालीलप्रमाणे असेल.

**जागेचे वार्षिक भाडे** त्र १.८५९ ग ५०१ ग १२

**करयोग्य मूल्य** त्र ११,१७६ - १११८ त्र १००५८

**देय कराची रक्कम** त्र १००५८ ग कराचा दर (५०.५० टक्के) त्र ५०७९

<u>**भांडवली मुल्यावर आधारीत करआकारणी खालीलप्रमाणे असते.**</u>

**भांडवली मूल्य** त्र जागेचे महाराष्ट्र दुयम निबंधक कार्यालयाद्वारे ठरविलेले मुल्य ग जागेचे क्षेत्रफळ ग बांधकामाच्या प्रकाराचा गुणक ग बांधकामाच्या वयाचा गुणक ग वापराच्या प्रकाराचा गुणक

**देय कराची रक्कम** त्र भांडवली मुल्य ग कराचा दर

यानुसार एखादी बांधलेली रहिवासी जागा ६०० चौ.फुट ;बिल्टअप एरीयाद्ध ;शिवाजी चौक, उल्हासनगर-३द्ध आहे व त्याठिकाणी महाराष्ट्र शासनाने दुयम निबंधक कार्यालयाद्वारे ठरविलेले मूल्य (रेडीरेकनर) नुसार रू. १४४०/- प्रति चौ.फुट. असेल व जागेवरील बांधकाम आरसीसी प्रकार व निवासी वापर होत असेल आणि सदरचे बांधकाम ५ वर्ष जुने असेल तर भांडवली मुल्यावर आधारीत कर आकारणी खालीलप्रमाणे असेल.

**भांडवली मूल्य** त्र ६०० ग १४४० ग १.०० ग १.०० ग १.०० त्र ८६४०००

**देय कराची रक्कम** त्र ८६४००० ग कराचा दर (०.९१ टक्के) त्र ७८६२

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील विहीत कराव्यतिरिक्त वृक्ष कर, महाराष्ट शासनाच्यावतीने शिक्षण कर, रोजगार हमी उपकर, मोठया निवासी जागांवरील कराची आकारणी करण्यात येईल.

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. तेविआ २०१०/प्र.क्र. १३१/२०१०/नवि-४, दिनांक २५/१०/२०१० नुसार १३ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगासाठी काही निकषापैंकी भांडवली मुल्यावर आधारीत कर आकारणी अंमलबजावणी संदर्भात पुढीलप्रमाणे निकष निश्चित केला आहे.

ज्या ड वर्ग महानगरपालिका आपल्या क्षेत्रात भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी सुरू करतील त्या ड वर्ग महानगरपालिकांमध्ये अशा आकारणीच्या पहिल्या वर्षी सदर १५ः निधीमधुन १/३ निधी उत्तेजनार्थ वितरीत करण्यात येईल. एखादया वर्षी राज्यातील कोणत्याही महानगरपालिकेने भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर प्रणाली लागु केली नाही तर सदर १/३ निधी हा ज्या ड वर्ग महानगरपालिकांमध्ये त्यावर्षी स्थानिक संस्था कर लागु करण्यात आला आहे, अशा महानगरपालिकांमध्ये वितरीत करण्यात येईल.

भांडवली मुल्यावर आधारीत कर आकारणीचा प्रस्ताव वर्ष २०११ मध्ये ही सादर करण्यात आला होता परंतु,महासभेने मान्यता दिलेली नाही.

सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा केलेप्रमाणे उल्हासनगर क्षेत्रात करयोग्य मूल्य ऐवजी भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणेसाठी प्रारूप विनियम मंजुरीकरीता मा. स्थायी समिती प्रटलावर फेरसादर प्रस्तावित करण्यात येत आहे.

## इमारती व जमिनी यांचे भांडवली मूल्य निश्चित करण्यासाठी विनियम.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कराधान नियमातील कलम ७अ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आयुक्त, उक्त पोट-कलम (७अ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे उल्हासनगर मध्ये इमारती व जमिनी यांच्या वापरकर्त्यांच्या घटकांसाठी आणि प्रवर्गासाठी आणि इमारती व जमिनी यांचे भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा

विविध घटकांना आणि प्रवर्गांना द्यावयाच्या बहुविध भारांकाच्या बाबतीत तरतूद करण्याकरीता, पुढील विनियम करीत आहे :-

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :- (१) या विनियमांना, इमारतींच्या किंवा जमिनींच्या वापरकर्त्यांच्या घटकांना व प्रवर्गांना (बहुविध भारांक देणे) भांडवली मूल्य निश्चित करणे नियम, २०११ असे म्हणावे.

(२) ते महासभेच्या मंजुरीनंतर तात्काळ अंमलात येतील.

२. व्याख्या :- या नियमांमध्ये, अन्यथा दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(क) ‘‘अधिनियम’’ याचा अर्थ, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ असा आहे.

(ख) ‘‘सदनिका’’ याचा अर्थ, निवासी किंवा कार्यालय किंवा शोरूम किंवा दुकान किंवा गोदाम यांकरिता किंवा कोणताही उद्योग किंवा कामधंदा किंवा व्यवसाय चालविण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असणाऱ्या एखाद्या इमारतीचा एक स्वतंत्र भाग किंवा त्याचा भाग, असा आहे.

(ग) ‘‘जाहिरात फलक’’ यात जाहिरात दाखविण्यासाठी वापरात येणारे फलक, खांबावर, जमिनीवर किंवा इमारतींवर उभारलेले फलक यांचा समावेश होतो.

(घ) ‘‘सिध्दगणक’’ याचा अर्थ, अधिनियम कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) मध्ये, उल्लेखिलेंले त्या त्या वेळी अंमलात असलेले मुद्रांक शुल्क सिध्दगणक, असा आहे.

(ड) ‘‘अनूसूची’’ याचा अर्थ, या नियमांना जोडलेली अनुसूची, असा आहे.

(च) ‘‘कलम’’ याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे.

(छ) ‘‘टॉवर’’ यात, इमारतीच्या भूपृष्ठावर किंवा इमारतीवर अथवा इमारतीच्या अल्य कोणत्याही खुल्या जागेवर उभारलेल्या दूरचित्रवाणी टॉवर, केबल टॉवर, टेलिकॉम टॉवर किंवा असा कोणताही अन्य टॉवर, सेल्यूलर ॲन्टेना, प्रसारमाध्यम ॲन्टेना किंवा यासारखी ॲन्टेना, यांचा समावेश होतो.

(ज) ‘‘खुली जमीन’’ यात, बांधकाम न झालेली खुली जागा किंवा बांधकाम करण्यात येत असलेली जमीन यांचा समावेश होतो. परंतू, इमारतींना लागून असलेल्या जमिनीचा समावेश होत नाही.

(झ) या नियमांमध्ये वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, -

(एक) परंतु अधिनियमामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अनुक्रमे अधिनियमामध्ये नेमून दिलेले अर्थ असतील, किंवा

(दोन) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ किंवा उल्हासनगर विकास नियंत्रण विनियम अथवा त्यात्या वेळी अंमलात असलेले असे कोणतेही विनियम यांमध्ये व्याख्या केली असेल असे शब्द व शब्दप्रयोग यांना, आवश्यक असेल अशा संदर्भाप्रमाणे उक्त नगररचना अधिनियम किंवा विकास नियंत्रण विनियम यांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले असतील तेच अर्थ असतील.

३. खुल्या जमिनीचे भांडवली मूल्य :- या नियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, इमारतीच्या प्रसीमांमध्ये इमारतील लागून असलेल्या जमिनीव्यतिरिक्त रिक्त जमीन असेल तर, अशी जमिन ही, खुली जमीन असल्याचे समजण्यात येईल आणि नियम ४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तद्नूसार, त्याचे भांडवली मूल्य निश्चित करण्यात येईल.

४. खुल्या जमिनीचे वापरकर्ता प्रवर्ग आणि त्यांना द्यावयाचे बहुविध भारांक :- खुल्या जमिनीचे वापरकर्ता प्रवर्ग हे, अनुसूची ‘अ’ च्या भाग एक च्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील आणि भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता त्यांना द्यावयाच्या अनुक्रमे आधारभूत मूल्याच्या बहुविध भारांक हा अनुसूची ‘अ’ च्या उक्त भाग एक च्या स्तंभ (३) मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल.

५. इमारती किंवा त्याचा भाग यांचे वापरकर्ता प्रवर्ग आणि त्यांना द्यावयाचे बहुविध भारांक :- इमारती किंवा त्यांचा भाग यांचे वापरकर्ता प्रवर्ग हे, अनुसूची ‘अ’ च्या प्रत्येक भाग दोन, तीन व चार च्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील आणि भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता त्यांना द्यावयाच्या अनुक्रमे आधारभूत मूल्याच्या बहुविध भारांक हा अनुसूची ‘अ’ च्या प्रत्येक उक्त भाग दोन, तीन व चार च्या स्तंभ (३) मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल.

६. इमारतीचे स्वरूप व प्रकार आणि त्यांना द्यावयाचे बहुविध भारांक :- इमारतीचे स्वरूप व प्रकार हा, अनुसूची ‘ब’ स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल आणि भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता, त्यांना द्यावयाचा बहुविध

भारांक हा, उक्त अनूसूची ‘ब’ च्या स्तंभ (३) मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल.

७. एखाद्या इमारतीला द्यावयाचा बहुविध भारांक हा त्याच्या वयोमानाप्रमाणे असेल :- भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी, एखाद्या इमारतीला त्याच्या वयोमानाप्रमाणे द्यावयाचा बहुविध भारांक हा, अनुसूची ‘क’ स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या इमारतीच्या वयोमानानुसार असेल आणि त्यांना द्यावयाचा बहुविध भारांक हा, उक्त अनूसूची ‘क’ च्या स्तंभ (३) मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल.

८. भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी जाहिरात फलक किंवा टॉवरचे क्षेत्र :- भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी, जाहिरात फलक किंवा टॉवरचे क्षेत्र याचा अर्थ :-

(क) जाहिरात फलकाच्या बाबतीत, जाहिरात फलक ज्या खांबावर उभारण्यात आला आहे अशा खांबाच चौकडीचे चौरस क्षेत्र अधिक जाहिरात फलकाचे क्षेत्र, असा आहे आणि

(ख) टॉवरच्या बाबतीत, पायाच्या चौकडीने समाविष्ट असलेले क्षेत्र गुणिले टॉवरची एकुण उंची, असा आहे.

९. भांडवली मूल्य येण्याच्या प्रयोजनासाठी, बांधीव क्षेत्र :- (१) सिध्दगणकामध्ये तरतूद केलेल्या आधारभूत मूल्याच्या संबंधित दराने एखाद्या इमारतीचे भांडवली मूल्य निश्चित करण्यासाठी, विचारात घ्यावयाच्या एकूण बांधीव क्षेत्रामध्ये,-

(क) पुढील गोष्टींचा समावेश असेल :-

(एक) केवळ ताब्यात असलेली गच्ची, (दोन) पोटकलम, (तीन) सेवा मजला, (चार) पोडियम, (पाच) तळमजला, (सहा) स्टिल्ट, (सात) माळा (लॉफ्ट), (आठ) फ्लॉवरबेड, (नऊ) वॉचमन केबिन, (दहा) आराम क्षेत्र, (अकरा) छत, (बारा) द्वारमंडप (पोर्च), (तेरा) प्रवेश सभाकक्ष (एन्ट्रन्स लॉबी), (चौदा) आरामकक्ष, (पंधरा) वातानुकूलित संयंत्र कक्षासह वातानुकूलित संयंत्र, (सोळा) एअर हॅडलींग कक्ष, (सतरा) मलप्रवाह प्रक्रिया संयंत्राकरीता बांधकामाचे क्षेत्र, (अठरा) वाहिनी, आणि (एकोणीस) निच,

(ख) परंतू पुढील गोष्टींचा समावेश असणार नाही :- (एक) वरच्या शेवटच्या मजल्यावरील उद्वाहन कक्ष, (दोन) लिफ्ट वेल, (तीन) जिनाकक्षासह जिना आणि त्याची जागा, (चार) चिमणी आणि उद्वाहक टाकी, (पाच) मीटर कक्ष, (सहा)

पंप कक्ष, (सात) जमिनीखालील आणि वरील पाण्याची टाकी आणि, (आठ) मलकुंड

(२) महानगरपालिकेच्या अभिलेखामध्ये इमारतीचे फरसबंद क्षेत्र उपलब्ध असेल आणि बांधीव क्षेत्र सहजरित्या निश्चित करता येत नसेल तर, बांधीव क्षेत्र खाली दर्शविल्याप्रमाणे येईलः-

(क) बांधीव क्षेत्र ≡ १.२ ग फरसबंद क्षेत्र, अधिक

(ख) पोट नियम (१) च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही किंवा सवर्ब बार्बींची क्षेत्रे, जर समाविष्ट नसल्यास

१०. खुल्या गच्चीच्या भांडवली मूल्याची निश्चिती :- सदनिकेला जोडलेल्या खुल्या गच्चीचा संपूर्ण ताबा असेल तर, त्याचे भांडवली मूल्य, अशा सदनिकेला लागू असलेल्या ४० टक्के दराने निश्चित करण्यात येईल.

११. पोटमजला, माळा (लॉफ्ट) आणि ॲटिक मजला यांच्या भांडवली मूल्याची निश्चितीः- (क) पोटमजल्याचे भांडवली मूल्य हे, पोटमजल्यावरील सदनिकेला लागू असलेल्या दराच्या ७० टक्के इतक्या दराने निश्चित करण्यात येईल.

(ख) माळा (लॉफ्ट) आणि ॲटिक मजल्याचे भांडवली मूल्य हे, माळा (लॉफ्ट) किंवा यथास्थिती ॲटिक मजला यांना लागू असलेल्या दराच्या ५० टक्के इतक्या दराने निश्चित करण्यात येईल.

१२. बांधकाम पाडलेल्या इमारतीच्या संबंधात भांडवली मूल्याची निश्चिती :-

(१) एखादी इमारत पुर्णपणे पाडण्यात आली असेल आणि ती जमीन संपूर्ण रिकामी असेल तर, ती रिक्त जमीन असल्याचे मानण्यात येईल आणि ती ‘खुली जमीन’ असे समजण्यात येईल, तिचे भांडवली मूल्य, नियम ४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तद्नूसार निश्चित करण्यात येईल.

स्पष्टीकरणः- या नियमाच्या प्रयोजनार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, जेथे एखादी इमारत पाडण्यात आली असेल किंवा पाडण्यात यत असेल तर परिणामी ती जमीन रिक्त असेल किंवा रिक्त करून देण्यात आली असेल किंवा केवळ भिंत किंवा तत्सम काही असेल परंतु तेथे ज्याचा भोगवटा सांगता येईल असे कोणत्याही प्रकारचे बांधकाम नसेल आणि असे बांधकाम पाडल्यावर पाडलेल्या इमारतीचा

ढिगारा किंवा कोणताही उर्वरीत भाग अद्याप दूर केलेला नसेल तर, अशा इमारतीची जमीन ही रिक्त जमीन असल्याचे मानण्यात येईल.

(२) जेथे एखाद्या इमारतीचा केवळ भाग पाडण्यात आला असेल आणि उर्वरीत भागाचा भोगवटादार भोगवटा करीत असतील तर, पाडण्यात आलेल्या इमारतीच्या भागाची जमीन ही, रिक्त जमीन असल्याचे मानण्यात येईल आणि भोगवटयात असलेल्या बांधकामाचा भाग हा त्याचे भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी एखादी इमारत असल्याचे समजण्यात येईल.

१३. १ चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा अधिक किंवा विकास हक्काचे हस्तांतरण (टीडीआर) यांचा वापर करण्याची क्षमता असणाऱ्या खुल्या जमिनीचे मूल्यांकन :- सिध्द् गणकाप्रमाणे, १ चटईक्षेत्र निर्देशांकासह खुल्या जमिनीच्या आधारभूत मूल्याच्या दराकरिता अशी तरतूद आहे की, १ चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा अधिक किंवा कोणत्याही विकास हक्काचे हस्तांतरण यांचा वापर करण्याची क्षमता असणाऱ्या खुल्या जमिनीचे, आयुक्ताकडे मान्यतेकरिता सादर केलेल्या इमारतीच्या आराखडयाअन्वये वापर करावयाच्या आणि मान्यता द्यावयाच्या प्रस्तावित उच्च चटईक्षेत्र निर्देशांकाच्या किंवा विकास हक्काच्या हस्तांतरणाच्या प्रमाणात वाढीव दराने मूल्यांकन करण्यात येईल.

१४. अधिनियम आणि या नियमांच्या तरतुदींअन्वये खुल्या जमिनीचे किंवा इमारतीचे भांडवली मूल्य पुढील रीतीने निश्चित करण्यात येईल :-

(१) खुल्या जमिनीचे भांडवली मूल्य :- सिध्द गणकानुसार खुल्या जमिनीचे आधारभूत मूल्य ग वापरकर्ता प्रवर्गानूसार (अनूसूची 'अ' चा भाग एक) बहुविध भारांक ग अनूज्ञेय किंवा मान्यताप्राप्त चटई क्षेत्र निर्देशांक ग जमिनीचे क्षेत्र

**सीव्ही त्र बीव्ही ग युसी ग एफएसआय ग एएल**

२) इमारतीचे भांडवली मूल्य :- सिध्द गणकानुसार इमारतीचे संबंधित आधारभूत मूल्य ग वापरकर्ता प्रवर्गानूसार (अनूसूची 'अ' च्या भाग दोन, तीन किंवा यथास्थिती, चार) ग इमारतीचे स्वरूप व प्रकार यानुसार बहुविध भारांक (अनूसूची 'ब') ग

इमारतीच्या वयोमानाप्रमाणे बहुविध भारांक (अनूसूची ‘क’) ग बांधीव क्षेत्र

**सीव्ही त्र बी ही ग यु सी ग एन टी बी ग ए एफ ग बी ए**

१७. मुद्रांक शुल्क मूल्यांकनाची मार्गदर्शकतत्वे लागू न होणे :- सिध्द गणकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ‘‘मुद्रांक शुल्क मूल्यांकनाची महत्वाची मार्गदर्शक तत्वे’’ यामध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, या नियमांमध्ये करण्यात आलेल्या तरतुदींचे या मार्गदर्शक तत्वांवर प्रामुख्य असेल आणि यापैंकी कोणतीही मार्गदर्शकतत्वे, अधिनियमान्वये आणि या नियमांअन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्याकरिता लागू होणार नाहीत.

**इमारतींच्या व जमिनींच्या घटकांचे आणि वापरकर्ता प्रवर्गाचे तपशिल आणि त्यांना द्यावयाचे बहुविध भारांक**

अनुसुची ‘अ’
(नियम ४ पहा)

भाग - १
खुली जमीन
**खुल्या जमिनीचे वापरकर्ता प्रवर्ग आणि तत्सम बहुविध भारांक**

| अनुक्रमांक | खुल्या जमिनीचा वापरकर्ता प्रवर्ग | आधारभूत मूल्याला बहुविध भारांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | खुली जमीन -निवासी | १.०० |
| २. | खुली जमीन-अनिवासी | |
| | (क) वाणिज्यिक | १.२५ |
| | (ख) औद्योगिक | १.१० |
| ३. | राखीव असलेली खुली जमीन | |
| | (क) अंशतः अननुज्ञेयता | ०.१० |
| | (ख) एकूण अननुज्ञेयता | ०.०१ |

भाग - २
निवासी इमारती
निवासी इमारतींचे वापरकर्ता प्रवर्ग आणि तत्सम बहुविध भारांक

| अनुक्रमांक | निवासी इमारतीचा किंवा तिच्या भागचा वापरकर्ता प्रवर्ग | आधारभूत मूल्याला बहुविध भारांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | खोली, किंवा सदनिका किंवा वेश्म (अपार्टमेंट) किंवा गाळा व तत्सम | १.०० |
| २. | जलतरण तलाव | १.०० |
| ३. | स्टील्ट किंवा तळघर किंवा पोडियममधील कार पार्कींग | ०.२५ |
| ४. | जोडलेले गॅरेज | ०.३० |
| ५. | सोसायटी कार्यालय | ०.३० |

भाग - ३

दुकाने/वाणिज्यिक इमारती

दुकाने/वाणिज्यिक इमारती यांचे वापरकर्ता प्रवर्ग आणि तत्सम बहुविध भारांक

| अनुक्रमांक | दुकाने/वाणिज्यिक इमारत किंवा त्याचा भाग याचा वापरकर्ता प्रवर्ग | आधारभूत मूल्याला बहुविध भारांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | दुकान, रेस्टॉरंट, विविध वस्तू भांडार आणि शॉपिंग सेंटर, दवाखाना, हॉस्पिटल, क्लिनिक आणि पॅथोलॉजी प्रयोगशाळा, खाजगी हेल्थ क्लब, जिम्नॅशियम, जलतरण तलाव, कार्यालय, गोदाम, साठवण, कोठार, वजनकाटा व इतर कोणत्याही गटात समाविष्ट नसलेले घटक | १.०० |
| २. | रेस्टॉरंट व बार, मंगल कार्यालय/हॉल/कन्वेन्शनल हॉल/कम्युनिटी हॉल/पार्टी हॉल इत्यादी, मॉल, | १.२० |

| | | |
|---|---|---|
| | सिनेमा हॉल/सिनेमागृह/नाटयगृह, खुले सिनेमागृह-रंगमंच व इतर बांधकाम, मल्टिप्लेक्स, बॅक, बॅकेतर वित्तीय संस्था, जीवन व जीवनेत्तर विमा निगम कंपनी, शिकवणी वर्ग, टॉवर, जाहिरात फलक, ऑटोमॅटिक टेलर मशीन आणि मनी चेंजिंग सेंटर, पेट्रोल पंप/सर्व्हीस स्टेशन/एलपीजी, सीएनजी स्टेशन/केरोसिन स्टेशन यांचे बांधकाम | |
| ३. | शैक्षणिक संस्था, नर्सरी किट्स कॉर्नर, प्लेग्रुप | ०.८० |
| ४. | तबेला | ०.८० |
| ५. | स्टील्ट/तळघर/पोडियम मधील कार पार्कींग | ०.२५ |
| ६. | जोडलेले गॅरेज | ०.३० |
| ७. | सोसायटी कार्यायल | ०.३० |

भाग - ४

औद्योगिक इमारती

औद्योगिक इमारती यांचे वापरकर्ता प्रवर्ग आणि तत्सम बहुविध भारांक

| अनुक्रमांक | औद्योगिक इमारतीचा किंवा त्याचा भाग याचा वापरकर्ता प्रवर्ग | आधारभूत मूल्याला बहुविध भारांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | औद्योगिक वसाहत | १.२५ |
| २. | सेवा औद्योगिक वसाहत | १.०५ |
| ३. | स्टील्ट/तळघर/पोडियममधील कार पार्कींग | ०.२५ |
| ४. | जोडलेले गॅरेज | ०.३० |
| ५. | सोसायटी कार्यालय | ०.३० |

अनुसूची ‘ब’

(नियम ५ पहा)

इमारतीचे स्वरूप आणि प्रकार याप्रमाणे एखाद्या इमारतीला द्यावयाचा बहुविध भारांक

| अनुक्रमांक | इमारतीचे किंवा त्याच्या भागांचे स्वरूप आणि प्रकार | बहुविध भारांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | आरसीसी इमारत | १.०० |
| २ | आरसीसी इमारतीव्यतिरिक्त पक्के बांधकाम | ०.८० |
| ३ | कच्ची इमारत | ०.६० |

स्पष्टीकरण :- या अनुसूचीच्या प्रयोजनार्थ

(क) आरसीसी इमारत याचा अर्थ, आरसीसी स्लॅब, भिंतीमध्ये सिमेंट वॉर्टरने तयार केलेली व प्लॅस्टर केलेली विटांची भिंत असा आहे.

(ख) पक्की इमारत याचा अर्थ, भार सहन करणारे बांधकाम, आरसीसी स्लॅब व्यतिरिक्त छत बांधकाम, कच्च्या किंवा सिमेंट जमिनींसह प्लास्टर केलेली विटांची भिंत, असा आहे.

(ग) कच्ची इमारत याचा अर्थ, विटांसह चिखलाची भिंत असलेले बांधकाम, चिखलाचा गिलावा, कौलारू छप्पर किंवा ॲस्बेस्टॉस किंवा टिनचे छप्पर, असा आहे आणि यात तात्पुरत्या इमारतीच्या समावेश होतो.

अनुसूची ‘क’

(नियम ६ पहा)

इमारतीच्या वयोमानाप्रमाणे एखाद्या इमारतीला द्यावयाचा बहुविध भारांक

| अनुक्रमांक | इमारतीचे किंवा त्याच्या भागांचे स्वरूप आणि प्रकार | बहुविध भारांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ० ते ५ वर्षे | १.०० |
| २ | ५ वर्षापेक्षा अधिक ते १० वर्षापर्यंत | ०.९५ |
| ३ | १० वर्षापेक्षा अधिक ते २० वर्षापर्यंत | ०.९० |
| ४ | २० वर्षापेक्षा अधिक ते ३० वर्षापर्यंत | ०.८५ |

| | | |
|---|---|---|
| ५ | ३० वर्षापेक्षा अधिक ते ४० वर्षापर्यंत | ०.८० |
| ६ | ४० वर्षापेक्षा अधिक ते ४९ वर्षापर्यंत | ०.७५ |
| ७ | ५० वर्षापेक्षा अधिक | ०.७० |

**विषयः- वर्ष २०१२-१३ साठी भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणीसाठी करांचे दर निश्चित करणेबाबत.**

सद्यस्थितीत शहरात अस्तित्वात असलेल्या इमारतीचे किंवा जमिनीचे क्षेत्रफळ, बांधकाम प्रकार (आरसीसी, पत्रेविटा, टियर गरडर), मिळकतीचा वापर (निवासी/अनिवासी) व परिसरातील उपलब्ध मुलभूत सोयीसुविधा यावर आधारीत करयोग्य मुल्यावर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येत आहे.

राज्य शासनाने सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करून इमारती व जमिनीचे भांडवली मुल्यावर मालमत्ता कर बसविण्याचे प्रयोजन केले आहे.

**सन् २०१२ - २०१३ या आर्थिक वर्षाकरिता भांडवली मुल्यावर आधारीत प्रस्तावीत दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्र | करांचे नाव | कायद्यातील तरतुद | किमान दर टक्के | कमाल दर टक्के | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा लाभ कर | १३० | | | ०.१० |
| २ | मलप्रवाह कर | १३१ | | | ०.१० |
| ३ | मलप्रवाह सुविधा लाभकर | १३१ | | | ०.१० |
| ४ | सामान्य कर | १२९ अ | ०.१ | १.०० | ०.३० |
| ५ | महापालिका शिक्षण कर | १४८ अ | | | ०.१० |
| ६ | सडक कर | १४८ क | | | ०.१० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | वृक्ष उपकर | | | | ०.१० |
| ८ | अग्निशमन कर | १२९ क | | | ०.०१ |
| ९ | विशेष साफसफाई कर | १२७ | | | ०.०१ ;फक्त क्लब, मंगल कार्यालये, तबेला, हॉटेल ;दहा हजार पेक्षा जास्त भांडवली मुल्य असलेले हॉटेलद्ध अशा मिळकतींवर |

सबब सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करणेसाठी वरीलप्रमाणे करांचे दर निश्चित करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

**विषयः— वित्तीय वर्ष सन २०१२—१३ साठी पाणीपट्टीचे दर निश्चित करणेबाबत.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३(२०) नुसार महापालिका हद्दीतील नागरिकांना पुरेसा व स्वच्छ पाणी पुरवठा करणे हे महापालिकेचे आदय कर्तव्य आहे. दि २०.१२.९४ रोजी पाणी पुरवठा योजना उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाकडून हस्तांतरीत करण्यात आली होती. त्या दिवसापासून महानगरपालिका सदरची सेवा अर्थसहाय्य देऊन ( Subsidised Rates) सर्वाना पुरवित आहे.

शहरातील नागरिकांना पाणी पुरविण्यासाठी महापालिकेचा स्वतःचा कोणताही स्त्रोत नाही. महानगरपालिका एम आय डी सी कडून आजतागायत पाणी खरेदी करीत असून एम.आय.डी.सी. सदर पाणी खरेदी दरात सतत वाढ करीत आहे. परंतु महापालिका सुरूवातीपासूनच खरेदीपेक्षा कमी दराने ग्राहकांना पाणी पुरवठा करीत आहे. तसेच दि ३१.३.०३ पर्यत शहरातील सर्व मिळकतींना पाणीपट्टी आकारणी नियतकालीक दराने केली जात होती. त्यानंतर वित्तीय वर्ष २००३—०४ मध्ये वाणिज्य वापर होत असलेल्या कोणत्याही जागांना पाणी पुरवठा केंद्रातून पाणी पुरवठा होत नसेल तर त्यास पाणीपट्टी बसविण्यात येणार नाही, असा निर्णय महासभेत दि २०.२.०३ रोजी घेण्यात आला. परिणामी महापालिकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे व पाणी पुरवठा सेवांसाठी देण्यात येणा—या अनुदानामुळे शहरातील विकास कामांवर खर्च करणेसाठी निधी उपलब्ध

होवू शकत नाही. मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३० व १३४ मध्ये पाणीपट्टी व पाणी पुरवठा लाभ कर आकारणी बाबतच्या तरतुदी नमूद केल्या आहेत. त्यात पाणीपट्टी आकारणीसाठी खालील पर्याय उपलब्ध आहेत

१) नळजोडणी धारकाच्या मिळकतीचे कर योग्य मुल्य लक्षात घेवून कर योग्य मुल्याच्या टक्केवारीने पाणीपट्टी व पाणी पुरवठा लाभ कर या नावाने अतिरिक्त पाणीपट्टी आकारणी करणे.
२) नळ जोडणीचा आकार व ज्या प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येते त्यावरून दर निर्धारीत करणे.
३) पाणी मोजणी करून ज्या प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येते त्यासाठी वेगवेगळे दर निर्धारित करून आकारणी करणे.
४) ठराविक काळासाठी नळ जोडणीधारकाबरोबर दराबाबत तडजोड करणे.

वित्तीय वर्ष २०१०—११ मध्ये पाणी पुरवठयापासुन प्राप्त झालेले उत्पन्न व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे —

**(आकडे हजारात)**

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| तपशिल | रक्कम | तपशिल | रक्कम |
| पाणीपट्टी | १७७६९४ | एम.आय.डी.सी. | ३०६००० |
| २ | वारसाहक्का व्यतिरीक्त मिळकती हस्तांतरण करण्यास परवानगी मिळणेबाबत | किमान रू.२०० | किमान रू.५०० | किमान रू.५०० |
| | **Change of Name for the purpose of primary liability to property tax** | कमाल **2% of R.V.** | कमाल **2% of R.V.** | कमाल **2% of R.V.** |
| ३ | थकबाकी नसल्याचा दाखला<br>**No dues certificate of Property Tax** | २० | २० | २० |
| ४ | मिळकतीचा उतारा मिळणेबाबत<br>**Extract of Property** | २० | ५० | ५० |
| ५ | मिळकत कराचे डुप्लीकेट बिल देणे. | १० | १० | १० |
| | **Duplicate copy of Property Tax bill** | | | |
| ६ | मिळकत पत्रक.<br>**Property Card** | ५० | १०० | १०० |
| | बाजार परवाना विभाग | | | |
| | **Market License Department** | | | |
| १ | ट्रेड / व्यवसाय / साठा / परवाना (लायसन्स) मिळणेबाबत.<br>**License for Trade / Business / Storage** | ५०० | १००० | १५०० |
| २ | परवाना रद्द करणे<br>**Cancellation of License** | १०० | १०० | १०० |
| ३ | नामनिर्देशनानुसार परवाना हस्तांतरीत करणे | २५० | ५०० | ५०० |
| | **Transfer Of License by Nomination** | | | |
| ४ | विक्रीने, भागीदारीने किंवा इतर मार्गाने परवाना हस्तांतरण | २५० | ५०० | ५०० |
| | **Transfer Of License by Selling / Partnership Deed / Other than Nomination** | | | |
| ५ | सर्व प्रकारचे परवाने/ परवानग्या नूतनीकरण (१वर्षांनी) करणेबाबत (मार्केट विभागाशी संबंधित)<br>**Renewal Of All Type of Licenses (After Every 1 Year - Related to Market Department)** | २५० | ५०० | ५०० |
| ६ | व्यवसायाच्या जागेचे क्षेत्रफळात /वजनांत/परीमाणांत मध्ये वाढ/घट करणे. | २५० | ५०० | ५०० |
| | **Increase or Decrease in Area of business premises / Weight / Quantities / Etc.** | | | |
| ७ | दिलेल्या परवान्यात भागीदार समाविष्ट करणे किंवा भागीदार कमी करणे<br>**Add or Remove the partners in the issued license** | २५० | ५०० | ५०० |
| ८ | लायसेन्सची डुप्लीकेट प्रत.<br>**Issue Of Duplicate Copy Of Market License** | ५०० | ५०० | ५०० |
| ९ | विविध ना हरकत दाखले व परवानग्या मिळणेबाबत (मार्केट विभागाशी संबंधीत)<br>**Various NOC & Permissions from Market Department** | ५०० | ५०० | ५०० |
| १० | सार्वजनिक जागेत /रस्त्यावर हस्तव्यवसायातील | १०० | १०० | १०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कौशल्याच्या उपयोगासाठी परवाना (लायसन्स) मिळणेबाबत.<br>**License for handicrafts/handiworks at public place / road side** | | | |
| ११ | फेरीने माल विकणेसाठी परवाना (लायसन्स) मिळणेबाबत.<br>**License for hawkers/street vendors** | १०० | १०० | १०० |
| | मालमत्ता विभाग<br>**Estate Department** | | | |
| १ | रस्त्यावरील मंडपाबाबत नाहरकत दाखला<br>**Issue of No Objection Certificate for Installing / Erecting Pendals on road** | २५० | ५०० | ५०० |
| | अग्निशमन विभाग | | | |
| | **Fire Brigade Department** | | | |
| १ | विविध व्यवसायांकरिता अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला<br>**NOC for various businesses** | १५० | ५०० | १००० |
| २ | विविध व्यवसायांकरिता अग्निशमन दलाच्या ना हरकत दाखल्यांचे नूतनीकरण करणेबाबत<br>**Renewal of NOC for various businesses** | १०० | २५० | ५०० |
| | | | | |
| ३ | विविध प्रकारच्या इमारती करिता अग्निशमन विभागातर्फे ना नाहरकत दाखला मिळणेबाबत अग्निशमन सेवेच्या स्वरुपात फी.<br>**NOC for construction of different class of buildings** | ५००० | ५००० | महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतूदी नुसार |
| ४ | जळीताचा दाखला<br>**Fire Occurrence Certificate** | १५० | १५० | १५० |
| | उद्यान व वृक्ष संवर्धन | | | |
| | **Garden & Tree Development** | | | |
| १ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम, १९७५ अन्वये झाड तोडणे अथवा छाटणे करीता परवानगी मिळणेबाबत.<br>**Permission for cutting & trimming trees** | २५० | २५० | २५० |
| | सार्वजनिक आरोग्य विभाग | | | |
| | **Public Health Department** | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | सेप्टीक टॅक क्लिनिंग.<br><br>**Septic Tank Cleaning** | २० | Rs.100 per Barrock/House/shop & Rs. 500 for Multi storey Apt. | Rs.100 per Barrock/House/shop & Rs. 500 for Multi storey Apt. |
| २ | अन्ननिर्मिती संबंधी ना हरकत दाखला<br><br>**NOC for various businesses related to food** | ५०० | ५०० | ५०० |

७) वर्ष २०११–१२ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा–या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलग्ध निधीतून अर्थसहाय कायम ठेवण्यास शिफारस करण्यात येत आहे . साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्यात येणारे अर्थसहाय जकात /स्थानिक संस्था कर व मालमत्ता करातील सामान्य कर या दोन्ही उत्पन्नाच्या बाबीतून वर्ग करण्यात यावे .

८) वर्ष २०१०–११ चे लेखा विवरण पत्र , कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, इतर अंदाजपत्रक, माहिती व अभिप्रायाची नोंद घेण्यात येत आहे .

९) जकात : राज्य शासनाने दिनांक १/४/२०१२ पासून जकात ऐवजी स्थानिक संस्था कर लागू केले होते. तद्नंतर १७/४/२०१२ पासून पुन्हा जकात लागू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत दिनांक १/७/२०१२ पासून पुन्हा जकात सुरु राहिल्यास , पुढील प्रमाणे जकात दरात वाढ मान्य करण्यात येत आहे .

| | वस्तूचे नाव | किमान दर (%) | कमाल दर (%) | प्रचलित दर (%) | प्रशासनामार्फत प्रस्तावीत केलेले दर (%) | स्थायी समितीने मान्य केलेले दर (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| ४० ब | सर्व प्रकारची रसायने, सायझिंग सॉल्ट,लोखंडाचे सल्फेट तांब्याचे सल्फेट व इतर.. | ०.५० | ४.०० | ३.७२ | ४.०० | ४.०० |
| ४० अे | खाद्य म्हणून उपयोगात न येणारी सर्व प्रकारची अखाद्य चरबी,टेलो,डुकराची पातळ चरबी इ.. | ०.५० | ४.०० | १.७५ | ४.०० | ४.०० |
| ३३ अे | सर्व प्रकारचे साबण | ०.५० | ४.०० | २.०० | ४.०० | ४.०० |
| ३४ | पोटॅश,रिठा.सोडा.तूरटी.लवण पदार्थ शिकेकाई.व इ | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | ४.०० |
| ५३ ब | कात्री.वस्तरे.सेफ्टी रेझर्स ब्लेडस.चाकू.सूरे.व इ..... | ०.५० | ४.०० | २.७५ | ४.०० | ४.०० |
| ५३ क | नक्षी पटटया.(लेसेस). लाकडाच्या व धातूच्या रिंगा. भरतकामाच्या वस्तू.प्लास्टीकची भुकटी इ. | ०.५० | ४.०० | ३.०३ | ४.०० | ४.०० |
| ६५अे | सूत | ०.५० | ४.०० | २.०० | ४.०० | ४.०० |
| ७१ | कच्चे लोखंड.प्राथमीक टप्यातील शुध्द लोखंड.लगडी आणि लाद्या.कडया.बल्ब.किंवा हलके लोहमार्ग लोहमार्गाकरीता सांधपटया व इतर. | ०.५० | ४.०० | ३.६२ | ४.०० | ४.०० |
| ७७ | टलोह धातु म्हणजेच पितळ तांबे.टीन अॅल्युमिनियम.शिसे जस्त.मिन सिल्व्हर स्टेनलेस स्टिल इतर..... | ०.५० | ४.०० | २.०२ | ४.०० | ४.०० |
| ७८ | रंग द्रव्य टॅन्स.नीळ मुद्रणाची शाई धरून रंगविषयक सर्व वस्तु..... | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | ४.०० |

**नगरसेवक व इतर पदाधिका–यांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्ते** :––

स्थानिक स्वराज्य संस्थेत नगरसेवक व पदाधिका—यांना निवडून आलेल्या प्रभागात दैनंदिन तत्वावर उपस्थित होणा—या मुलभूत सेवांसंबंधी प्रश्नांचा निपटारा करणेसाठी प्रभाग क्षेत्रातील रहिवाश्यांशी संपर्क साधावा लागतो, प्रभागात प्रत्यक्ष भेटी दयाव्या लागतात व नगरसेवकांना प्रभागात कार्यालयाचीही व्यवस्था करावी लागते . या सर्व बाबींच्या व्यवस्थापनासाठी नगरसेवकांना विविध प्रकारचे भत्ते देण्यात येतात . यापूर्वी कोणत्याही एक नगरसेवकाला एक प्रभागक्षेत्र सिमीत होते . परंतु आता राज्य शासनाचा निर्णयाप्रमाणे अ आणि ब अशा दोन जागा करुन प्रभागाच्या क्षेत्रात वाढ करण्यात आली आहे. त्यामूळे मतदारांची /रहिवाशांची संख्या वाढली आहे . सबब दैनंदिन तत्वावर होणा—या खर्चातील पेट्रोल , डिझेल व इतर वाढ लक्षात घेता , सर्व भत्यांमध्ये वित्तीय वर्ष २०१२—१३ पासून वाढ करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे .

| अ.क्र. | मानधन व भत्याचे नाव | पात्र पदाधिकारी | प्रचलीत मानधन / भत्ते | प्रस्तावीत मानधन व भत्ते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **वाहन भत्ता (Vehicle Allowance)** | महापौर<br>उप महापौर व स्थायी समिती सभापती<br>सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता<br>विषय समिती ,प्रभाग समिती व परिवहन समिती सभापती | २१०००<br>२००००<br>१५००० | ३५०००<br>३००००<br>२५००० | (सुधारित रक्कमेसाठी शासनाची मंजुरी घेण्यात यावी ) वाहन पती किंवा पत्नी यापैकी कोणाचेही नावावर असणे आवश्यक आहे . |
| २ | **खाजगी स्वीय सहायक (PA)** | महापौर,उप महापौर, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता | १००० | ५००० | (सुधारित रक्कमेसाठी शासनाची मंजुरी घेण्यात यावी ) |
| ३ | **अतिथी भत्ता** | महापौर<br>उप महापौर आणि स्थायी समिती सभापती<br>सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता<br>सभापती विषय समिती ,प्रभाग समिती , परिवहन समिती . | ७५००<br>३७५०<br>१५००<br>४५० | १२०००<br>७५००<br>४०००<br>३००० | |
| ४ | **बैठक भत्ता (Meeting Allowance)** | सर्व नगरसेवक | १०० | २०० (कमाल मर्यादा ८००/—) | (सुधारित रक्कमेसाठी शासनाची मंजुरी घेण्यात यावी ) |

**<u>शिक्षण मंडळाचे सन २०१२—१३ चे मूळ अंदाजपत्रक</u>** :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१२—१३ करिता मूळ अंदाजपत्रकीय तरतूद , मागील वर्षात प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तीय परिस्थिती लक्षात घेता , पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे व शिक्षण मंडळाचे वर्ष २०१२—१३ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करीत आहे .

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : २२,७५,३९,७८२/—
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : २२,४६,०४,२००/—
**अखेरची शिल्लक रुपये** : २९,३५,५८२/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. **१२,८५,५८,७००/—** महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यास शिफारस करीत आहे .

**शिक्षण मंडळाचे सन २०११—१२ चे सुधारित अंदाजपत्रक** :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०११—१२ करिता मूळ अंदाजपत्रकीय तरतूद , जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शीर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तीय परिस्थिती लक्षात घेता , पुढील प्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे व वर्ष २०११—१२ करिता रक्कम रुपये ११,७६,०३,५८१/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यास शिफारस करीत आहे .

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** | : | **२०,४६,९४,८३६/—** |
| **अंदाजपत्रकीय खर्च रुपये** | : | **२०,२९,७४,२५४/—** |
| **अखेरची शिल्लक रुपये** | : | **१७,२०,५८२/—** |

**परिवहन उपक्रमाचे सन २०१२—१३ चे मूळ अंदाजपत्रक** :

**(आकडे हजारात)**

| | | | |
|---|---|---|---|
| **"ब" अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | **६६२** |
| **"ब" अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | **१९३६** |
| **परिवहनसेवा खर्च** | : | **रुपये.** | **५००** |
| **सभासदाना मानधन व इतर भत्ते** | : | **रुपये** | **१४३६** |

**परिवहन उपक्रमाचे सन २०११—१२ चे सुधारित अंदाजपत्रक :**

**(आकडे हजारात)**

| | | | |
|---|---|---|---|
| **"ब" अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | **५९८** |
| **"ब" अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | **१८७** |
| **परिवहनसेवा खर्च** | : | **रुपये.** | **——** |
| **सभासदाना मानधन व इतर भत्ते** | : | **रुपये** | **१८७** |

**उत्पन्न व खर्चाचे अंदाजात राहणारी तुट अ अंदाजपत्रकातून वर्ग करण्यास मंजुरी देत आहे**

**महापालिकेचे सन २०११—१२ चे सुधारीत अंदाजपत्रक** :

आयुक्तांनी वर्ष २०११—१२ करिता उत्पन्न व खर्चाचे सादर करण्यात आलेले सुधारीत अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन अंतिम करण्यास शिफारस करण्यात येत आहे .

**(आकडे हजारात)**

| **अ.क्र.** | **ज्या लेखा शीर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे .** | **ज्या लेखा शीर्षातून वर्ग करावयाची आहे .** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| **१** | कुत्रयाच्या दंशावर औषधोपचार खर्च | हिवताप व डेंगु प्रतिबंधक खर्च | ५०० |
| **२** | इतर खर्च (अ.अंदाज,भाग—१ मधील इ—संकीर्ण—अ.क्र.—२२) | नगरसवेकांना मानधन , सभा व इतर भत्ते | ३०० |
| **३** | शोध विकास व अपारंपारिक वीज व उर्जा | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | ३०० |
| **४** | पुर परिस्थिती निवारण अनुदानातून विकास कार्य | नवीन रस्ते बनविणे | ४२०० |
| **५** | रोजगार हमी कर परतावा | शिक्षण कर | १०० |
| **६** | इतर आकस्मिक खर्च (अ—अंदाज, भाग—३ मधील अ.क्र.८) | ग्रुप इन्शुरन्सपोटी मिळणारी रक्कम | २० |
| **७** | वाहन व मशिनरी खरेदी | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे | १६०० |

(आकडे हजारात)

| | | | |
|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | २१४६५९१ |
| ब अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | ५९८ |
| क अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | रुपये. | ७३४०३७ |
| | | | २८८१२२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | १८२३३९९ |
| ब अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये | १८७ |
| क अंदाजपत्रकीय खर्च | : | रुपये. | १०५६२५८ |
| | | | २८७९८४४ |

## महापालिकेचे सन २०१२–१३ चे अदाज :

आयुक्तांनी वर्ष २०१२–१३ करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत ते पुढील प्रमाणे फेरफार करुन करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ३६८८९२३ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ४१३७८८८ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व साधारण कर | +११९६०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –१) | +९९०० | १८ |
| १ | महापालिका शिक्षण कर | +२३४०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –१)(दुर्बल घटक) | +११००० | १८ |
| १ | वृक्ष कर | +२६०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –२) | +११००० | १८ |
| १ | पथ कर | +२८६०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –२)(दुर्बल घटक) | +९९०० | १९ |
| २ | बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी | +९०००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –३) | +११००० | १९ |
| ४ | शिक्षण कर रिबेट | +७८० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –३)(दुर्बल घटक) | +९९०० | १९ |
| ५ | रोजगार हमी करावरील सुट | +१०४ | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –४) | +१३२०० | १९ |
| ८ | शिक्षण कर | +३९००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –४)(दुर्बल घटक) | +९९०० | १९ |
| ८ | रोजगार हमी कर | +५२०० | उदयाने बनविणे | +६००० | २३ |
| ३२ | पाणी बीले वसुली (कर) | +१५०००० | बागेतील खेळणी खरेदी | +१००० | २३ |
| ३२ | पाणी बीले वसुली (पा. पु.) | +१८०००० | नवीन कारंजे बसविणे | +१५०० | २३ |
| ३२ | पाणी पुरवठा लाभ कर | +१३००० | महापौर निधी | +१०००० | २४ |
| ३२ | मल प्रवाह सुविधा लाभ कर | +५२०० | उप महापौर निधी | +५००० | २४ |
| ३२ | मल प्रवाह कर | +२३४०० | स्थायी समिती सभापती निधी | +५००० | २४ |
| ४ | नोंदणी शुल्क अनुदान | +२७५०० | नगरसेवक निधी | +२१६०० | २४ |
| ३४ | फोरेस्ट नाका ते १७ सेक्शन पर्यंत पाईपलाईन साठी अनुदान | +८५००० | नगरसेवक निधी (दुर्बल घटक) | +१५६०० | २५ |
| ०५ | महापालिका मालमत्ता विनियोग | +८०००० | शिक्षण कर परतावा | +३९००० | २८ |
| ०५ | प्रतिनियुक्तीवरील कर्मचा–यांचे पगार | – १०००० | रोजगार हमी कर परतावा | +५२०० | २८ |
| | | | जंतुनाशक खरेदी | +४००० | १५ |
| | | | औषध खरेदी | +१००० | १५ |
| | | | कुत्रयाच्या दंशावर औषधोपचार खर्च | +१५०० | १५ |
| | | | श्वान निर्बीजीकरण खर्च | +१५०० | १६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंत्यविधी स्थाने दुरुस्ती व निगा | +३५०० | १८ |
| | | | नगरसेवकांना मानधन व इतर भत्ते | +६००० | २० |
| | | | महापालिका मालमत्ता सुरक्षितता | +२५०० | २२ |
| | | | नाला व गटार सफाई खर्च | +१०००० | ३९ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्रभाग –१) | +९०० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्र–१)(दुर्बल घटक) | +१००० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्रभाग –२) | +१००० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्र–२)(दुर्बल घटक) | +९०० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्रभाग –३) | +१००० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्र–३)(दुर्बल घटक) | +९०० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्रभाग –४) | +१२०० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्र–४)(दुर्बल घटक) | +९०० | ४१ |
| | | | फारेस्ट नाका ते सेक्शन १७ पर्यंत नवीन जलवाहिनी | +८५००० | ४२ |
| | | | पाणी पुरवठा साहित्य खरेदी (दुरुस्ती) | +२५०० | ३७ |
| | | | पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण | +१००० | १७ |
| | | | सार्वजनिक शौचालय व मुता–या दुरुस्ती | +१५०० | ३९ |
| | | | सार्वजनिक शौचालय व मुता–या दुरुस्ती (दुर्बल घटक) | +१५०० | ३९ |
| | | | शौचालय व मुता–या निष्कासीत केलेल्या जागेवर सी.सी. पॅसेज बांधणे | +३५०० | ३९ |
| | | | सार्वजनिक नाला व गटार बांधणे | +१५००० | ४३ |
| | | | पाणी पुरवठा इमारती निगा व दुरुस्ती (पंपींग स्टेशन, प्रशासकीय व अन्य इमारती ) | +४५०० | ४२ |
| | | | शौचालय विदयुत देयके | +३५०० | ३९ |
| | | | सांस्कृतिक कार्यक्रम | +१००० | १७ |
| | | | उदयाने दुरुस्ती व निगा | +२५०० | १६ |
| | | | श्री. गणेश देव विर्सजन घाट | +४००० | २४ |
| | | | आरोग्य केंद्र | +१००० | २६ |
| | | | प्रवेश्व्दार , यात्री निवास, समाज मंदिर, स्पोटर्स, स्टेज व इतर दुरुस्ती व निगा | +२६५०० | २४ |
| | | | महिती व तंत्रज्ञान साहित्य | +२५५० | २१ |
| | | | रस्ते दुरुस्ती | +२०००० | १७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सपना,दशहरा, गोल मैदान, रोटरी , नेताजी व मनपा मुख्यालय उदयान इ. दुरुस्ती व निगा | +३००० | १६ |
| | | | ३९ प्रभागात रस्ते व इतर विकास कार्य | +१००० | २४ |
| | **एकूण** | ४५५२३०७ | **एकूण** | ४५५०९३८ | |
| | | | **अखेरची शिल्लक** | **१३६९** | |

| | | |
|---|---|---|
| **उत्पन्न** | : | ४५५२३०७ |
| **खर्च** | : | ४५५०९३८ |
| **अखेरची शिल्लक** | : | **१३६९** |

प्रवेशव्दार , यात्री निवास, समाज मंदिर, स्पोटर्स, स्टेज व इतर दुरुस्ती व निगा या लेखा शीर्षातर्गत रक्कम रुपये २.७५ कोटी प्रभाग क्रमांक —१ अ , ३ब , ५ब, ६ब, ९अ, ९ब , २५अ, २५ब, २६ब, २७ब , २८अ, २९अ, २९ब, ३१अ, ३१ब, ३८अ, ३८ब, ३९अ, ३९ब, २ब, ३अ, ४अ, ४ब, १२अ, १२ब, १४अ, १४ब, २६अ, २७अ, ३७ब, २ब, ७ब, ८अ, ८ब, ११अ, ११ब, २२ब, ५अ, ७अ, १७अ, २३अ, ३०अ, ३०ब, ३४अ, १०ब, २०ब, २२अ, २८ब, ३५ब, ३७अ, १५ब, २०अ, २४अ, १ब, व २१अ मध्ये प्रत्येकी रुपये ५ लाख प्रमाणे कामे हाती घेण्यात यावी.

मागील कालावधीतील निवडून आलेल्या सदस्यांना लॅपटॉप देण्यात आले होते. सध्याच्या आधुनिकीकरणामूळे आयपॅड हे नविन साधन बाजारात उपलब्ध झाले असून निवडून आलेल्या नवीन सदस्यांनी आयपॅड ची मागणी केलेली आहे सबब ज्या सदस्यांना आयपॅड पाहिजे त्यांना लॅपटॉप ऐवजी आयपॅड देण्यात यावे .

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मध्ये उल्लेखिलेल्या सर्व अनुषंगीक बाबी विचारात घेवून सन २०१२—१३ साठी रुपये **१३.६९ लाख** शिलकीचा अर्थसंकल्प तयार करण्यात येत आहे . तसेच इतर सर्व बाबी वर नमूद केल्याप्रमाणे अंतिम मान्यता देण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लखो अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही /—

**<u>बहुमताने</u>**

सभापती /पिठासन अधिकारी
स्थायी समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

.

सांयकाळी ५.०५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. रमेश चव्हाण यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १५/५/२०१२

**दि. १५/५/२०१२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक १५/५/२०१२ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण | सभापती |
| २ | सौ. ज्योती गायकवाड | सदस्या |
| ३ | सौ. नेहा भोईर | सदस्या |
| ४ | श्री. राम (चार्ली) पारवानी | सदस्य |
| ५ | सौ. मिना कुमार आयलानी | सदस्या |
| ६ | कु. जयश्री जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| ७ | श्री. अकुंश म्हस्के | सदस्य |
| ८ | सौ. पचंशीला नाना पवार | सदस्या |
| ९ | सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता | सदस्या |
| १० | श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर | सदस्य |
| ११ | श्री. राजू रामसिंग कंडारे | सदस्य |
| १२ | सौ. जया मोहन साधवनी | सदस्या |
| १३ | श्री. गोदुमल किशनानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. सुरेश जाधव, २. डॉ. महेश गावडे, ३. सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१५.श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
१६.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१७.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
१८.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
१९.श्री. हरेश इदनानी, उप—मुख्य लेखा अधिकारी
२०.श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार
२१.डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२२.श्री. एस.एम. अली, उप अभियंता, पाणी पुरवठा
२३.श्री. के.ए. शानबाग, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
२४.श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त
२५.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य
२६.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२७.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२८.श्री. सी.आर.पवार, लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

३. श्रीमती नर्गीस खान

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

सांयकाळी ४.४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ३१/३/२०१२ व ९/५/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**मागील सभेचे दिनांक ३१/३/२०१२ व ९/५/२०१२ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक ३१/३/२०१२ व ९/५/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नांव : श्री. राजु कंडारे

**स्थायी समिती ठराव क्र. :– १ ब** **दिनांक : १५/५/२०१२**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ३१/३/२०१२ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १९ व दिनांक ९/५/२०१२ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

.**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :–** पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनव्दारे छोटया मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेला गाळ डम्परंव्दारे डम्पींग ग्राऊडवर वाहतुक करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मेसर्स व्ही.आर.पनवेलकर, अंबरनाथ यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**आजच्या सभा सूचनेवर जो विषय आलेला आहे, तो आरोग्य विभागाशी संबंधीत आहे आणि आरोग्य विभागावर ज्यांचे नियंत्रण आहे त्या श्रीमती संगिता धायगुडे, उप–आयुक्त, आरोग्य या रजेवर आहेत. तसेही विभागांवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी नेहमीच सुट्टीवर असतात. नाले सफाई करुन जो कचरा काढला जातो, तो रस्त्यावर नाल्याच्या कडेलाच टाकला जातो. नंतर तो पुन्हा नाल्यात जातो. यासाठी नाले साफ करुन काढलेला कचरा, गाळ, डंम्पींग ग्राउंडवर गेला पाहिजे. याचबरोबर ज्यांच्याशी संबंधीत हा विषय आहे त्या श्रीमती संगिता धायगुडे मॅडम यांनी सभेस हजर राहावयास पाहिजे होते व यापुढे स्थायी समितीमध्ये जे जे विषय येतील त्या विषयांशी संबंधीत अधिका–यांनी सभेस हजर राहिलेच पाहिजे. संबंधीत अधिकारी हजर नसतील तर त्या विषयावर चर्चा कशी करणार?

यावेळी श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**दोन प्रकारचे नाले असतात. एक मोठया प्रकारचे नाले आणि दुसरे लहान प्रकारचे नाले, सफाई कामी यांनी कोणकोणत्या नाल्यांची शिफारस केली आहे? तसेच अरुंद जागांच्या ठिकाणी जेथे जेसीबी जावु शकत नाही तेथिल नाले कसे साफ करणार?

यावेळी श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त व डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**नाल्यातुन कचरा बाहेर काढल्यानंतर तो डंम्पींग ग्राउंडवर गेला पाहिजे. आणि या कामावर पर्यवेक्षण करण्यासाठी एका व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे व त्याचा भ्रमणध्वनी सर्व सदस्यांना दिला जावा.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**लहान नाल्यांची सफाई कशी केली जाईल त्याबाबत अदयाप उत्तर दिले गेले नाही.

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**त्यासाठी मनुष्यबळ वापरण्याची योजना आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**नाले सफाईच्या कामाची मागील वर्षी व्हिडीओ शुटींग केले होते त्याप्रमाणे यावर्षीही केले जावे.

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**ठिक आहे. नाले सफाईच्या कामाची व्हिडीओ शुटींग केली जाईल.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**हिराघाट व उल्हासनदीचा नाला हे निविदेमध्ये अंतर्भुत आहेत की नाही? हे दोन्ही नाले निविदेमध्ये अंतर्भुत केले पाहिजेत.

**सदस्या श्रीमती पंचशिला पवार:–**मोठया नाल्यांची तर सफाई होईल. परंतु रहिवाशी क्षेत्रामध्ये जे लहान लहान नाले आहेत, त्यांची सफाई कशी होईल?

**श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–**श्री. विनोद केणे, निविदेमध्ये कुठले कुठले नाले अंतर्भुत केले आहेत? त्याबाबत स्पष्टीकरण केले जावे.

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:–**उल्हासनगर १ ते ५ मध्ये एकुण ४६ लहान मोठे नाले आहेत, जे जेसीबीने साफ करायचे आहेत. कॅम्प नं. १ येथिल हरमन मोहटा, या कंपनी शेजारी नाल्यापासुन सुरुवात होते, खन्ना कंपाउंड, गणेश नगर कॅम्प नं. ५ येथिल नाला अशा प्रकारे एकुण ४६ नाले आहेत.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**खेमानी नाल्याचा यामध्ये समावेश आहे काय?

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:–**होय.

**सदस्या श्रीमती पंचशिला पवार:–**जेथे जेसीबी जात नाही तेथे काय करणार?

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**त्यासाठी ठेकेदार वेगळे कामगार ठेवणार आहे. त्यांच्याकडुन शहरातील लहान मोठया नाल्यांची सफाई करुन घेतली जाणार आहे.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्केः—**नाले सफाईचे काम पावसाळा सुरु होण्या अगोदर होईल काय?

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**नाले सफाईसाठी त्यांना काल मर्यादा निश्चित करुन दिली जावी.

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**मागील वर्षी १९ तारखेलाच नाले सफाईकामी आदेश देण्यात आले होते आणि २० तारखेला काम सुरु झाले होते त्याप्रमाणे यावर्षीही हे काम होईल.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्केः—**मागच्या वर्षी बरेचसे नाले सफाईची कामे झाली नव्हती.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**नाले सफाईच्या कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी आपण कोणाला नेमणार आहात त्याचे नाव सांगा.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्केः—**निविदा काढल्यानंतरही विहित कालावधीच्या आत कामे होत नसतील तर काय करणार? ठेकेदाराचे पैसे कपात करणार काय? कामे होतील अशी तुम्हांला खात्री आहे काय? पावसाळयापुर्वी कामे होतील काय?

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**नाही, परंतु काम तर करुन घ्यावे लागणार आहे.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**नाले सफाई कामावर पर्यवेक्षण करणा—यांचे नाव व त्याचा भ्रमणध्वनी क्रमांक सर्वांना दिला जावा.

**सदस्य श्री. राम पारवानीः—**नाले सफाई कामाचा कार्यादेश कधी दिला जाईल?

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**आज ठराव पारीत झाला तर उदयाच कार्यादेश देवु व करार करु.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—**नाले सफाई कामासाठी कालमर्यादा निश्चित करुन दिली जावी तसेच या कामाचे व्हिडीओ शुटींग केले जावे.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्केः—**नाले सफाई ठेकेदार पावसाळा सुरु होण्याची वाट पाहत राहतो कधी एकदा पाऊस सुरु होतो आणि नाल्यांमधील कचरा वाहुन जातो. सध्याचे ठेकेदाराला कामाचे अनुभव आहे का? कसूर केल्यास, तर काय कारवाई करणार?

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**ठेकेदाराने काम केले नाही तर त्यावर दंडात्मक कारवाईची तरतुद ठेवली आहे काय?

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**तशी तरतुद ठेवली आहे, काम केले नाही तर रक्कम कपात करुन घेवु.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्केः—**कल्याण अंबरनाथ मुख्य रस्त्यावर एक नाला आहे, गेल्या दहा वर्षापासुन तो कधी साफ झाला नाही.

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**तो नाला आहे.

**काही सदस्यः—**पास,पास.......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. २ :—** पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनव्दारे छोटया मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेला गाळ डम्पंरव्दारे डम्पींग ग्राऊडवर वाहतुक करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मेसर्स व्ही.आर.पनवेलकर, अंबरनाथ यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

## प्रस्तावना

पावसाळयापूर्वी शहरातील नाला सफाईचे काम हे अत्यंत जरुरीचे व जनहिताचे असल्यामुळे ते करुन घेणे आवश्यक आहे. दरवर्षी नाले सफाईची कामे चांगल्याप्रकारे करुन घेतल्यामुळे शहरात पावसामुळे जलजन्य स्थिती निर्माण होत नाही. त्यानुसार सदर कामासाठी या वर्षाकरीता बनविण्यात आलेल्या प्रस्तावास मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार दिनांक ३०/४/२०१२ रोजी दैनिक सामना, दैनिक उल्हास विकास व वृत्तमानस या वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन दिनांक ३०/४/२०१२ ते ८/५/२०१२ रोजी पर्यंत ७ कोरी निविदा पुस्तिका वेगवेगळया ठेकेदारांनी खरेदी केल्या, व दिनांक ९/५/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सदर सिलबंद निविदा स्विकारण्यात आल्या व प्राप्त ४ निविदा दि. ९/०५/२०१२ रोजी दुपारी ४.०० वाजता उप – आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात उप – आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांचे उपस्थितीत निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे समोर उघडण्यात आल्या. सदर निविदाकारांमधील मे. अजीत ट्रान्सपोर्ट यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदेच्या लिफाफा क्र. १ मध्ये आवश्यक बयाणा रक्कमेचा डी.डी. जोडलेला नसल्याने सदर निविदिकारास अपात्र ठरविण्यात आले. सदरच्या निविदा प्रक्रीया सुरु असतांना मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी मे. व्हि. आर. पनवेलकर यांनी लिफाफा क्र. १ मध्ये सादर केलेले कामाच्या अनुभवाच्या प्रमाणपत्र आक्षेप घेवून मे. व्ही. आर. पनवेलकर टेंडर प्रक्रीयेस पात्र नसल्याचे लेखी आक्षेप नोंदवीला होता. सदर प्रकरणी निविदा समिती सदस्यांनी दिलेल्या सुचनांनुसार मागील पाच वर्षात नाले सफाईसाठी पात्र झालेल्या निविदाकारांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| सन | अ.क्र. | पात्र निविदाकाराचे नांव | न्युनतम दर सादर करणारे निविदाकार/ कार्यादेश |
|---|---|---|---|
| २००७–०८ | १ | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर |
| | २ | मे. दिपक कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | |
| २००८–०९ | १ | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर |
| | २ | मे. अजीत ट्रान्सपोर्ट, कल्याण | |
| | ३ | मे. व्ही. आर. पनवेलकर, अंबरनाथ | |
| २००९–२०१० | १ | मे. अजीत ट्रान्सपोर्ट, कल्याण | मे. अजीत ट्रान्सपोर्ट, कल्याण |
| | २ | मे. व्ही. आर. पनवेलकर, अंबरनाथ | |
| | ३ | शाम नारायण ॲन्ड ब्रदर्स, सांताक्रुझ, मुंबई | |
| २०१०–२०११ | १ | मे. शुभम कन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | मे. शुभम कन्स्ट्रक्शन, उल्हासनगर |
| | २ | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | |
| | ३ | मे. अजीत ट्रान्सपोर्ट, कल्याण | |
| | ४ | मे. व्ही.आर. पनवेलकर, अंबरनाथ | |
| २०११–२०१२ | १ | मे. शुभम कन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | मे. शुभम कन्स्ट्रक्शन, उल्हासनगर |
| | २ | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | |
| | ३ | मे. अजीत ट्रान्सपोर्ट, कल्याण | |

उक्त तक्त्यानुसार मे. व्ही. आर. पनवेलकर, अंबरनाथ यांनी सन २००८–९, २००९–१० व सन २०१०–११ या वार्षात सदरच्या निविदा प्रक्रीयेत भाग घेतला असून त्यांची निविदा, तात्कालीन निविदा समिती सदस्यांनी कागदपत्रांच्या तपासणी अंती पात्र ठरविलेली असल्याचे निविदा नस्ती पाहणी केली असता दिसून आले आहे. तसेच सदर कालावधीत मे. व्ही. आर. पनवेलकर, यांनी अनुभवाचा जोडलेला दाखला हा यावर्षी (सन २०१२–१३) जोडलेल्या दाखल्याची छायांकीत प्रती असल्याचे दिसून आले आहे. त्याचप्रमाणे निविदा समीतीने दिलेल्या निर्देशानुसार मे. व्ही.आर. पनवेलकर यांनी जोडलेल्या दाखल्यावर असलेला जा.क्र. ५८ दिनांक १३/५/२००८ आरोग्य विभागाच्या जावक रजिस्टरनुसार तपासला असता सदरचा दाखला आरोग्य विभागामार्फत वितरीत केल्याचे दिसून आले आहे. सदरची वस्तुस्थिती निविदा समिती समोर सादर केल्यानंतर निविदा समिती सदस्यांनी सर्व कागदपत्रांची छाननी केल्यानंतर आक्षेपीत निविदाकार व इतर पात्र निविदाकार यांच्या निविदा दिनांक १०/५/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता उघडण्यात आल्या. त्या निविदेचा तपशील व प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अटी व शर्ती नुसार जोडलेली कागदपत्रे | शेरा | प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अजित ट्रान्सपोर्ट कंपनी, कल्याण | बयाणा रक्ककेचा डी.डी जोडलेला नाही. | **अपात्र** | ------ |
| २ | ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा ३२ टक्के जास्त |
| ३ | मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा २७ टक्के जास्त |
| ४ | मे. व्ही. आर. पनवेलकर, अंबरनाथ | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा १० टक्के जास्त |

वरील प्राप्त निविदाकारांत मे. व्ही.आर. पनवेलकर, अंबरनाथ या कंपनीचे दर तुलनात्मक रित्या कमी आहेत. परंतु सदरचे दर/रक्कम अंदाजीत प्राकलनापेक्षा (रुपये ३७,८०,९२३/—) जास्त दर/रक्कम निविदाकाराकडून (१० टक्के वाढीव म्हणजेच रुपये ४१,५९,०१५/—) प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे मे. व्ही. आर. पनवेलकर, अंबरनाथ यांना लगेचच निविदा समिती सदस्यांनी वाटाघाटीसाठी पत्र देऊन बोलविण्यात यावे, अशा सुचना करण्यात आल्या, त्यानुसार जा.क्र. उमपा/उप—आ/आवि/३२/१२ दिनांक १०/५/२०१२ अन्वये वाटाघाटासाठी पत्र देण्यात आले. त्यानुसार संबंधीत निविदाकराने वाटाघाटी अंती ९ टक्के अंदाजीत प्राकलनापेक्षा जास्त रक्कम म्हणजेच रुपये ४१,२१,२०६/— (एकेचाळीस लाख एकविस हजार दोनशे सहा मात्र) या दराने काम करण्यास तयार असल्याचे सांगीतले व त्यानुसार लेखी पत्र दिले.

पावसाळयापुर्वी नाले सफाईचे काम हे ‘ नैसर्गिक आपत्तीची पुर्व तयारी ’ या बाबीशी निगडीत असल्याने पावसाळयात पूरस्थिती निर्माण होऊ नये म्हणून सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. नाले सफाईचे काम नागरीकांच्या आरोग्याशी व जिवीताशी निगडीत असल्याने सदर काम करणे अत्यावश्यक आहे. तरी सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी व मे. व्ही. आर. पनवेलकर, अंबरनाथ यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले रुपये ४१,२१,२०६/— (एकेचाळीस लाख एकविस हजार दोनश सहा मात्र.) दरांबाबत निर्णय घेवून संविदा करण्यास सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. २** **दिनांक:— १५/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनव्दारे छोटया मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेला गाळ डम्परंव्दारे डम्पींग ग्राऊडवर वाहतुक करणेकामी न्युनतम दराचे निविदाकार मेसर्स व्ही.आर.पनवेलकर, अंबरनाथ यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.५५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. रमेश चव्हाण यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर
महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२४/५/२०१२

**दि. २४/५/२०१२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक २४/५/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण | सदस्य |
| २ | श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ३ | सौ. ज्योती गायकवाड | सदस्या |
| ४ | सौ. नेहा भोईर | सदस्या |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवानी | सदस्य |
| ६ | सौ. मिना कुमार आयलानी | सदस्या |
| ७ | श्री. अकुंश म्हस्के | सदस्य |
| ८ | डॉ. महेश गावडे | सदस्य |
| ९ | सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता | सदस्या |
| १० | श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर | सदस्य |
| ११ | श्री. राजू रामसिंग कंडारे | सदस्य |
| १२ | सौ. जया मोहन साधवनी | सदस्या |
| १३ | श्री. गोदुमल किशनानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. कु. जयश्री जीवनलाल जग्यासी, २. सौ. पचंशीला नाना पवार, ३. सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
२. श्री. राजेंद्र चव्हाण, उप—आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
५. श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
६. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. एम.जी. गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. विनोद डवले, उप—आयुक्त, आरोग्य
९. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य
१०.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
११.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. जनसंपर्क अधिकारी
१२.श्री. सी.आर.पवार, लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गीस खान

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

सांयकाळी ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक १५/५/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास……

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**मागील सभेचे दिनांक १५/५/२०१२ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक १५/५/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नांव : डॉ. महेश गावडे

**स्थायी समिती ठराव क्र. :–** २ अ **दिनांक : २४/५/२०१२**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १५/५/२०१२ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :–** पावसाळयापुर्वी शहरातील छोटे नाले मनुष्यबळाद्वारे सफाई करणेकामी न्युनत्तम दराचे

निविदाकार मे.शुभम कंन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>या विषयाबाबतीत स्पष्टीकरण कोण करेल आणि किती मजुर देणार आहात?

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी:—</u>मागील सभेत मी व श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी आपणांस सांगितले होते की, नाले सफाईच्या कामासाठी पर्यवेक्षक नेमला जावा व त्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक सर्व सदस्यांना दिले जावेत. त्याचबरोबर जे मोठे नाले साफ करणार आहात, त्यांची यादी पुढील सभेत दिली जावी. ती अदयाप दिलेली नाही.

<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>नाले सफाईचे काम चालु झाले आहे काय? कधी पासुन चालु झाले आहे? व किती तास मशिन चालविली जाते?

<u>श्री. विनोद डवले, प्र. उप—आयुक्त, आरोग्य:—</u>१६ मे ला उद्घाटन करुन काम चालु केले आहे.

<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>पावसाळा चालु होण्याच्या आधी नाले सफाईचे काम पुर्ण झाले पाहिजे. व नाले साफ करुन जो कचरा गाळ काढला जाईल तो वेळीच डंम्पींग ग्राउंडवर पोहचविला पाहिजे.

<u>सदस्य डॉ. महेश गावडे:—</u>फॉलवर लाईन येथे मी पाहिले, नाले सफाई करुन काढलेला गाळ तसाच रस्त्यावर पडलेला आहे, पाच पाच उंचीचे ढिग साठले आहे. हळुहळु तो कचरा नाल्यात पडु लागला आहे.

<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>नाले सफाईमध्ये काढलेला कचरा गाळ रस्त्यावर कित्येक दिवसापासुन पडलेला आहे त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असून लोक आजारी पडणार नाहीत तर काय?

<u>श्री. विनोद डवले, प्र उप. आयुक्त, आरोग्य:—</u>नाले सफाई करुन जो गाळ काढलेला आहे, त्यातील पाण्याचा निचरा होण्यासाठी व तो सुकण्यासाठी म्हणुन ठेवला आहे.

<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>पाणी एक दिवसामध्ये निघुन जाते, त्यासाठी सहा, सात दिवस थोडे लागतात. काहीतरी सांगायचे म्हणुन सांगतात.

<u>श्री. विनोद डवले, प्र उप. आयुक्त, आरोग्य:—</u>छोटे नाले साफ करुन त्यातुन गाळ काढण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती. तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यातील शुभम कन्स्ट्रक्शन यांची ४१ टक्के जास्त दराची निविदा प्राप्त झाली होती आणि त्यानंतर त्यांच्याशी दोन वेळा वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी सुरुवातीलस २ टक्के दर कमी करुन ३९ टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली होती. पुन्हा त्यांच्याशी वाटाघाटी केल्यानंतर प्राकलनीय रक्कमेपेक्षा ३५ टक्के जास्त दराने काम करण्यास तयारी दर्शविली होती. हे दर प्राकलनीय रक्कमेपेक्षा जास्त असल्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आली होती. यावेळी पुन्हा तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. व त्यात शुभम कन्स्ट्रक्शन यांचे दर प्राकलनीय रक्कमेपेक्षा ३४ टक्के जास्त होते. त्यांच्याशी दर कमी संदर्भात दोन वेळा वाटाघाटी केले असता सुरुवातीस त्यांनी ३२ टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली. त्यानंतर पुन्हा त्यांच्याशी वाटाघाटी केले असता २४.९० टक्के जास्त दराने काम करण्यास त्यांनी संमती दर्शविली.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u> जेथे जेसीबी व प्रोक्लेन मशिन जात नाही अशा ठिकाणचे नाले आपण कसे साफ करणार? हे छोटे नाले साफ करण्यासाठी ठेकेदारास मजुर दयावे लागतील हे निविदेमध्ये समाविष्ट केले आहे काय? छोटे नाले सफाईसाठी किती मजुर दयावे लागतील.

<u>श्री. विनोद डवले, प्र. उप—आयुक्त, आरोग्य:—</u>छोटे नाले साफ करण्यासाठी ठेकेदार मजुर देणारा आहे.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>अजुनपर्यंत अर्थसंकल्प मंजुर झाला नसतांना याकामासाठी निविदा कशी मागविली? व ही निविदा मंजुर कशी झाली?

<u>श्री. विनोद डवले, प्र. उप—आयुक्त, आरोग्य:—</u>या कामी आम्ही लेखा विभागाकडुन मंजुरी घेतली आहे.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**हे सर्व कायदयानुसार आहे काय?

**श्री.विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक:—**हे तातडीचे काम होते, तसेच नैसर्गीक आपत्तीची तयारी या बाबीशी निगडित असल्याने पावसाळा पुरपरिस्थिती निर्माण होवु नये व त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याची व जिवितेची हानी होवु नये म्हणुन तातडीने नाले सफाईचे काम करणे आवश्यक होते.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**मागील वेळेस जो एक प्रस्ताव आला होता तो सुध्दा आपत्तकालीनचा होता, आता हा जो प्रस्ताव आलेला आहे हा सुध्दा आपत्तकालीनचा आहे. निवडणूकीच्या काळामध्ये असे किती प्रस्ताव मंजुर केले आहेत आपत्तकालीनचे असे प्रस्ताव येतच राहतील. अशा प्रस्तावांमुळे अर्थसंकल्पाला काही महत्व राहणार नाही. आम्हांला माहित पडले आहे की, तातडीचे कामे म्हणुन साडेचार कोटीचे प्रस्ताव आपण पारीत केले आहे. याची आम्ही चौकशी करु. मागील वेळेस नाले सफाई करणारा ठेकेदार कोण होता? त्यांनी या कामासाठी किती मजुर दिले होते? त्याच्याकडे पुरेश्या प्रमाणात मजुर आहेत की नाही? आम्हांला असे माहित पडले आहे की, मागील वर्षाच्या नाले सफाई ठेकेदाराकडे पुरेशे मजुर नव्हते. आता जो आपण ठेकेदार नेमत आहात त्याच्याकडे पुरेसे मजुर आहेत किंवा नाहीत? कुणाला जर मजुरांची आवश्यकता पडली तर मजुर मिळतील किंवा नाही?

**श्री. विनोद डवले, प्र. उप—आयुक्त, आरोग्य:—**मजुर मिळतील, मागील वेळेस ठेकेदाराने दिले होते.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**प्रत्येक पॅनलमध्ये किती मजुर दिले जातील, प्रत्येक प्रभागामध्ये किती मजुर दिले जातील त्यांची कामाची वेळ काय असेल? ही सर्व माहिती आम्हांला दिली जावी.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—**मोठे व छोटे नाले सफाईचे काम ठेकेदाराचे आहे. व निविदेमध्ये अशी एक अट टाकली जावी की, नाला सफाईचे काम झाल्यानंतर संबंधीत नगरसेवकाचे पत्र घेतले जावे. नाहीतर बरेचसे नगरसेवक महासभेमध्ये नाले सफाईबाबत ओरड करत असतात.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**नाले सफाईकामी नगरसेवकांना मजुर उपलब्ध करुन दिले पाहिजेत.

**सदस्य श्री. राजु कंडारे:—**नाले सफाईसाठी किती मजुर दयाल?

**श्री. विनोद डवले, प्र. उप—आयुक्त, आरोग्य:—**नाले सफाईचे काम झाल्यानंतर संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकाचे पत्र घेणे जरुरीचे राहिल. पत्र घेतले नाही तर ठेकेदारास देयक अदा करण्यामागे त्रासाचे होईल.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:—**मागील वेळेस माझ्या प्रभागातील नाले सफाईकामी एकही मजुर लावण्यात आला नव्हता, तरी सुध्दा ठेकेदारास देयक अदा केले होते.

**सदस्या श्रीमती जया साधवानी:—**आम्हांस माहित पडले पाहिजे की, आमच्या प्रभागात अमुक अमुक हे तीन मजुर दिले आहेत, आमच्या प्रभागातील मुकादम त्यांच्याकडुन काम करुन घेवु शकेल. व आपण हे जे मजुर दयाल ते मुकादमाकडे किती वाजता पोहचतील?

**श्री. विनोद डवले, प्र. उप—आयुक्त, आरोग्य:—**ते मजुर येथिल नाहीत, बाहेर गावावरुन येतात, त्यामुळे सकाळी ९.०० वाजता ते येतील आणि ८ तास काम करतील.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**त्यांचा हजेरीपट कोणाकडे असेल? व ठेकेदार त्यांना किती पगार देईल?

**श्री. विनोद डवले, प्र. उप—आयुक्त, आरोग्य:—**आपल्या हिशोबाने मजुरास प्रतिदिन २४५ रुपये याप्रमाणे रोज दिला पाहिजे परंतु ठेकेदाराने किती रोज दयायचा हे त्याच्यावर आहे.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**आम्हांला माहित तर पडावे की हे तीन कामगार आमच्या प्रभागामध्ये काम करत आहेत.

**सदस्य श्री. राजु कंडारे:—**हे लोक म्हणतात की, प्रत्येक पॅनलमध्ये पाच मजुर दिले जातील. त्यांच्याकडुन संपुर्ण प्रभागामध्ये नाले सफाईचे काम होईल काय?

यावेळी श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य यांनी सभागृहात प्रवेश केला.

**काही सदस्य:—**पास,पास.......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** पावसाळयापुर्वी शहरातील छोटे नाले मनुष्यबळाद्वारे सफाई करणेकामी न्युनत्तम दराचे
निविदाकार मे.शुभम कंन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार दिनांक १०/५/२०११ रोजी दैनिक लोकमत, दैनिक धनुषधारी व दै. सागर या वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन दिनांक ०५/५/२०१२ ते १४/५/२०१२ रोजी पर्यंत ४ कोरी निविदा पुस्तिका वेगवेगळया ठेकेदारांनी खरेदी केल्या, व दिनांक १५/५/२०१२ रोजी सकाळी १२.०० वाजेपर्यंत सदर सिलबंद निविदा स्विकारण्यात आल्या व प्राप्त ३ निविदा दि. १५/०५/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता उप — आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात उप — आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, यांचे उपस्थितीत निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे समोर उघडण्यात आल्या.

प्राप्त ३ निविदाचे पहिला लिफाफा (लिफाफा क्र.१) उघडून आवश्यक कागदपत्रे तपासणी करण्यात आली. तद्नंतर निविदा समितीने दिलेल्या सुचनेनुसार पात्र तिन निविदाकारांचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. सदर निविदेचा तपशील व प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अटी व शर्ती नुसार जोडलेली कागदपत्रे | शेरा | प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कं. | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा ४३.७० टक्के जास्त |
| २ | मे. शुभम कंन्स्ट्रक्शन | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा ४१ टक्के जास्त |
| ५ | मे. व्ही. आर. पनवेलकर | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा ४४ टक्के जास्त |

तरी वरील प्राप्त निविदांत मे. शुभम कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मक रित्या कमी असल्याने व सदरचे दर/रक्कम अंदाजीत प्राकलनापेक्षा ४१ टक्के जास्त म्हणजेच रुपये ४३,८९,९२६/— असल्यामुळे मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांना लगेचच निविदा समिती सदस्यांकडून वाटाघाटीसाठी पत्र देऊन बोलविण्यात यावे अशा सुचना करण्यात आल्या, त्यानुसार जा.क्र. उमपा/उप—आ/आवि/४२/१२ दिनांक १५/५/२०१२ अन्वये वाटाघाटासाठी पत्र देण्यात आले. त्याअनुषंगाने प्राकलना पेक्षा ४१ टक्के ऐवजी २ टक्के कमी करुन ३९ टक्के जास्त या दराने काम करण्यास तयार असल्याचे सांगून त्या प्रमाणे पत्र दिलेले आहे. संबंधीत निविदाकराने ३९ टक्के अंदाजीत प्राकलनापेक्षा जास्त रक्कम म्हणजेच रुपये ४३,२७,६५८/— (त्रेचाळीस लाख सत्ताविस हजार सहाशे अठ्ठावन्न मात्र) या दराने काम करण्यास तयार असल्याचे दिनांक १५/५/२०१२ रोजीच्या पत्रात नमुद केले आहे. वाटाघाटी अंती सदरचे प्राप्त दर हे जास्त असल्याचे वाटत असल्याने निविदाकारास पुन्हा वाटाघाटीसाठी निविदा समितीसमोर जा.क्र.उमपा/उप—आ/आवि/४५/१२ दिनांक १६/५/२०१२ रोजी दुपारी ३.३० वाजता समितीने दिलेल्या निर्देशानुसार बोलविण्यात आले होते. त्यानंतर दिनांक १८/५/२०१२ रोजी मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी दुस—या वाटाघाटीनंतरचे लेखी पत्र इकडील कार्यालयास सादर केलेले होते. सदर पत्रानुसार सदरचे

काम अंतीमत: ३५ टक्के जास्त या दराने करण्यास तयार असल्याचे नमुद केलेले आहे. सदरचे दर सुध्दा अंदाजीत प्राकलनापेक्षा जास्त असल्याने व कंत्राटदाराने ३५ टक्के पेक्षा कमी दर देण्याचे अमान्य केल्याने प्रशासनास फेर निविदा मागविणे क्रमप्राप्त ठरले.

दिनांक १९/५/२०१२ रोजी दैनिक पुण्य नगरी व दैनिक ठाणे वैभव या वर्तमान पत्रात फेरनिविदा सुचना प्रसिद्ध करुन दिनांक १९/५/२०१२ ते २१/५/२०१२ रोजी पर्यंत ३ कोरी निविदा पुस्तिका वेगवेगळया ठेकेदारांनी खरेदी केल्या, व दिनांक २१/५/२०१२ रोजी सकाळी ४.०० वाजेपर्यंत सदर सिलबंद निविदा स्विकारण्यात आल्या व प्राप्त ३ निविदा दि. २१/०५/२०१२ रोजी दुपारी ४.३० वाजता उप – आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात उप – आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, यांचे उपस्थितीत निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे समोर उघडण्यात आल्या.

प्राप्त ३ निविदाचे पहिला लिफाफा (लिफाफा क्र.१) उघडून आवश्यक कागदपत्रे तपासणी करण्यात आली. तद्नंतर निविदा समितीने दिलेल्या सुचनेनुसार पात्र तिन निविदाकारांचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. सदर निविदेचा तपशील व प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अटी व शर्ती नुसार जोडलेली कागदपत्रे | शेरा | प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कं. | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा ३९ टक्के जास्त |
| २ | मे. शुभम कंन्स्ट्रक्शन | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा ३४ टक्के जास्त |
| ५ | मे. व्ही. आर. पनवेलकर | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | **पात्र** | अंदाजीत प्राकलना पेक्षा ३६ टक्के जास्त |

वरील प्राप्त फेरनिविदांत मे. शुभम कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मक रित्या कमी असल्याने व सदरचे दर/रक्कम अंदाजीत प्राकलनापेक्षा ३४ टक्के जास्त म्हणजेच रुपये ४१,७१,९८७/– असल्यामुळे मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांना लगेचच निविदा समिती सदस्यांकडून वाटाघाटीसाठी पत्र देऊन बोलविण्यात यावे अशा सुचना करण्यात आल्या, त्यानुसार जा.क्र. उमपा/उप–आ/आवि/६० दिनांक २१/५/२०१२ अन्वये वाटाघाटासाठी पत्र देण्यात आले. त्याअनुषंगाने प्राकलना पेक्षा ३४ टक्के ऐवजी २ टक्के कमी करुन ३२ टक्के जास्त या दराने काम करण्यास तयार असल्याचे सांगून त्या प्रमाणे पत्र दिलेले आहे. संबंधीत निविदाकराने ३२ टक्के अंदाजीत प्राकलनापेक्षा जास्त रक्कम म्हणजेच रुपये ४१,०९,७१८/– (एकेचाळीस लाख नऊ हजार सातशे अठरा मात्र) या दराने काम करण्यास तयार असल्याचे दिनांक २१/५/२०१२ रोजीच्या पत्रात नमुद केले आहे. परंतु प्रशासनाने दिलेल्या निर्देशानुसार मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांना पुन्हा वाटाघाटीसाठी जा.क्र. उमपा/उप–आ/आवि/६१ दिनांक २२/५/२०१२ अन्वये बोलविण्यात आले होते. त्यानुसार वाटाघाटी अंती प्राकलाना पेक्षा २४.९० टक्के जास्त या दराने काम करण्यास तयार असल्याचे नमूद केले आहे. संबंधीत निविदाकार २४.९० टक्के अंदाजीत प्राकलनापेक्षा जास्त रक्कम म्हणजेच रुपये ३८,८८,६६५/– (अडोतीस लाख अठ्ठयाऐंशी हजार सहाशे पासष्ट मात्र) या दराने काम करण्यास तयार आहेत. सदरचे दर बनविण्यात आलेल्या प्राकलनापेक्षा २४.९० टक्के जास्त असल्याने प्राकलन बनविणा–या शाखा अभियंता, पाणी पुरवठा यांना त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी प्राकलन तयार करतांना प्राकलनातील बाब क्र. १ चा मजूर पुरवठयाचा दर पीडब्ल्युडी २०१०–११ चा दर विचारात घेऊन केले असून तो दर रु. २४५ असा आहे. तथापी एम.जे.पी. कडील चालु डी.एस.आर. सन२०११–१२ नुसार तो दर रु. ३१६.८० असल्याचे त्यांनी कळविले. त्यानुसार बाब क्र. १ ची मुळ अंदाजीत रक्कम रु. ३१,१३,४२३/– वरुन रु. ३५,६८,४९१/– इतकी होते. सदरची रक्कम विचारात घेतली असता निविदेचा दर हा सुमारे ८.९७ जादा दिसून येते. आरोग्य विभागाने प्राप्त निविदा दराबाबत दिलेल्या अभिप्रायाशी इतर विभाग असहमत असल्यास त्याचे देखील स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे. तसेच वाटाघाटी नंतर प्राप्त झालेले दर रु. ३८,८८,६६५/– व पोक्लेन मशिनद्वारे नाले सफाईसाठी येणारा खर्च रु. ४१,२१,२०६/– असा एकूण नाले सफाईसाठी **रुपये ८०,०९,८७१/–** होत आहे. म्हणजेच या कामी येणारा खर्च **लेखाशिर्षक ड (iv) नाला व गटार सफाई खर्च** सन २०१२–२०१३ साठी मा. आयुक्त यांचे अंदाजानुसार अंदाज पत्रकात रुपये ८०,००,०००/– तरतुद करण्यात आलेली आहे त्यापेक्षा रुपये ९,८७१/– रक्कम जास्त आहे.

पावसाळयापुर्वी नाले सफाईचे काम हे ‘ नैसर्गिक आपत्तीची पुर्व तयारी ’ या बाबीशी निगडीत असल्याने पावसाळयात पूरस्थिती निर्माण होऊ नये व त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याची व जिवीत हानी होवू नये म्हणून तातडीने नाले/गटारे/ कल्व्हर्ट सफाईचे काम करणे अत्यावश्यक आहे. तरी मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी सादर केलेले निविदेतील दरांबाबत निर्णय घेण्यास्तव सक्षम प्राधिका—यांकडे प्रस्ताव सादर. तसेच प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर ठेवण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३ **दिनांकः— २४/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती गायकवाड
अनुमोदकाचे नाव :— श्री. गोदुमल क्रिशनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पावसाळयापुर्वी शहरातील छोटे नाले मनुष्यबळाद्वारे सफाई करणेकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे.शुभम कंन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांच्याशी संविदेस व अंर्तभुत खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. राम पारवानी:—**सभापती महोदय, अर्थसंकल्पीय सभा लकवरात लवकर मागवा.

सांयकाळी ४.३६ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. रमेश चव्हाण यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १३/९/२०१२

**दि. १३/९/२०१२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक १३/९/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण | सभापती |
| २ | श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ३ | सौ. ज्योती गायकवाड | सदस्या |
| ४ | सौ. नेहा भोईर | सदस्या |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवानी | सदस्य |
| ६ | सौ. मिना कुमार आयलानी | सदस्या |
| ७ | कु. जयश्री जीवनलाल जग्यासी | सदस्या |
| ८ | श्री. अकुंश म्हस्के | सदस्य |
| ९ | सौ. पचंशीला नाना पवार | सदस्या |
| १० | सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता | सदस्या |
| ११ | श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर | सदस्य |
| १२ | श्री. राजू रामसिंग कंडारे | सदस्य |
| १३ | सौ. जया मोहन साधवनी | सदस्या |
| १४ | श्री. गोदुमल किशनानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. डॉ. महेश गावडे, २. सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३३.श्री. डी.जी. पवार, उप—आयुक्त, मुख्यालय
३४.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३५.श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त
३६.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
३७.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
३८.श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
३९.श्री. एम.जी गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
४०.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.
४१. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४२.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
४३.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
४४.श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता, विद्युत
४५.श्री. राजेश घनघाव, लिपिक, मालमत्ता विभाग
४६.श्री. कुशवाहा, फायरमन, अग्निशमन विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. श्याम शिवनानी

२. श्री. तानाजी पतंगराव

३. श्रीमती विशाखा सावंत

सांयकाळी ४.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री.डी.जी. पवार, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्यास्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १ :**–मागील सभेचे दिनांक ११/५/२०१२ (त्यात १५/५/२०१२ व २९/५/२०१२)
आणि २४/५/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य श्री. सुरेश जाधव :–**महापौर, उप–महापौर आणि सर्व सभापतींच्या वाहनभत्यासाठी स्थायी समितीमध्ये दिनांक २९/५/२०१२ रोजी ठराव क्र. ४ व दिनांक ९/७/२०१२ रोजी महासभेत जो ठराव पारीत केला होता, त्यावेळी असे कुणीही म्हटले नव्हते की, सुधारीत रक्कमेसाठी शासनाची मंजुरी घेण्यात यावी. शासनाची मंजुरी न घेता ही रक्कम थेट अदा करण्यात यावी असे सर्वांचे म्हणणे होते आणि यापुर्वी श्री. एस.एस.शुळ हे आयुक्त असतांना अशा प्रकारचा ठराव झाला होता. त्यावेळी शासनाची मंजुरी न घेता सदरची रक्कम थेट अदा करण्यात आली होती.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**वाढीव वाहनभत्त्याची रक्कम थेट अदा करण्याबाबतीत बोलण्यात आले होते. ठरावामध्ये शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन हे जे वाक्य लिहिलेले आहे ते काढुन टाकले जावे आणि जेव्हापासुन सभापतींच्या नियुक्ती झालेल्या आहेत, तेव्हापासुन वाढीव वाहनभत्ता प्रदान केला जावा.

**महापालिका सचिव:–**सुधारीत वाहनभत्त्याच्या रक्कमेस शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच सदरची रक्कम प्रदान करता येईल. मात्र सदरची रक्कम सभापतींनी पदभार स्विकारल्यापासुन प्रदान करण्यात यावी अशी जर आपली भावना असेल तर त्यासाठी अशासकिय प्रस्ताव आणुन ठराव पारीत करावा लागेल.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**श्री. शुळ साहेब आयुक्त असतांना वाहनभत्त्याविषयी असाच ठराव पारीत झाला होता आणि त्यावेळेला ती रक्कम थेट अदा करण्यात आली होती.

**महापालिका सचिव:–**त्यामुळेच त्याबाबत लेखापरिक्षणामध्ये आक्षेप नोंदविण्यात आला होता. आणि वाहनभत्त्याची रक्कम प्रदान करण्याचे थांबविण्यात आले होते तसे होवु नये म्हणुन अशासकिय प्रस्ताव आणुन ठराव पारीत करणे आवश्यक आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:–** तर मग काय त्यासाठी पुन्हा ठराव पारीत करावा लागेल?

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:–**पुन्हा ठराव पारीत करण्याची आावश्यकता आहे का?

**महापालिका सचिव:–**होय.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**तर मग तसा अशासकिय प्रस्ताव आणावा व इतिवृत्त कायम करावे.मागील सभेचे दिनांक ११/५/२०१२ (त्यात १५/५/२०१२ व २९/५/२०१२) आणि २४/५/२०१२ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १ :–**मागील सभेचे दिनांक ११/५/२०१२ (त्यात १५/५/२०१२ व २९/५/२०१२)
आणि २४/५/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नांव : श्री. सुरेश जाधव

**स्थायी समिती ठराव क्र. :– ४ अ** **दिनांक : १३/९/२०१२**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ११/५/२०१२ (त्यात १५/५/२०१२ व २९/५/२०१२) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७६ पर्यंतचे आणि २४/५/२०१२ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

.**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :–** प्रभाग क्र. १९, बॅ.नं. १२५ बी व बॅ.नं. ११६ बी, बसवेश्वर अपार्टमेंट जवळ उल्हासनगर–१ येथिल
जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

---

**काही सदस्य:–**पास,पास.......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :–** प्रभाग क्र. १९, बॅ.नं. १२५ बी व बॅ.नं. ११६ बी, बसवेश्वर अपार्टमेंट जवळ
उल्हासनगर–१ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता
देणे.

**प्रस्तावना**

प्रभाग क्र. १९, बॅ. नं. ११५ बी व बॅ. नं. ११६ बी बसवेश्वर अपार्टमेंट जवळ उल्हासनगर–१ येथिल १० सीट्चे ५ पुरुषांचे, ५ स्त्रियांचे जुने शौचालय नागरीकांच्या मागणीनुसार निष्कासित करणेबाबत मा. महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधी व नगरसेवक श्री. धनंजय बोडारे उल्हासनगर महानगरपालिका यांनी विनंती केलेली आहे.

प्रभाग क्रद १९ए बॅ. नं. ११५ बी व बॅ. नं. ११६ बी, बसवेश्वर अपार्टमेंट जवळ १० सिट्चे ५ पुरुषांचे, ५ स्त्रियांचे शौचालय मोडकळीस आलेले आहे, असा संबंधीत आरोग्य निरिक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन पंचनामा सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता प्रस्तावित शौचालय निष्कासित करुन सदर मालमत्तेवर मनपाची भांडारखोली/सीसी पॅसेज बांधणेसाठी निधी उपलब्ध होताच व कामाचे कार्यादेश दिल्यावर प्रस्तावित शौचालय निष्कासित करणेबाबतच्या निर्णयास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५ **दिनांकः– १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. १९, बॅ.नं. १२५ बी व बॅ.नं. ११६ बी, बसवेश्वर अपार्टमेंट जवळ उल्हासनगर–१ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व त्याठिकाणी सी.सी. पॅसेज बांधण्यास किंवा जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग/विनियोग करणेस मान्यता देत आहे.

**परंतु**

सदरचे शौचालय तोपर्यंत निष्कासित करु नये जो पर्यंत त्याठिकाणी विकास काम सुरु होत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३ :–** महापालिकेने सुशोभिकरण, विदयुतीकरण केलेल्या उदयानांच्या सुरेक्षिततेकरीता शासनाचे सुरक्षा मंडळाकडील सुरक्षा रक्षक घेणेकामी महापालिकेची सुरक्षा मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी नोंदणी शुल्क भरणे तसेच त्यांच्याकडुन ५३ सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रति महा प्रति सुरक्षा रक्षक रुपये ८५४९.४५/– प्रमाणे एकुण ५३ सुरक्षा रक्षकांच्या नेमणूकीसाठी एकुण रुपये ५४,३७,४५०/– खर्चाच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

————————————————————————————————————————

**सदस्या श्रीमती जया साधवानी:—**या विषयीची सविस्तर माहिती दिली पाहीजे. श्री. शिर्के हा विषय उदयान विभागाशी संबंधीत आहे. आपण ५३ सुरक्षा रक्षकांचा आकडा कसा तयार केलात, यासाठी काही यादीवगैरे आपण तयार केली आहे का? कोणकोणत्या उदयानांमध्ये सुरक्षा रक्षक देणार आहात? इंदिरा गांधी उदयान, राजीव गांधी उदयान, दसेरा उदयान ही जी मुख्य उदयाने आहेत त्यांच्यामध्ये सुरक्षा रक्षक आवश्यक आहेत. या अगोदर जे सुरक्षा रक्षक नेमले होते ते कोणत्या संस्थेमार्फत नेमण्यात आले होते? ते खुप चांगले काम करत होते. आता कोणत्या एजन्सी मार्फत सुरक्षा रक्षक नेमणार आहात? ५३ सुरक्षा रक्षकांची नेमणुक कोणत्या आधारावर करत आहात? त्याची आपण जी काही यादी तयार केली असेल, ती यादी आम्हांला दिली पाहिजे. काही, काही उदयानांना तीन,तीन प्रवेशद्वारे आहेत आपण तेथे किती सुरक्षा रक्षक पुरविणार आहात. ५३ सुरक्षा रक्षकांचा हा आकडा आला कसा याची आम्हांस माहिती दया.

**श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता:—**ही माहिती आताच पाहिजे का, सध्या माझ्याकडे ही माहिती नाही नंतर देवो.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**सपना गार्डन येथिल सुरक्षा एकदम झीरो आहे, काल प्रवेशद्वार तोडुन उद्यानात ट्रक उभे केले आहेत. दुचाकी वाहने सोडुन ट्रकवाले तेथे घुसले आहेत. ही मिळकत महापालिकेची आहे, तिचे संरक्षण करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. आमची नाही. महापालिकेचा कुणीही अधिकारी पोलिसात तक्रार करण्यास जात नाही. मी स्वत: जावुन तक्रार दाखल करुन आलो आहे. काही कालावधीपुर्वी मा. महापौरांनी सपना गार्डन विभाग चारचाकी वाहनासाठी नो पार्किंग झोन जाहिर केले आहे. तरी सुध्दा काल ट्रकवाल्याने गेट तोडुन तेथे ट्रक पार्क केले आहेत.

**श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता:—**पार्किंगचा मुद्दा आमच्याशी संबंधीत नाही, उदयानाचा मुद्दा आमच्याशी संबंधीत आहे, त्याची यादी मागवुन घेतो.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**आपण या विषयावर गंभीरतेने चर्चा करत असतांना श्री. शिर्के यांचे मात्र त्याकडे लक्ष नाही ते फोनवर बोलत आहेत.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:—**श्री. शिर्के साहेब, तुम्ही जरा गंभीरतेने घ्या.

**श्री.आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता:—**आपण ज्या यादी बाबत बोलत होतात त्या संबंधात मी विभागात फोन करुन सांगत होतो.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—**हे सुरक्षा रक्षक बंदुकधारी असतील कि काय? जर बंदुकधारी असतील तर ठिक आहे, नाहीतर पुन्हा निविदा काढा आणि सुरक्षा रक्षक हे बंदुकधारीच असले पाहिजेत.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:—**हे जे दर दिले आहेत ते जास्त आहेत. आणि सुरक्षा रक्षक हे बंदुकधारी असले पाहिजेत. दंडुकेधारी सुरक्षा रक्षकांचा काही फायदा नाही.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**आपल्या महापालिकेच्या कुण्या अधिका—यास हे माहित आहे का की सपना गार्डन येथिल गेट तोडुन ट्रकवाले आत घुसले आहेत, खरे तर त्यांच्यावर महापालिकेने एफआयआर दाखल करायला पाहिजे होता. तेथिल कारंज्या, लाईट सर्व बंद आहेत. सुरक्षा रक्षक नसल्यामुळे कारंज्याचे नोजल्स चोरी झाले आहेत. त्यामुळे कारंजे बंद झाले आहेत, आणि ही बाब मी श्री. शिर्के यांच्या निदर्शनास आणुन दिली आहे. तरीही याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही.

यावेळी श्री. राजेश घनघाव, लिपिक, मालमत्ता विभाग यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. गोदु क्रिशनानी :—**हे काय चालले आहे, उदयानांमधील सर्व सामानांची चोरी झाली आहे, याबाबत श्री. आयलानी यांच्याकडे तक्रार केली आहे. महापालिकेने याबाबत पोलिसात तक्रार केली पाहिजे.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:—**महापालिकेच्या मिळकतीमध्ये कोणीही घुसते हे काय चालले आहे? महापालिकेच्या एका भुखंडावर माती भरणीचे काम चालु आहे. त्याकडे महापालिकेतील अधिका—यांचे लक्ष नाही.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**नोजलची चोरी झाली आहे, कारंजे बंद पडले आहेत. तरीही कुणी अधिकारी याबाबत पोलिसात तक्रार करत नाहीत.

**सदस्य श्री. राजेश कंडारे :—**ट्रकवाले महापालिकेच्या मिळकतीमध्ये घुसण्याची हिम्मत कशी करतात?

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**सुरक्षा रक्षक बंदुकधारी असले पाहिजेत, पाहिजेतर त्यासाठी पुन्हा निविदा काढा.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**श्री. शिर्के, तुम्ही याबाबत पोलिसात एफआयआर दाखल करा. महापालिकेचा एक नटबोल्ड सुध्दा जाता कामा नये याची काळजी घ्या.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ३** :—महापालिकेने सुशोभिकरण, विदयुतीकरण केलेल्या उदयानांच्या सुरेक्षिततेकरीता शासनाचे सुरक्षा मंडळाकडील सुरक्षा रक्षक घेणेकामी महापालिकेची सुरक्षा मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी नोंदणी शुल्क भरणे तसेच त्यांच्याकडुन ५३ सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रति महा प्रति सुरक्षा रक्षक रुपये ८५४९.४५/— प्रमाणे एकुण ५३ सुरक्षा रक्षकांच्या नेमणूकीसाठी एकुण रुपये ५४,३७,४५०/— खर्चाच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उद्यानांच्या सुरक्षिततेकरिता सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणेसाठी महापालिकेने खाजगी संस्थांकडून निविदा मागवून मे.सेफ टेकर सिक्युरिटी फोर्स या अभिकर्त्याची नियुक्ती केली होती. मे.सेफ टेकर सिक्युरिटी फोर्स या अभिकर्त्याने दिलेले प्रति सुरक्षा रक्षक प्रतिमाह वेतनाचे दर रु.७०००/—इतके होते. महापालिकेने नियुक्त केलेल्या मे. सेफ टेकर सिक्युरिटी फोर्स या खाजगी एजन्सीबाबत निरिक्षक, सुरक्षा मंडळ, बृन्हमुंबई व ठाणे यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीचे अनुषंगाने त्यांनी दिनांक २४/०६/२०११ रोजी महापालिकेत प्रत्यक्ष भेट देऊन खाजगी अभिकर्त्याच्या केलेल्या नेमणुकीबाबत शासनाचे दि.०८नोव्हेंबर, २००६ च्या शासन निर्णयाची प्रत देवून त्यामधील तरतुदीनुसार सुरक्षा मंडळातील सुरक्षा रक्षक नियुक्त करणेबाबत सुचित केले होते. परंतु सुरक्षा मंडळाचे प्रतिमाह प्रति सुरक्षारक्षकाचे वेतन रु.८५४९.४५ इतके असून मे.सेफ टेकर सिक्युरिटी फोर्स या एजन्सीचा दर महापालिकेस आर्थिकदृष्टया फायदेशीर आहे.

परंतु निरिक्षक, सुरक्षा मंडळ यांनी सदर खाजगी एजन्सीमार्फत नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांबाबत निरिक्षण शेरे नोंद केले होते. त्यानुसार उक्त दि.०८/११/२००६च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार शासनाचे सुरक्षा मंडळाकडील सुरक्षारक्षक घेणे बंधनकारक आहे असे नमुद करुन प्रस्ताव मा. स्थायी समितीस सादर केला असता मा.स्थायी समिती ठराव क्र.६९, दि,१०/०८/२०११ अन्वये महापालिकेच्या फायदयाच्या दृष्टीने सुरक्षा मंडळाकडून सुरक्षारक्षक पुरविणेच्या संविदेस व प्राकलनास मान्यता दिली नाही व पुनश्च निविदा मागविण्यात याव्यात असा ठराव पारित केला आहे. परंतु सदर ठराव शासन निर्णयाची तरतुदीस अनुसरुन नाही. याबाबत सुरक्षा मंडळास इकडील दि. २१/०१/२०१२ च्या पत्राद्वारे प्रति सुरक्षा रक्षकाचे प्रतिमाह वेतनाचा दर जास्त असल्याने दराबाबत पुर्नविचार होणेबाबत कळविले होते. परंतु त्यांनी दि. २ मार्च, २०१२ च्या पत्रान्वये शासन निर्णय महापालिकेस बंधनकारक असून महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण)अधिनियम

१९८१ खालील योजना (सुधारित) २००२ चे खंड १३ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सुरक्षा मंडळामध्ये नोंदणी करुन मंडळाचे नोंदीत सुरक्षा रक्षक नियुक्त करणे आवश्यक असून महापालिकेची सुरक्षा मंडळाकडे नोंदणी न करणे ही बाब योजनेचे खंड १३ मधील तरतुदीचे उल्लंघन करणारी आहे असे नमुद केले आहे. तसेच सुरक्षा मंडळाकडून नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार लागु असलेले वेतन–भत्ते व लेव्हीचे दर हे सर्व आस्थापनासाठी एकसमान आहेत. सुरक्षा एजन्सीज सुरक्षा रक्षकांना १२/१२ तास राबवून कोणत्याही सुविधा न देता कमी वेतन देवून आर्थिक फायदा मिळवतात व कोणत्याही कामगार कायदयाचे योग्य रितीने पालन करीत नाहीत. या बाबी निदर्शनास आल्यामुळे महाराष्ट्र शासनाने खाजगी सुरक्षारक्षकांना कायदयाचे संरक्षण देण्याच्या हेतूने व त्यांच्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी सुरक्षा मंडळाची स्थापना केलेली आहे असे नमुद करुन उल्हासनगर महानगरपालिकेने सुरक्षा मंडळाकडे नोंदणी करणेसाठी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही न केल्यास अधिनियमातील खंड १३ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिके विरुध्द कारवाई करणे भाग पडेल असे कळविले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मा.स्थायी समितीने या विषयाबाबत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने सुरक्षा मंडळाकडील उपरोक्त पत्र अवगत करुन देऊन महापालिकेच्या सुशोभिकरण, विद्युतीकरण केलेल्या उद्यानांचे सुरक्षेकरिता सुरक्षारक्षक नेमणेसाठी शासन निर्णयातील तरतुदी बंधनकारक असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेची सुरक्षा मंडळाकडे नोंदणी साठी त्यांनी पाठविलेला नोंदणी अर्ज (फॉर्म ए) भरुन त्यासोबत नोंदणी शुल्क रु.१०३०/– (नोंदणी शुल्क + फार्म नं.१ ची किंमत) चा धनादेश सुरक्षा मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हयांकरिता या नावांने पाठविणेस व त्यांचेकडून सुरक्षारक्षक उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रतिमाह प्रतिसुरक्षारक्षक रु.८५४९.४५/– प्रमाणे एकुण ५३ सुरक्षारक्षकांसाठी वर्षाकाठी होणाऱ्या रु.५४,३७,४५०/– खर्चाचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६** **दिनांकः– १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेने सुशोभिकरण, विदयुतीकरण केलेल्या उदयानांच्या सुरेक्षिततेकरीता शासनाचे सुरक्षा मंडळाकडील सुरक्षा रक्षक घेणेकामी महापालिकेची सुरक्षा मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी नोंदणी शुल्क भरणे तसेच त्यांच्याकडुन ५३ सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रति महा प्रति सुरक्षा रक्षक रुपये ८५४९.४५/– प्रमाणे एकुण ५३ सुरक्षा रक्षकांच्या नेमणूकीसाठी एकुण रुपये ५४,३७,४५०/– खर्चाच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यापुर्वी बंदुकधारी सुरक्षारक्षक उपलब्धी महापालिकेस फायदेशीर दराने असावे या प्रयोजनार्थ निविदा काढून प्रयत्न करण्यास प्रशासनास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय कमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :–** श्री. डी.आर.पाटील यांना विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावर दिनांक

०१/०५/२०१२ पासुन पुढील ६ महिन्याच्या नियुक्तीस मुदतवाढ देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :–** श्री. डी.आर.पाटील यांना विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावर दिनांक ०१/०५/२०१२ पासुन पुढील ६ महिन्याच्या नियुक्तीस मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना**

श्री. डी. आर. पाटील यांची मा. महासभा ठराव क्र. ६१, दिनांक १६/१०/२००८ अन्वये विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) म्हणुन ०६ महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक करण्यात आलेली आहे. उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकाम विषयक मा. उच्च न्यायालयात सद्यस्थितीत प्रकरण सुरू आहे. त्याअनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत संबधित विकासक, जमीन मालक तसेच वास्तुविशारद यांचेविरूद्ध गुन्हे दाखल करण्याचे काम त्यांचेवर सोपविलेले आहे.

उक्त आदेशानुसार श्री. डी. आर. पाटील यांची महानगरपालिका आस्थापनेवरील विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावरील नेमणुकीची मुदत दिनांक २९/०४/२०१२ रोजी संपुष्टात येत आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत संबधित विकासक, जमीन मालक तसेच वास्तुविशारद यांचेविरूद्ध गुन्हे दाखल करण्याचे कामाकरीता श्री. डी. आर. पाटील, यांना मुदतवाढ द्यावयाची असल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) नुसार ०६ महिन्यांच्या कालावधी संपुष्टात आल्यानंतर १ दिवसाचा खंड देवून पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणेकामी मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

तरी श्री. डी. आर. पाटील, यांना विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदाकरीता मुदतवाढ देणेकामी मंजुरीकरीता मा. स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७ **दिनांकः– १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. रामचंद्र पारवानी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती पंचशिला पवार

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. डी.आर.पाटील यांना विशेष कार्य अधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) या पदावर दिनांक ०१/०५/२०१२ पासुन पुढील ६ महिन्याच्या नियुक्तीस मुदतवाढ देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :–** प्रभाग क्र. ११, राहुलनगर, न्यु टेलिफोन एक्सचेंज जवळील नाल्याच्या कडेला संरक्षण भिंत बांधणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**पास करा.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:–**माझ्या प्रभागातील एका नाल्याची भिंत पडली आहे. त्यामुळे नाल्याचे पाणी बाजुलाच असलेल्या एका इमारतीत पसरत असल्याने ही बाब दाखविण्यासाठी मी सभापती महोदय यांना बरोबर घेवुन गेलो होतो. इमारत खचण्याची शक्यता असल्याने तेथे भिंत बांधली गेली पाहिजे.

**सदस्य श्री. गोदु क्रिशनानी:–**मनिष नगर येथे छोटासा नाला आहे, त्यांचीही भिंत पडली असल्याने पावसाळयात नाल्याचे पाणी बाजुच्या इमारतीत शिरते, त्यामुळे इमारतीला धोका निर्माण होवु शकतो.

**सदस्या श्रीमती पंचशिला पवार :–**माझ्या प्रभागात सुध्दा नाल्याची भिंत पडली आहे, नाल्याच्या बाजुला संपुर्ण झोपडपट्टी असून पावसाळयात नाल्याचे पाणी सर्व झोपडयांमध्ये शिरते.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**माझ्या प्रभागात सुध्दा एक भिंत पडली आहे. याबाबत मी महासभेत सुध्दा दोन–तीन वेळा आवाज उठविला आहे. परंतु प्रशासनाकडुन काहीही कार्यवाही होत नाही.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**अशा ज्या धोकादायक भिंती आहेत, त्यांबाबत काळजी घ्या, जेणेकरुन जीवीत व वित्त हानी होणार नाही.

**श्री. आर.बी.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता:–**अशा कामांचे प्रस्ताव डीडीआरकडे पाठविलेले आहेत.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**माझ्या प्रभागात दोन–तीन महिन्यापुर्वी एक भिंत पडली होती. त्याबाबत महासभेत दोन तीन वेळा बोललो आहे. तोच प्रकार डॉ. गावडे यांच्या शाळेजवळ घडला आहे येथे सुध्दा एक भिंत पडली आहे. महानगरपालिकेच्या मालकीची भिंत पडली ती तेथिल लोकांनी स्वत: खर्च करुन बांधली. आता पुन्हा त्या भिंतीचा काही भाग कमजोर झाला आहे, थोडा पाऊस आला की भिंतीचा काही भाग पडतो, १७–१८ फुट लांबीची ती भिंत आहे. ती पुन्हा बांधली पाहिजे.

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता:–**२५–३० वर्षापुर्वी दगडाने बांधलेली भिंत आहे, भिंतीला लागुनच एक नाला आहे, नाल्याचे पाणी भिंतीत मुरत असल्यामुळे ही भिंत धोकादायक स्थितीत आहे व याभिंतीचा काही भाग यापुर्वीच आम्ही तोडला आहे. बाकी जो काही भाग आहे तो तोडु शकत नाही. कारण की या भिंतीला लागुनच काही घरे बांधण्यात आलेली आहेत. आता जर आम्ही ती भिंत तोडली तर लागुनच असलेल्या घरवाल्याचे काही आर्थिक नुकसान होवु शकते. ती भिंत तोडुन पुन्हा बांधावी लागेल, बाजुला महापालिकेचा दवाखाना आहे, पाण्याची टाकी आहे, पावसाळा संपल्यानंतर भिंत बांधण्याचे काम हाती घेवु.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:–**जीवित व वित्त हानी होणार नाही याची काळजी घ्या.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**श्री. शिर्के साहेब आपण चुकीचे बोलत आहात, घरे अगोदरच बांधण्यात आलेली आहेत दोन फुट उंचीची ती भिंत होती, आपला मध्यवर्ती जकात नाका तेथे चालु झाल्यानंतर तेथे मातीची भरणी झाल्यामुळे तो भाग वर आला आहे.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:–** आयुक्त साहेब, श्री. शिर्के साहेब, सदस्यांनी सुचविलेल्या व इतर धोकादायक भिंतींचे प्रस्ताव पुढच्या सभेत आणा.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ५ :–** प्रभाग क्र. ११, राहुलनगर, न्यु टेलिफोन एक्सचेंज जवळील नाल्याच्या कडेला संरक्षण भिंत बांधणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

प्रभाग क. ११ राहुलनगर, न्यु टेलीफोन एक्सचेंज जवळील नाल्याच्या कडेला संरक्षण भिंत बांधणेबाबत श्री.दिपक गाबा, अध्यक्ष, उल्हासनगर शहर यांनी मागणी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित कनिष्ठ अभियंता व उप–अभियंता यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर नाल्याच्या लगत घरे आहेत. सदर नाला व घरांच्या मधील येण्या–जाण्याचा रस्ता मोठया प्रमाणात खचला आहे. त्यामुळे तेथील रहिवाशांच्या जिवितास धोका पोहचण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणी ५० ते ६० मी.ची संरक्षण भिंत तातडीने बांधणे अत्यंत गरजेचे आहे.

त्यामुळे सदर कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्राकलन तयार करण्यात आले असून सदर प्राकलनाची किंमत रु. १८,८५,४८९/– एवढी होत आहे. महानगरपालिकेच्या वर्ष २०१२–१३ च्या अर्थसंकल्पातील नाला बांधणे या लेखाशिर्षात सदर कामाकरीता तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

तरी सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यमा मिळण्याकरीता स्थायी समिती सभेपुढे ठेवणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८ **दिनांक:– १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :– श्रीमती मिना आयलानी
अनुमोदकाचे नाव :– कु. जयश्री जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ११, राहुलनगर, न्यु टेलिफोन एक्सचेंज जवळील नाल्याच्या कडेला संरक्षण भिंत बांधणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६ :–** वाहतुक नियमनासाठी 'ट्रॅफिक वॉर्डन' नियुक्ती व देय मानधनावरील खर्च अर्थसहाय्य स्वरुपात पोलिस प्राधिकरणास देण्यास मान्यता देणे. .

———————————————————————————————————————————————————

————

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ६ :—**वाहतुक नियमनासाठी 'ट्रॅफिक वॉर्डन' नियुक्ती व देय मानधनावरील खर्च

अर्थसहाय्य स्वरुपात पोलिस प्राधिकरणास देण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, कल्याण विभाग यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये वाहतूक नियमनासाठी कर्मचारी वर्ग कमी पडत असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेकडून २५ ट्रॅफीक वॉर्डन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उल्हासनगर व अंबरनाथ अशी दोन युनिट असून उल्हासनगर पोलिस स्टेशन, मध्यवर्ती पोलिस स्टेशन, विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन, अंबरनाथ पोलिस स्टेशन, शिवाजी पोलिस स्टेशन, हिललाईन पोलिस स्टेशन, बदलापूर पुर्व व पश्चिम पोलिस स्टेशन अशी ८ पोलिस ठाण्याची हद्द असून या हद्दीतील युनिटमध्ये असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वाहतूक नियमन तसेच पार्कीग व्यवस्था केली जाते. वरील नमुद युनिटमध्ये नैमत्तिक रजा, हक्क रजा, वैद्यकीय रजा यावर कर्मचारी सोडले जात असल्याने प्रत्यक्षात वाहतूक नियमन व वाहन पार्किंगसाठी कर्मचा—यांची संख्या अत्यंत कमी पडते परिणाम स्वरुप योग्य प्रकारे वाहतूक नियमन व वाहन पार्कीग होत नसल्याने याचा त्रास उपद्रव नागरीकांना होतो.

सध्या उल्हासनगर शहरात रस्त्यांवर जलनिस्सारण व मलनिस्सारण वाहिन्या टाकण्याची कामे, गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम व काही रस्त्यांवर सिमेंट कॉक्रीटीकरणाचे काम सुरु आहे. शहर वाहतूक शाखेकडून वाहतूक नियंत्रण अधिसुचनेची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक पोलिस कर्मचा—यांचा उपयोग करवुन घेतला जातो.

एकंदरीत उल्हासनगर शहरामध्ये सध्या सुरु असलेली रस्त्यांची विविध विकास कामे त्याचप्रमाणे रस्त्यांवर जलनि:स्सारण व मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याची कामे, गॅस पाईपलाईन टाकण्याची कामे यासाठी वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच वाहनांच्या पार्किंगसाठी जास्तीत जास्त मनुष्यबळ आवश्यक असल्याने व शहर वाहतूक शाखेचे मनुष्यबळ कमी पडत असल्याने विशेष बाब म्हणून उल्हासनगर महानगरपालिकेकडून २५ ट्रॅफिक वॉर्डन मिळाल्यास उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाहतूक शाखेचे कामकाज अत्यंत परिणामकारक होईल व नागरीकांचा त्रास, उपद्रव देखील कमी होईल.

याकरीता विशेष बाब म्हणून व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातून उल्हासनगर शहरातील वाहतूक नियमनाकरीता २५ ट्रॅफीक वॉर्डन उल्हासनगर महानगरपालिकेकडून मिळणेस सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, कल्याण यांनी संदर्भिय विनंती प्रस्ताव महानगरपालिकेस दिलेला आहे.

कल्याण—डोंबिवली महानगरपालिकेतर्फे याधर्तीवर ट्रॅफिक वॉर्डन नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, कल्याण विभाग यांचे वरील प्रस्तावानुसार व उल्हासनगर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे २० ट्रॅफिक वॉर्डन यांना देय मानधनावरील खर्च वाहतूक शाखेस अर्थसहाय्य स्वरुपात देणे खालील अटी व शर्तीच्या आधारे प्रस्तावित आहे.

१) संबंधित २० ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधित २० ट्रॅफिक वॉर्डन यांना प्रतिमहा रु.२०००/— मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, कल्याण विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) २५ ट्रॅफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु.४,८०,०००/— खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वर्ष २०१२—१३ चे अंदाजपत्रकात सी ५ (६) वाहतूक नियंत्रण या लेखाशिर्षात २०.०० लक्ष एवढया उपलब्ध तरतूदीमधून करणेस मान्यता मिळणेस मा.स्थायी समितीसमोर प्रस्तावित करणेत येत आहे.

४) ट्रॅफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

५) ट्रॅफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

६) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

याबाबत दिनांक ५ मे,२०१२ रोजी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सर्व विभाग प्रमुख व पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग यांचे समवेत वाहतूक समस्यांबाबत घेतलेल्या बैठकीमध्ये उपरोक्त विषयी प्रस्ताव तयार करुन मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

तरी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ९ **दिनांक:–** १३/९/२०१२

सुचकाचे नाव :– श्री. राजु कंडारे
अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाहतुक नियमनासाठी 'ट्रॅफिक वॉर्डन' नियुक्ती व देय मानधनावरील खर्च अर्थसहाय्य स्वरुपात पोलिस प्राधिकरणास देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :–** मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत वित्तीय वर्ष २०१२–१३ करीता मालमत्ता कराची बिले छपाई करणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हिसेस यांच्याशी संविदेस मान्यता देणे..

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७ :–** मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत वित्तीय वर्ष २०१२–१३ करीता मालमत्ता कराची बिले छपाई करणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हिसेस यांच्याशी संविदेस मान्यता देणे..

**प्रस्तावना**

प्रतिवर्षाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस वर्ष २०१२—१३ करीता मालमत्ता कराची बिले छपाई करावयाची आहेत. बिलाचे वितरण झाल्यानंतर १५ दिवसांचे आत बिलाच्या रक्कमेचा भरणा करण्यात आला नाही तर पुढील सक्तीचे उपाय करण्यात येतात. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे १.६० लाख मिळकती असुन त्यासाठी मालमत्ता कराची बिले वितरीत करावयाची आहेत. तसेच अंदाजे ६५ कोटी रूपयांची वसुली करावयची आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन मिशन या योजनेत भाग घेतला असून या योजनेत अनुदान मिळणेसाठी मालमत्ता करची ९० टक्के वसुली होणे आवश्यक आहे. त्यामुळे ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्याअनुशंगाने मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत वित्तीय वर्ष २०१२—१३ करीता मालमत्ता कराची बिले छपाई करणेसाठी खाजगी अभिकर्ता नियुक्त करणेसाठी जा. क्र. युएमसी/पीआरओ/४५/१२, दिनांक ०९/०५/२०१२ अन्वये वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द् करण्यात आली होती. त्याअनुशंगाने खालील निविदाधारकांनी आपली निविदा सादर केली आहे.

| अ.क्र | निविदाधारकांचा तपशिल |
|---|---|
| १ | मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस<br>ऑफिस नं. ७, पहिला मजला,पार्वती प्लाझा, अशोक—अनिल टॉकिज रोड,शिवाजी चौक, उल्हासनगर—३ |
| २ | मे. ओम मनिष एंटरप्रायझेस<br>सायली निवास, संतोष नगर, शिवसेना शाखा, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर—४ |
| ३ | मे. अमर ज्योत एंटरप्रायझेस<br>बॅ. नं. ७१८, रूम नं. २, पप्पु सोसायटी जवळ, हॉस्पिटल एरीया, उल्हासनगर—३ |

प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २१/०५/२०१२ रोजी कर निर्धारक व संकलक यांचे दालनात निविदाधारकाचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आली आहे.

निविदापत्रकात नमुद केलेप्रमाणे प्रथम लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक बाबी) उघडण्यात आला. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदाधारक पात्र ठरले आहेत.

| अ.क्र | पात्र निविदाधारकांचा तपशिल |
|---|---|
| १ | मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस |
| २ | मे. ओम मनिष एंटरप्रायझेस |
| ३ | मे. अमर ज्योत एंटरप्रायझेस |

त्यानंतर पात्र निविदाधारकांनी सादर केलेला लिफाफा क्रमांक २ (वित्तीय बोली) उघडण्यात आला असता खालीलप्रमाणे देकार रक्कमेची बोली नमुद केली आहे.

| कामाचे स्वरूप | अंदाजित संख्या | मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस | | मे. ओम मनिष एंटरप्रायझेस | | मे. अमर ज्योत एंटरप्रायझेस | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिबिल रूपये | एकुण किंमत | प्रतिबिल रूपये | एकुण किंमत | प्रतिबिल रूपये | एकुण किंमत |
| वित्तीय वर्ष 2012—13 करीता मालमत्ता कराची बिले छपाई करणे | 1,61,000 | 6.60 | 10,62,600/- | 7.75 | 12,47,750/- | 8.50 | 13,68,500/- |

उपरोक्त तक्ता पाहता मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस यांनी सादर केलेले दर सर्वात लघुत्तम असल्याचे दिसुन येते. परंतु सदरचे दर चालु बाजार भावापेक्षा अधिकतम असल्याने याबाबत वाटाघाटी करणेसाठी जा. उमपा/कर विभाग/५६/१२, दि. २१/०५/२०१२ रोजीचे पत्रान्वये मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस यांना कळविण्यात आले आहे. वाटाघाटीअंती दिनांक २१/०५/२०१२ रोजीचे पत्रान्वये मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस यांनी सदरकामी प्रतिबिल ६.३०/— या दराने काम करणेसाठी आपली संमती दर्शविली आहे.

| कामाचे स्वरूप | अंदाजित संख्या | मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस | |
|---|---|---|---|
| | | प्रतिबिल रूपये | एकुण किंमत |

| | | | |
|---|---|---|---|
| वित्तीय वर्ष 2012–13 करीता मालमत्ता कराची बिले छपाई करणे | 1,61,000 | 6.30/- (सहा रूपये 30 पैसे) | 10,14,300/- |

मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत वित्तीय वर्ष २०१२–१३ करीता मालमत्ता कराची बिले छपाई करणेसाठी वर्ष २०१२–१३ चे अंदाजपत्रकात A-3(2) Printing या लेखा शिर्षाखाली तरतुद करण्यात आली आहे.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(क) नुसार मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत वित्तीय वर्ष २०१२–१३ करीता मालमत्ता कराची बिले छपाई करणेसाठी मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस यांचेशी करार करणेबाबत मंजुरीकरीता स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १०** **दिनांकः– १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. गोदुमल क्रिशनानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता कर आकारणी व वसुली व्यवस्थापन अंतर्गत वित्तीय वर्ष २०१२–१३ करीता मालमत्ता कराची बिले छपाई करणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. आदित्य कॉम्प्युटर्स सर्व्हिसेस यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

------------------------------------------------------------------------

**विषय क्र. ८ :–** माहे **ऑक्टोंबर २०११** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा

अहवाल विचारात घेणे.

------------------------------------------------------------------------

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**सभापती महोदय, महापालिका लेख्यांचा हिशोब बरोबर दिला आहे का?

**सभापती, श्री. रमेश चव्हाणः–**उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे, त्यामुळे उत्पन्न वाढविण्याची कार्यवाही करण्याचे आदेश दयायचे आहेत. विषय क्र. ८ ते ११ हे एकसारखेच आहेत.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८ :–** माहे **ऑक्टोंबर २०११** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य

लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे आक्टोंबर, २०११ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ३,०७,०२,४२,००० |
| “ब” | ७,५३,००० |
| “क” | १४२,८७,५९,००० |
| एकूण | ४४९,९७,५४,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ३२०,०४,८४,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ४०,३१,३६,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २३,९१,००,००० |
| ५ | एकुण | ३८४,२७,२०,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ४३,९२,००० |
| ७ | एकुण :— | ३८४,७१,१२,००० |

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ३२०,०४,८४,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे आक्टोंबर, २०११ मध्ये समप्रमाणात रुपये १८६,६९,४९,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये १०४,६३,९४,४६०/—(एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ५६.०४टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे आक्टोंबर, २०११ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प “अ”** | | सन २०१०—११ चे सुधारीत अंदाजित उत्पन्न (रू. हजारात पुर्णांकित) | माहे आक्टोंबर २०११ चे अपेक्षित उत्पन्न (रू. हजारात पुर्णांकित) | माहे आक्टोंबर २०११ चे प्रत्यक्ष जमा उत्पन्न (रू. हजारात पुर्णांकित) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | १२६,०७,६१,००० | ७३,५४,४३,९१६ | ७८,८०,६८,३०० |
| २ | मालमत्ता कर | ५४,७८,००,००० | ३१,९५,५०,००० | १०,७९,३८,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ३२,७७,००,००० | १९,११,५८,३३४ | २,२२,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | ५०,००,००० | २९,१६,६६७ | २,५०,००० |
| ५ | रुग्णालय फी | ३,००,००० | १,७५,००० | १,५४,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ५,९६,००,००० | ३,४७,६६,६६७ | १८,५८,१६० |
| ७ | संकीर्ण | २,३१,४५,००० | १,३५,०१,२५० | ४८,९४,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २०,५९,००,००० | १२,०१,०८,३३५ | ४,००,१४,००० |
| | एकूण “अ” | **२४३,०२,०६,०००** | **१,४१,७६,२०,१६७** | **९४,३३,९८,४६०** |
| | **अर्थसंकल्प “ब”** | | | |
| | महसूल उत्पन्न | ७,५३,००० | ४,३९,२५० | २,२७,००० |
| | एकूण “ब” | ७,५३,००० | ४,३९,२५० | २,२७,००० |
| | **अर्थसंकल्प “क”** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३६,००,००,००० | २१,००,००,००० | ५,८४,४६,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २७,७०,००,००० | १६,१५,८३,३३३ | १,५०,०९,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मालमत्ता कर | १३,११,००,००० | ७,६४,७५,००० | २,८४,९८,००० |
| ३ | परवाना/इतर फी | १२,००,००० | ७,००,००० | ७,५३,००० |
| ४ | संकीर्ण | २,२५,००० | १,३१,२५० | ६३,००० |
| | **एकुण "क"** | ७६,९५,२५,००० | ४४,८८,८९,५८३ | १०,२७,६९,००० |
| | **एकुण "अ","ब" व "क"** | **३२०,०४,८४,०००** | **१८६,६९,४९,०००** | **१०४,६३,९४,४६०** |

सन २०१०–११च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ४५०,४१,४६,०००/–(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे आक्टोंबर,२०११ अखेरपर्यंत रू. १६४,४४,७२,२५२/–(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च–

माहे ऑक्टोंबर,२०११ अखेर पर्यंत रु. १४०,२३,०१,२३९/–खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ८५.२७ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे आक्टोंबर, ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे– माहे आक्टोंबर, २०११ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ०८ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

'निरंक'

**स्थायी समिती ठराव क्र.** ११ **दिनांकः– १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राजु कंडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे ऑक्टोंबर २०११ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे..

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

–––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

⇨ **विषय क्र. ९ :–** माहे **नोव्हेंबर २०११** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

–––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :—** माहे **नोव्हेंबर २०११** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे नोव्हेंबर, २०११ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ३,०७,०२,४२,००० |
| “ब” | ७,५३,००० |
| “क” | १४२,८७,५९,००० |
| एकूण | ४४९,९७,५४,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ३२०,०४,८४,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ४०,३१,३६,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २३,९१,००,००० |
| ५ | एकुण | ३८४,२७,२०,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ४३,९२,००० |
| ७ | एकुण :— | ३८४,७१,१२,००० |

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ३२०,०४,८४,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये समप्रमाणात रुपये २१३,३६,५६,००१/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये ११७,५२,५९,३८८/—(एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ५५.०८टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प “अ”** | | सन २०१०—११ चे सुधारीत अंदाजित उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** | माहे नोव्हेंबर २०११ चे अपेक्षित उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** | माहे नोव्हेंबर २०११ चे प्रत्यक्ष जमा उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | १२६,०७,६१,००० | ८४,०५,०७,३३४ | ८७,७०,४३,००० |
| २ | मालमत्ता कर | ५४,७८,००,००० | ३६,५२,००,००० | १२,८३,५६,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ३२,७७,००,००० | २१,८४,६६,६६७ | १४,५१,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | ५०,००,००० | ३३,३३,३३३ | २,५०,००० |
| ५ | रुग्णालय फी | ३,००,००० | २,००,००० | १,८०,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | परवाना व इतर फी | ५,९६,००,००० | ३,९७,३३,३३३ | २०,८१,००० |
| ७ | संकीर्ण | २,३१,४५,००० | १,५४,३०,००० | ४८,९४,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २०,५९,००,००० | १३,७२,६६,६६७ | ४,०४,६७,००० |
| | **एकूण "अ"** | **२४३,०२,०६,०००** | **१६२,०१,३७,३३४** | **१०५,४७,२२,०००** |
| | **अर्थसंकल्प "ब"** | | | |
| | महसूल उत्पन्न | ७,५३,००० | ५,०२,००० | ३,३१,३८८ |
| | **एकूण "ब"** | ७,५३,००० | ५,०२,००० | ३,३१,३८८ |
| | **अर्थसंकल्प "क"** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३६,००,००,००० | २४,००,००,००० | ६,९८,१७,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २७,७०,००,००० | १८,४६,६६,६६७ | १,५५,०९,००० |
| २ | मालमत्ता कर | १३,११,००,००० | ८,७४,००,००० | ३,४०,३७,००० |
| ३ | परवाना/इतर फी | १२,००,००० | ८,००,००० | ७,७६,००० |
| ४ | संकीर्ण | २,२५,००० | १,५०,००० | ६७,००० |
| | **एकुण "क"** | ७६,९५,२५,००० | ५१,३०,१६,६६७ | १२,०२,०६,००० |
| | **एकुण "अ","ब" व "क"** | **३२०,०४,८४,०००** | **२१३,३६,५६,००१** | **११७,५२,५९,३८८** |

सन २०१०–११च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ४५०,४१,४६,०००/–(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे नोव्हेंबर,२०११ अखेरपर्यंत रू. १८२,३९,५६,८६६/–(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च–

माहे नोव्हेंबर,२०११ अखेर पर्यंत रु. १५८,५०,८१,७३५/–खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ८६.९० टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे नोव्हेंबर ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे– माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा–यांची ०३ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

'निरंक'

**स्थायी समिती ठराव क्र. १२** **दिनांक:– १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राजु कंडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे नोव्हेंबर २०११ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे..

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

**विषय क्र. १० :—** माहे **डिसेंबर २०११** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

——————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. १० :—** माहे **डिसेंबर २०११** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे डिसेंबर, २०११ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ३,०७,०२,४२,००० |
| “ब” | ७,५३,००० |
| “क” | १४२,८७,५९,००० |
| एकूण | ४४९,९७,५४,००० |

**सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.**

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ३२०,०४,८४,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ४०,३१,३६,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २३,९१,००,००० |
| ५ | एकुण | ३८४,२७,२०,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ४३,९२,००० |
| ७ | एकुण :— | ३८४,७१,१२,००० |

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ३२०,०४,८४,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे डिसेंबर, २०११ मध्ये समप्रमाणात रुपये

२४०,०३,६२,९९८/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये १३९,१३,९९,९००/—(एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ५७.९६ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे डिसेंबर, २०११ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प "अ"** | | सन २०१०—११ चे सुधारीत अंदाजित उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** | माहे डिसेंबर २०११ चे अपेक्षित उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** | माहे डिसेंबर २०११ चे प्रत्यक्ष जमा उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | १२६,०७,६१,००० | ९४,५५,७०,७५० | १०१,६८,६०,९०० |
| २ | मालमत्ता कर | ५४,७८,००,००० | ४१,०८,५०,००० | १६,९०,३३,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ३२,७७,००,००० | २४,५७,७५,००० | १४,६८,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | ५०,००,००० | ३७,५०,००० | २,५०,००० |
| ५ | रुग्णालय फी | ३,००,००० | २,२५,००० | २,०३,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ५,९६,००,००० | ४,४६,९९,९९९ | २४,५४,००० |
| ७ | संकीर्ण | २,३१,४५,००० | १,७३,५८,७५० | ४८,९४,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २०,५९,००,००० | १५,४४,२४,९९९ | ४,१५,१३,००० |
| | **एकूण "अ"** | **२४३,०२,०६,०००** | **१८२,२६,५४,४९८** | **१२३,६६,७५,९००** |
| | **अर्थसंकल्प "ब"** | | | |
| | महसूल उत्पन्न | ७,५३,००० | ५,६४,७५० | ३,३१,००० |
| | **एकूण "ब"** | ७,५३,००० | ५,६४,७५० | ३,३१,००० |
| | **अर्थसंकल्प "क"** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३६,००,००,००० | २७,००,००,००० | ९,१९,९७,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २७,७०,००,००० | २०,७७,५०,००० | १,५९,७८,००० |
| २ | मालमत्ता कर | १३,११,००,००० | ९,८३,२५,००० | ४,५४,८०,००० |
| ३ | परवाना/इतर फी | १२,००,००० | ९,००,००० | ८,६३,००० |
| ४ | संकीर्ण | २,२५,००० | १,६८,७५० | ७५,००० |
| | **एकुण "क"** | ७६,९५,२५,००० | ५७,७१,४३,७५० | १५,४३,९३,००० |
| | **एकुण "अ","ब" व "क"** | **३२०,०४,८४,०००** | **२४०,०३,६२,९९८** | **१३९,१३,९९,९००** |

सन २०१०—११च्या 'अ''ब'व'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ४५०,४१,४६,०००/—(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे डिसेंबर,२०११ अखेरपर्यंत रू. २०८,५४,३३,०४९/—(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च—

माहे डिसेंबर,२०११ अखेर पर्यंत रु. १८२,७७,०५,९७३/—खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ८७.६४ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे डिसेंबर ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे — माहे डिसेंबर, २०११ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची ०५ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

'निरंक'

**स्थायी समिती ठराव क्र. १३** **दिनांक:— १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :— श्रीमती आशा गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती नेहा भोईर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **डिसेंबर २०११** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे..

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

**विषय क्र. ११ :—** माहे **जानेवारी २०१२** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा
परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

———————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११ :—** माहे **जानेवारी २०१२** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य
लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे जानेवारी, २०१२ चा जमा खर्चाचा अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

जमा:—

वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ३,०७,०२,४२,००० |
| “ब” | ७,५३,००० |

| | |
|---|---|
| “क” | १४२,८७,५९,००० |
| एकूण | ४४९,९७,५४,००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ३२०,०४,८४,००० |
| ३ | शासकीय अनुदान | ४०,३१,३६,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २३,९१,००,००० |
| ५ | एकुण | ३८४,२७,२०,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ४३,९२,००० |
| ७ | एकुण :– | ३८४,७१,१२,००० |

वित्तीय वर्ष २०१०–२०११ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये ३२०,०४,८४,०००/– अपेक्षित धरलेली आहे. माहे जानेवारी, २०१२ मध्ये समप्रमाणात रुपये २६६,७०,६९,९९९/– महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये १५२,४६,१६,०००/–(एकूण अपेक्षित महसूल जमेच्या ५७.१६ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे जानेवारी, २०१२ मध्ये प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष **अर्थ संकल्प “अ”** | | सन २०१०–११ चे सुधारीत अंदाजित उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** | माहे जानेवारी २०१२ चे अपेक्षित उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** | माहे जानेवारी २०१२ चे प्रत्यक्ष जमा उत्पन्न **(रू. हजारात पुर्णांकित)** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | १२६,०७,६१,००० | १०५,०६,३४,१६६ | १०९,३१,२५,००० |
| २ | मालमत्ता कर | ५४,७८,००,००० | ४५,६५,००,००० | १९,८०,८०,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ३२,७७,००,००० | २७,३०,८३,३३३ | १४,७८,००० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | ५०,००,००० | ४१,६६,६६७ | २,५०,००० |
| ५ | रुग्णालय फी | ३,००,००० | २,५०,००० | २,२८,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ५,९६,००,००० | ४,९६,६६,६६७ | २७,४६,००० |
| ७ | संकीर्ण | २,३१,४५,००० | १,९२,८७,५०० | ४८,९४,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | २०,५९,००,००० | १७,१५,८३,३३३ | ४,८१,५४,००० |
| | एकूण “अ” | **२४३,०२,०६,०००** | **२०२,५१,७१,६६६** | **१,३४,८९,५५,०००** |
| | **अर्थसंकल्प “ब”** | | | |
| | महसूल उत्पन्न | ७,५३,००० | ६,२७,५०० | ३,३१,००० |
| | एकूण “ब” | ७,५३,००० | ६,२७,५०० | ३,३१,००० |
| | **अर्थसंकल्प “क”** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ३६,००,००,००० | ३०,००,००,००० | १०,४९,१८,००० |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | २७,७०,००,००० | २३,०८,३३,३३३ | १,७३,६९,००० |
| २ | मालमत्ता कर | १३,११,००,००० | १०,९२,५०,००० | ५,२०,५९,००० |
| ३ | परवाना/इतर फी | १२,००,००० | १०,००,००० | ९,०९,००० |
| ४ | संकीर्ण | २,२५,००० | १,८७,५०० | ७५,००० |
| | एकुण “क” | ७६,९५,२५,००० | ६४,१२,७०,८३३ | १७,५३,३०,००० |
| | एकुण “अ”,“ब” व “क” | **३२०,०४,८४,०००** | **२६६,७०,६९,९९९** | **१५२,४६,१६,०००** |

सन २०१०–११च्या ‘अ’‘ब’व‘क’ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ४५०,४१,४६,०००/–(प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. प्रत्यक्षात माहे जानेवारी,२०१२ अखेरपर्यंतरू. २२५,६२,६३,०९५/–(प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून अनियमितता आढळल्यास निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

खर्च—

माहे जानेवारी, २०१२ अखेर पर्यंत रु. २०३,७२,३१,९००/—खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसुलाच्या ९०.२९ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे जानेवारी ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे— माहे जानेवारी, २०११ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची ०६ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ च्या तरतुदीप्रमाणे)

'निरंक'

**स्थायी समिती ठराव क्र. १४** **दिनांकः— १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :— श्रीमती पंचशिला पवार

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती नेहा भोईर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे **जानेवारी २०१२** अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे..

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १२ :—** सन २००८—०९ चा लेखा परिक्षकांचा महापालिका लेख्यांचा छाननी अहवाल विचारात घेणे.

————————————————————————————————————————

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**२००८—०९ चा लेखापरिक्षण अहवाल एवढा उशिरा कसा आला? .

यावेळी श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक यांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षकः—**सन २००८—०९ च्या लेखा परिक्षणामध्ये जवळ जवळ २६ आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. त्यांची पुर्तता करण्यासाठी अतिक्रमण विभाग, नगररचना विभाग, पाणी पुरवठा विभाग, भांडार विभाग, नागरी सुविधा केंद्र या संबंधीत विभागांना आदेश देण्यात आले आहेत.

**सभापती श्री. रमेश चव्हाण :—**लेखा परिक्षण अहवालाबाबत आणखी कुणाला काही विचारायचे आहे का?

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**२००८—०९ चा लेखा परिक्षण अहवाल आता का आला आहे?

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**एवढा उशिर का झाला?

**श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षकः—**खर्चाची देयके अदा करण्याअगोदर आपण त्या त्या खर्चाच्या बाबींचे पुर्व लेखा परिक्षण करतो, आणि त्यानंतर सर्वविभागांचे वर्षनिहाय एकत्रितपणे लेखापरिक्षण करतो त्यानुसार आता आपण सन २००८—०९ या वर्षाच्या लेखा परिक्षणापर्यंत आलो आहोत.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**शहरामध्ये केलेली विकास कामे बरोबर आहेत की नाहीत याबाबत शहर अभियंत्यांचा एक अहवाल असतो. तो अहवाल आहे काय?

**सभापती, श्री. रमेश चव्हाणः—**या परिक्षण अहवालात एकुण २६ आक्षेप नोंदविण्यांत आलेले आहेत. त्यावर खुलासा देण्यासाठी प्रत्येक विभागास वेळ दयावी लागेल. कमीत कमी दोन महिन्याची वेळ देणे योग्य राहिल, ज्या काही अनियमितता झाल्या आहेत त्यांचे अनुपालनही करायचे आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**ठिक आहे, किती वेळ लागेल?

**सभापती, श्री. रमेश चव्हाणः—**लेखा विभागाची स्थिती काय आहे?

**श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारीः—**गेल्या १२ दिवसात स्थानिक संस्था करापोटी ४.५० कोटी रुपयांची वसुली झालेली आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**बाहेर जे ठेकेदार उपोषणाला बसले आहेत त्यांच्या पेमेंटचे काय?

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**जैन साहेबांनी मला एक पत्र लिहिले आहे, त्यांचे म्हणणे आहे की मला येथुन कार्यमुक्त करा. अधिकारी जर असे जायला लागले तर महापालिकेचे काय होणार?

**सदस्या श्रीमती जया साधवानीः—**५६ लाखाच्या घोटाळयाबाबत मी व श्रीमती ज्योती कालानी यांनी जे पत्र दिले होते त्याबाबत काय झाले? अशाच स्थितीमध्ये आपण महापालिकेतुन जाणे उचित होणार नाही.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**हा विषय महासभेपुढे आणा.

**श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारीः—**मी आयुक्त साहेबांना आजच (दिनांक १३/९/२०१२ रोजी) पत्र दिले आहे, सभागृहाच्या माहितीसाठी ते मी वाचुन दाखवितो.

उल्हासनगर महानगरपालिकेची वित्तीय स्थिती गेल्या ६ महिन्यांपासून फारच ढासळत चाललेली आहे. बांधिल खर्चाची पूर्तता देखिल करता येत नाही. ऑगस्ट २०१२ चे महाराष्ट्र औद्योगिक विकास महमंडळाचे २ कोटी ५५ लाखाचे पाण्याचे बिल देखिल अदा करण्यात आलेले नाही. कर्मचा—यांच्या कपातीचे २ कोटी रक्कमेची देयके प्रलंबित आहेत. एकूण बांधिल खर्चाच्या तुलनेत येणारे उत्पन्न अपेक्षेपेक्षा कमी असल्यामुळे महापालिकेचा दैनंदिन खर्च भागविणे देखील अवघड होत चालले आहे. त्याचप्रमाणे कर्मचारी युनियनस्, ठेकेदार असोसिएशन माझ्यावरती वैयक्तीक स्वरुपाचे आरोप करतांना दिसून येतात. बरेचसे पदाधिकारी व नगरसेवक देखिल याला अपवाद नाहीत. अशा वैयक्तीक आरोपांमुळे मला मानसिक पिडा होते व यामुळे मी माझे कार्य करतांना १०० टक्के न्याय देवू शकत नाही. त्याचप्रमाणे माझ्या प्रतिनियुक्तीला ३ वर्षे देखिल पूर्ण झालेली आहेत. यापूर्वी देखिल मी मे, २०१२ रोजी तत्कालीन आयुक्तांकडे कार्यमुक्त करणेबाबत अर्ज केला होता. तरी मला तात्काळ कार्यमुक्त करावे ही विनंती.

एक प्रत मा. सभापती महोदय यांना सादर करतो.

यावेळी श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी यांनी मा. सभापतींना पत्र सादर केले.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**शहराची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेवुन त्यांनी हे पत्र दिले आहे. ही चांगली गोष्ट आहे ना? खरे तर हा विषय महासभेचा असल्याने महासभेत आणला जावा.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**आपणास पगार मिळतो किंवा नाही?

**श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारीः—**माझा तीन वर्षाचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पुर्ण झालेला आहे. सध्या युनियन कडुन आणि पदाधिका—यांकडुन माझ्यावर आरोप होत आहेत. अशा स्थितीत माझी मानसिक स्थिती बरोबर नसल्याने मला कार्यमुक्त करावे.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:—**श्री. जैन साहेब मी तुम्हांला २४/८/२०१२ रोजी पत्र दिले आहे, त्याची तुम्ही मला अदयाप माहिति दिली नाही व आता म्हणता की मला जायचे आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—**बाहेर ठेकेदार उपोषणास बसले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की आम्हांस पेमेंट मिळत नाही. त्यांना पेमेंट का दिले जात नाही? महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली असते तेव्हा तुम्ही येथे राहता आणि आर्थिक स्थिती कमकुवत झाल्यानंतर येथुन जायचे आहे म्हणता.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:—**महानगरपालिका आणीबाणीच्या स्थितीतुन जात आहे, अशावेळेस अधिका—यांनी जाणे बरोबर आहे का?

**सदस्या श्रीमती जया साधवानी:—**आता आता विषय क्र. ४ मध्ये श्री. पाटील यांना मुदतवाढ दिली आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही मग त्यांना मुदतवाढ कशी देत आहात?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत संबंधीत विभागाकडुन परिच्छेद १ ते २६ पर्यंत खुलासा व अनुपालन अहवाल दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत अपेक्षीत धरुन सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १२ :—**सन २००८—०९ चा लेखा परिक्षकांचा महापालिका लेख्यांचा छाननी अहवाल विचारात घेणे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १५ **दिनांक:— १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— कु. जयश्री जग्यासी

ही स्थायी समिती सोबत जोडलेल्या पृष्ठ क्र. १ ते २० पर्यंतच्या सन २००८—२००९ च्या लेखा परिक्षकांचा महापालिका लेख्यांचा छाननी अहवालाची नोंद करीत आहे व दिनांक ३० नोव्हेंबर, २०१२ पर्यंत प्रलंबित लेखा परिच्छेद क्र. १ ते २६ पर्यंतच्या परिच्छेदांचे अनुपालन व खुलासा संबंधीत विभाग प्रमुखांकडुन घेण्यास व नियमबाहय प्रकरणी कसुरदार अधिकारी/कर्मचा—याविरुध्द कारवाई करण्यास आयुक्तांस निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**(विषय क्र. १२ च्या सोबत जोडलेल्या यादीचे पृष्ठ क्र. २४ ए ते २४ झेड (१०) सोबत जोडले आहे.**

**)**

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १३ :—** सन २०१२—१३ करीता मालमत्ता कराची बिले पोस्टामार्फत (स्पीड पोस्ट) वितरीत करणेकामी
प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

————————————————————————————————————————

**सदस्या श्रीमती जया साधवानी:—**याबाबत निविदा काढायची होती.

**महापालिका सचिव:—**हे काम शासनाचे आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १३ :—** सन २०१२—१३ करीता मालमत्ता कराची बिले पोस्टामार्फत (स्पीड पोस्टने) वितरीत

करणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

प्रतिवर्षाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस वर्ष २०१२—१३ करीता मालमत्ता कराची बिले वितरीत करावयाची आहेत. बिलाचे वितरण झाल्यानंतर १५ दिवसांचे आत बिलाच्या रक्कमेचा भरणा करण्यात आला नाही तर पुढील सक्तीचे उपाय करण्यात येतात. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे १.६१ लाख मिळकती असुन त्यासाठी मालमत्ता कराची बिले वितरीत करावयाची आहेत. त्याअनुशंगाने मालमत्ता कर विभागात कार्यरत असलेल्या लिपीक व बिल सर्वेअर ची संख्या फारच कमी असुन ते बिल वितरण करण्यासाठी अपुरे आहेत. जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांना स्थानिक संस्था कर विभागामार्फत व्यापाऱ्यांच्या नोंदणीचे अतिरिक्त काम सोपविण्यात आले आहे. सदरील दोन्ही कामकाज महानगरपालिकेच्या अर्थिक बाबींशी संबंधित असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना एका वेळी दोन्ही विभागात काम करणे शक्य नाही. व याचा थेट परिणाम मालमत्ता कर बिलांचे वितरण व त्याअनुशंगाने वसुलीवर होण्यची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय बिलाचे वाटप केल्याबद्दल व्यवस्थित पोहोच घेतली नाही तर त्यानंतरची संपुर्ण कार्यवाही अवैध ठरते.

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कराबद्दलची बिले बजावण्याबाबतची विशेष तरतुद पुढीलप्रमाणे आहे.**

कलम ४७२, ४७३ आणि ४७४ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, कोणत्याही नगरपालिका कराबद्दचे बिल, त्या करास पात्र असलेल्या व्यक्तीस, शहरातील तिच्या शेवटच्या माहीत असलेल्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या ठिकाणाच्या पत्त्यावर, तिच्या नावावर टपाल दाखला घेऊन, आगाऊ आकार भरलेल्या पत्राद्वारे साध्या डाकेने पाठवता येईल आणि अशा रीतीने पाठवण्यात आलेले प्रत्येक बिल, ते ज्या पाकिटातुन किंवा आवेष्टनातून पाठवण्यात आले असेल ते पाकिट किंवा आवेष्टन ज्या दिवशी टपालाने आले असेल त्या दिवसाच्या लगेच नंतरच्या दिवशी ते बिल देण्यात आले आहे असे मानले जाईल आणि अशा रीतीने बिल दिल्याचे सिध्द् करताना, ज्या पाकिटातुन किंवा आवेष्टातून अस बिल पाठवण्यात आले असेल त्या पाकिटावर किंवा आवेष्टनावर योग्य रीतीने पत्ता लिहिलेला होता आणि ते टपाल दाखला घेऊन टपालात टाकण्यात आले होते, असे सिध्द् करणे पुरेस होईल, अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन मिशन या योजनेत भाग घेतला असून या योजनेत अनुदान मिळणेसाठी मालमत्ता करची ९० टक्के वसुली होणे आवश्यक आहे. त्यामुळे ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत टपालाद्वारे बिलाचे बितरण करावयाचे झाल्यास पोस्ट ऑफिसचा पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | रजिस्टर एडी (पोहच शिवाय)<br>Regd. Ad (W/O Acknow) | रू. २०/— प्रति बिल |
| २) | रजिस्टर एडी (पोहच शिवाय)<br>Regd. Ad (With Acknow) | रू. २५/— प्रति बिल |
| ३) | स्पीड पोस्ट | रू. १३.२०/— प्रति बिल |

वर्ष २०१२—१३ करीता मालमत्ता कराची बिले पोस्टामार्फत (स्पीड पोस्ट) वितरीत करणे उचित वाटते.

सदरचा खर्च अंदाजपत्रक Inf Technology Code या लेखा शिर्षातून भागविण्यात येईल. त्याअनुशंगाने मालमत्ता कराची बिले पोस्टामार्फत वितरणासाठी अंदाजित रक्कम रू. २२ लाख इतका खर्च अपेक्षित असल्याने सदरील खर्चास मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १६** **दिनांक:— १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. गोदुमल क्रिशनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २०१२—१३ करीता मालमत्ता कराची बिले पोस्टामार्फत (स्पीड पोस्टने) वितरीत करणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १४ :—** सध्या अस्तित्वात असलेली एस्कॉट (परिगमन) फी रुपये २०/— वरुन रुपये १००/— इतकी करणेस व ती मंजुर होईपर्यंत रुपये २०/— या दराने एस्कॉट फी वसुल करण्याकामी कर्मचा—यांची नेमणुकीस मान्यता व त्या प्रयोजनार्थ निविदा काढणेस मान्यता देणे.

————————————————————————————————————————————————

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**स्थानिक संस्था कर चालु झाला आहे अशा स्थितीत एस्कॉट फीमध्ये वाढ करता येवु शकते काय?

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये १०० रुपये एस्कॉट फी घेतली जाते आणि एस्कॉट फी वसुली बाबत त्यांनी ऑनलाईन निविदा काढलेली आहे. आनलाईन प्रक्रिया नको.

**महापालिका सचिव:—**शासनाकडुन मंजुरी मिळेपर्यंत २० रुपये एस्कॉट फी वसुल करायची आहे. शासन मंजुरीनंतर आपणांस १०० रुपये एस्कॉट फी वसुल करता येईल.

**सदस्या श्रीमती जया साधवानी:—**एस्कॉट फी वसुलीसाठी निविदा काढावी लागेल.

**महापालिका सचिव:—**आयुक्त साहेब आपण एस्कॉट फी १०० रुपये करु इच्छित आहात काय? नियमानुसार २० रुपयापेक्षा जास्त करु शकत नाहीत.

**श्री. डी.जी. पवार, उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—**जकात नियम १९९६ चा १७ (७) नुसार एस्कॉट फीमध्ये वाढ केली जावु शकते काय?

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:—** याची जरा खात्री करुन घ्या.

**<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—</u>** नियमानुसार जर आपण २० रुपयापेक्षा जास्त एस्कॉट फी घेवु शकत नाही तर कल्याण—डोंबिवली महापालिकेमध्ये सुध्दा स्थानिक संस्था कर लागु केला असतांना तेथे १०० रुपये एस्कॉट फी कशी आकारली जाते?

**<u>श्री. डी.जी. पवार, उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u>**नियमाप्रमाणे स्थायी समिती एस्कॉट फी वाढवु शकते.

**<u>महापालिका सचिव:—</u>**कल्याण डोबिंवली महापालिकेच्या नियमामध्ये फेरबदल करण्यात आलेले आहेत.

**<u>सभापती, श्री. रमेश चव्हाण :—</u>**जकात नियमामध्ये काय तरतुद आहे?

**<u>महापालिका सचिव :—</u>**जकात नियमामध्ये २० रुपये एस्कॉट फी वसुल करण्याची तरतुद आहे.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>**जकात नियमानुसार कमीत कमी व जास्तीत जास्त २० रुपये एस्कॉट फी वसुल करु शकतो.

**<u>महापालिका सचिव:—</u>**या अगोदर एक प्रस्ताव पारीत करुन शासनास पाठविलेला आहे त्यास अदयाप मंजुरी मिळाली नाही.या विषयाबाबत नियमामध्ये काय तरतुद आहे मुख्य लेखा परिक्षक त्याबाबत आपण मार्गदर्शन करा.

**<u>श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक:—</u>**मला नियम बघावा लागेल.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>**महापालिकेची आर्थिक स्थिती खराब आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती पाहता एस्कॉर्ट फी २० रुपयावरुन १०० रुपये केली पाहिजे.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**आता गणपती उत्सव जवळ आला आहे, रस्त्यांवर जागोजागी खड्डे आहेत, त्यांचे काय?

**<u>श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता:—</u>**शहरातील रस्त्यांवर जागोजागी पडलेले खड्डे बुजविण्याच्या कामाची निविदा मागविण्यात आल्या असून आजच सायंकाळी ५.०० वाजता त्या उघडणार आहोत.

**<u>सभापती, श्री. रमेश चव्हाण :—</u>**एस्कॉट फी वाढविण्याबाबतचा प्रशासनाने विषय आणला आहे, तो पास करुन शासनाकडे पाठविण्यात यावा. व त्यामध्ये महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली नाही हे नमुद करावे.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—</u>**दर निश्चित करुन मंजुरीसाठी शासनाकडे पाठवावे लागेल.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्री. रमेश चव्हाण :—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १४ :—** सध्या अस्तित्वात असलेली एस्कॉट (परिगमन) फी रुपये २०/— वरुन रुपये १००/— इतकी करणेस व ती मंजुर होईपर्यंत रुपये २०/— या दराने एस्कॉट फी वसुल करण्याकामी कर्मचा—यांची नेमणुकीस मान्यता व त्या प्रयोजनार्थ निविदा काढणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ मधिल तरतूदीचे अनुषंगाने उल्हासनगर महापालिका महासभा ठराव क्र. ९७ दि. २८/१/२००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मध्ये दुरूस्ती करण्यात आली आहे. सोबत ठराव जोडला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ मधिल तरतूदीनुसार नियमात करण्यात आलेल्या कोणत्याही फेरबदलास शासनाची मंजुरी आवश्यक असते. त्याअनुषंगाने मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि. ४/१०/२००७ रोजी जकात नियमावलीत दुरूस्तीच्या मंजुरीसाठी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्याला अजून शासनाकडून मंजूरी प्रलंबित आहे. दि. २८/१/२००३ रोजी मा. महासभेने जो ठराव क्र. ९७ पारीत केला होता त्यामध्ये प्रशासनाकडून खालीलप्रमाणे प्रस्तावना सादर केली गेली होती.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत उपभोग, उपयोग किंवा विक्रीकरिता आयात करण्यात येणा-या मालावर जकात आकारण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने स्वतंत्र उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ तयार केले असून सदर नियमास राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक, नगर विकास क्र. <u>उमपा/३०९७/५०४/सीआर-७४/९७/४ड-२३/दिनांक १२.४.१९९७</u> नुसार मंजुरी दिली आहे. उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मधील नियम क्रमांक १७(२) नुसार त्वरीत निर्यात करावयाच्या जकात आकारणी योग्य माल महापालिका क्षेत्रातुन प्रवेश नाक्यावरून निर्गमन नाक्यावर जाताना लेखी परवानगी -नि-पारगमन पास प्रदान करण्यांत येतो. सदर नियमावली मधिल नियम १७(७) नुसार लेखी परवानगी नि-पारगमन पास प्रदान करण्यासाठी वसुल करण्यांत येणा-या फी चा कमाल दर प्रती वाहन रू. २०/-(रूपये वीस फक्त) निश्चित करण्यात आलेला होता. सदरचा दर इतर महापालिकेच्या तुलनेत कमी असल्याचा प्रस्ताव प्रशासनाकडून महासभेपुढे गेला होता. त्यात पारगमन पास अदा करण्यासाठी प्रति वाहन रू.१००/-(रूपये शंभर फक्त) इतका वाढविण्यासाठी प्रस्तावित केला होता. अशा प्रकारचा पास वाढीव दराने प्रदान केल्यास त्याचा शहरातील उद्योगधंदे व व्यापारी यांचेवर कोणताही परिणाम होणार नाही.

मागिल तीन आर्थिक वर्षात प्रत्यक्ष एस्कॉर्ट फी, ठेकेदारांकडून झालेली वसूली त्यांचेकडील प्राप्त पत्र दि. २१ जून, २०१२ प्रमाणे पुढीलप्रमाणे :-

| **वर्ष** | **रक्कम** |
|---|---|
| २००९-१० | रू. ७०,९२,७००/- |
| २०१०-११ | रू. ८३,२५,८२०/- |
| २०११-१२ | रू. ९६,९३,५००/- |

अशाप्रकारे जकात अभिकर्त्याने केलेली वसूली पाहता त्यामध्ये साधारण १५ टक्के वार्षिक वाढ

झाल्याचे दिसून येते. शासन परिपत्रक दि. १९ एप्रिल, २०११ अन्वये जकातीच्या बाबतीत १५ टक्के नैसर्गिक वाढ करण्याचे नमूद केले आहे. त्याप्रमाणे सदरच्या एस्कॉर्ट निविदेसाठी देखिल १५ टक्के नैसर्गिक वाढ करणे योग्य राहील. २०११-१२ ची एस्कॉर्ट फी वसूली रक्कम रू. ९६,९३,५००/- इतकी आहे. ती रू.२०/-(रूपये वीस फक्त) प्रति वाहन या दराने वसूली झालेली आहे. रू. १००/- (रूपये शंभर फक्त) इतकी एस्कॉर्ट फी प्रति वाहन केली तर किमान देकार रक्कम (Minimum Offer Price) पुढीलप्रमाणे येईल.

| | |
|---|---|
| रू. ९६,९३,५००/- | रू. २०/- प्रति वाहन प्रमाणे |
| रू. ४८४,४७,५००/- | रू. १००/- प्रति वाहन प्रमाणे |

रू.४८४,६७,५००/- या रकमेमध्ये १५ टक्के नैसर्गिक वाढ केली तर येणारी रक्कम रू. ५,५७,३७,६२५/- वार्षिक इतकी होते. दर दिवशी एस्कॉर्ट फी ची किमान देकार रक्कम (Minimum Offer Price) ही रू.१,३२,७३३/- एवढी होते. उल्हासनगर महापालिका जकात नियम १९९६ मधिल नियम क्र. १७ चा पोट नियम ६ अन्वये एस्कॉट /(परिगमन) फी ची निश्चिती करणेचे अधिकार मा. स्थायी समितीस असून त्याची निश्चिती मा. आयुक्त यांनी करावयाची आहे. रू. २०/- एस्कॉर्ट/परिगमन फी कमी असल्याने रू.

**१००/- एस्कॉर्ट/परिगमन फी मा. आयुक्तांमार्फत मा. स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी सादर. तो पर्यंत रू. २०/- एस्कॉर्ट फी घेणेसाठी जकात नाक्यावर कर्मचा-यांची नेमणूक करणेस्तव मान्यतेसाठी सादर.**

स्थायी समिती ठराव क्र. १७ दिनांकः— १३/९/२०१२

सुचकाचे नाव :— श्री. राजु कंडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सध्या अस्तित्वात असलेली एस्कॉट (परिगमन) फी रुपये २०/— वरुन रुपये १००/— इतकी करणेस व ती मंजुर होईपर्यंत रुपये २०/— या दराने एस्कॉट फी वसुल करण्याकामी कर्मचा—यांची नेमणुकीस मान्यता व त्या प्रयोजनार्थ निविदा काढणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :—** प्रभाग क्र. ४८, श्रीराम टॉकीज समोर, रत्नदीप हॉस्पीटल व वेटब्रिज जवळ, उल्हाससनगर—४ या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय चालविणे कामी कार्यरत ठेकेदार टॉयलेट ॲण्ड टॉयलेट कंपनी यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे दिनांक २५/१०/२०१० रोजी पारीत केलेला स्थायी समिती ठराव क्र. ५७ रद्द करुन सदर काम वाल्मिकी युवा समाज समिती यांना देण्यास मान्यता देणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 👍

---

☑

**विषय क्र. १५ :—** प्रभाग क्र. ४८, श्रीराम टॉकीज समोर, रत्नदीप हॉस्पीटल व वेटब्रिज जवळ, उल्हाससनगर—४ या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय चालविणे कामी कार्यरत ठेकेदार टॉयलेट ॲण्ड टॉयलेट कंपनी यांनी करारनाम्यातील अटी व

शर्तीचा भंग केल्यामुळे दिनांक २५/१०/२०१० रोजी पारीत केलेला स्थायी

समिती ठराव क्र. ५७ रद्द करुन सदर काम वाल्मिकी युवा समाज समिती यांना

देण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मा. स्थायी समिती ठराव क्र.२६ दि. २६/०७/२००४ अनुसार वाल्मीकी युवा समाज समिती यांना प्रभाग क्र. ४८, श्रीराम टॉकीज समोर, रत्नदीप हॉस्पीटल जवळ, वेटब्रिज जवळ, उल्हासनगर – ४ या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय चालविणेसाठी देणेबाबत दि. २४/०८/२००४ रोजी करारनामा करणेत आला होता. परंतू सदर जागेचा वाद निर्माण झाल्याने हे प्रकरण न्यायालयात दाखल झाले होते त्यामुळे वाल्मिकी युवा समाज समिती यांना बांधकाम थांबविणेसाठी दि. ११/१२/०७ रोजी पत्र देण्यात आलेले होते.

आता त्याबाबतचा न्यायालयीन वाद UMC/LD/MCA 80/07IN113/03 DETE, 25/02/2011 अन्वये संपुष्टात आला आहे, परंतू त्याच ठिकाणी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७ दि. २५/१०/१० नुसार श्री. विशाल मोहन द्विवेदी टॉयलेट ॲन्ड टॉयलेट कंपनी टि.एफ – १० डी. वसंत स्कायर मॉल, वसंत कुंज, न्यु दिल्ली–११००७०. यांचे सोबत दिनांक ०४/०१/२०११ रोजी करारनामा करणेत आला होता. सदर कंपनीने शौचालयाचे बांधकाम करारनाम्यानुसार तीन महिन्यात पुर्ण करावयाचे होते परंतु आजपर्यंत ते पुर्ण केलेले नाही. त्यामुळे टॉयलेट ॲन्ड टॉयलेट कंपनीने करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केला आहे.

यामुळे मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७ दि. २५/१०/१० रोजीचा ठराव रद्द करुन मा. महासभा ठराव क्र. २६, दि. २६/७/२००४ अनुसार वाल्मिकी युवा समाज समिती यांना कार्यादेश देणेत यावेत अशा प्रकारे वाल्मिकी युवा समाज समिती यांनी दि. १/२/११ रोजीच्या अर्जात मागणी केल्या प्रमाणे तसेच श्री. धनंजय बा. बोडारे, यांनी दि. २७/१२/११ रोजी विनंती अर्जान्वये मागणी केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

टॉयलेट ॲन्ड टॉयलेट कंपनीने करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे मा. स्थायी समिती ठराव क्र. ५७ दि. २५/१०/१० रोजीचा केलेला ठराव रद्द करुन श्री. धनजंय बोडारे व वाल्मिकी युवा समाज समिती यांच्या विनंतीचा विचार करता वाल्मिक युवा समाज समिती यांना पुन्हा देणेबाबत सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पटलाववर धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १८ **दिनांकः– १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मिना आयलानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ४८, श्रीराम टॉकीज समोर, रत्नदीप हॉस्पीटल व वेटब्रिज जवळ, उल्हाससनगर–४ या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय चालविणे कामी कार्यरत ठेकेदार टॉयलेट ॲण्ड टॉयलेट कंपनी यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे दिनांक २५/१०/२०१० रोजी पारीत केलेला स्थायी समिती ठराव क्र. ५७ रद्द करुन सदर काम वाल्मिकी युवा समाज समिती यांना देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १६ :–** उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीतील ''नो पार्किंग'' जागेवर उभी असलेली वाहने ट्राफिक पोलिसामार्फत टोईंग वाहनाद्वारे उचलुन त्यांच्याकडुन दंड वसुली करणेकामी सर्वात जास्त रॉयल्टी देणारे ठेकेदार मेसर्स प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा. लि. उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

———————————————————————————————————————

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १६ :–** उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीतील ''नो पार्किंग'' जागेवर उभी असलेली वाहने ट्राफिक पोलिसामार्फत टोईंग वाहनाद्वारे उचलुन त्यांच्याकडुन दंड वसुली करणेकामी सर्वात जास्त रॉयल्टी देणारे ठेकेदार मेसर्स प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा. लि. उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीतील नोपार्किंग जागेवर उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी वाहतुक शाखेचे अधिकारी, ट्राफिक पोलीसा मार्फत टोईंग वाहन उपलब्ध करून देण्याची मागणी होत असते.या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेने सदर टोईंग वाहन खरेदी करणे ऐवजी ठेकेदारामार्फत टोईंग वाहन मनुष्य बळ सहित घेऊन वाहतुक शाखेस उपलब्ध करून देणेचे ठरविले.त्यासाठी वाहन विभागाने दिनांक २/०६/२०१२ च्या दै. प्रात:काल, दै.वार्ताहार, दै.नगर न्युज व लोकल वृत्तपत्रामध्ये विषयांकित कामाच्या प्रसिध्द केलेल्या जाहिर सुचनेनुसार खालील नमुद केलेल्या व्यक्ती/संस्था/कंपनी/फर्म यांनी विहित नमुन्यात कोरे निविदा संच नियमानुसार विकत घेऊन विहित वेळेत निविदा सादर केल्या.

१) मेंसेर्स. साईनाथ कृपा मजुर कामगार सहकारी संस्था, उल्हासनगर
२) मेंसेर्स. श्याम ट्रान्सपोर्ट, उल्हासनगर
३) मेंसेर्स. नव भारत टोंईग, उल्हासनगर
४) मेंसेर्स. प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि, उल्हासनगर

सदर दिनांक १५/६/२०१२ रोजी प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २०/६/२०१२ रोजी दुपारी ठिक १२:०० वाजता मा. उप आयुक्त (वाहन), मा. मुख्यलेखा अधिकारी, मा. मुख्यलेखा परिक्षक, वाहन विभागप्रमुख व वरिल चारही निविदाकार यांच्या समक्ष उघडते वेळी मेंसेर्स. नव भारत टोंईग, उल्हासनगर यांनी लाखेने मोहरबंद नसलेल्या निविदा उघडण्यात येऊ नये असा लेखी आक्षेप घेतला व त्याबाबत त्यांनी कोर्टाचा आदेश देखील सादर केला.

मेंसेर्स.साईनाथ कृपा मजुर कामगार सहकारी संस्था, उल्हासनगर यांच्या निविदेस लाखेचे सिल नसल्याने समितीने सदर निविदा अपात्र ठरविली व ती उघडण्यात येणार नाही असा निर्णय घेतला.तद्नंतर पात्र ठरलेले ३ निविदाकारांचा मोहरबंद लिफाफा क्रं. १ उघडण्यात आला

लिफाफा क्रं. १ मध्ये तिन्ही निविदाकार पात्र झाल्याने तिन्ही निविदाकांराचा लिफाफा क्रं. २ उघडण्यात आला व त्यांनी निविदेत भरलेली महापालिकेस मिळणारी रॉयल्टी रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| अनु. | निविदाकाराचे नाव | महापालिकेस मिळणारी | निविदाकाराने भरलेली |
|---|---|---|---|

| क्र | | विभागाने ठरविलेली प्रति टोईंग वाहन वार्षिक रॉयल्टी रक्कम | प्रति टोईंग वाहन रॉयल्टी रक्कम |
|---|---|---|---|
| १) | मेंसेर्स. नव भारत टोंईग, उल्हासनगर | रू.१,३०,०००/— | रू. १,३१,०००/— |
| २) | मेंसेर्स. श्याम ट्रान्सपोर्ट, उल्हासनगर | | रू. १,३२,०५०/— |
| ३) | मेंसेर्स. प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि, उल्हासनगर | | रू. १,३८,०००/— |

वरिल तक्त्यानुसार मेंसेर्स. प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा.लि, उल्हासनगर यांची महापालिकेस मिळणारी रू. १,३८,०००/— एवढी वार्षिक रॉयल्टी रक्कम मंजुर होणेस गोषवारा मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १९ **दिनांक:—** १३/९/२०१२

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती गायकवाड
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती नेहा भोईर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीतील ''नो पार्किंग'' जागेवर उभी असलेली वाहने ट्राफिक पोलिसामार्फत टोईंग वाहनाद्वारे उचलुन त्यांच्याकडुन दंड वसुली करणेकामी सर्वात जास्त रॉयल्टी देणारे ठेकेदार मेसर्स प्रथम मल्टी प्रोजेक्ट प्रा. लि. उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १७ :—** यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) पुणे येथे नागरी प्रशासनामधील व्यवस्थापन पदवीत्तर पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षणासाठी श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांना प्रतिपुर्ती केलेल्या रुपये १,५५,०००/— खर्चाची माहिती नोंद करणे.

---

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—**हा खर्च अदा केलेला आहे का?

**श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी :—**मी तपासणी केली आहे, अजुन हा खर्च अदा केलेला नाही.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**जैन साहेब, तुम्ही सांगत आहात की, हा खर्च अदा केलेला नाही, परंतु गोषवा—यामध्ये सदरचा खर्च संबंधीत अधिकारी यांना अदा केला असून त्याची नोंद घेण्यासाठी हा विषय

स्थायी समितीसमोर आणला असल्याचे नमुद केले आहे. हा विषय पारीत करणे हे स्थायी समितीच्या अधिकारात नाही, हा विषय महासभेच्या अधिकारात आहे तरी सदरचा विषय महासभेपुढे मांडण्यात यावा.

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–</u>**या अगोदर कुणाला प्रतिपुर्ती केली आहे का? मला वाटते या अगोदर तत्कालीन आयुक्त श्री. अशोककुमार रणखांब यांना प्रतिपुर्ती केली आहे. दिनांक २०/८/२००९ च्या स्थायी समितीत याबाबत ठराव झाला आहे.

**<u>श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी:–</u>**हा धोरणात्मक निर्णय आहे. मी आमच्याकडील नोंदी पडताळून पाहिल्या आहेत अदयाप त्यांना प्रतीपुर्ती केलेली नाही.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>**आमच्या शहरात नुकतीच एक मुलगी डेंग्युच्या आजाराने मरण पावली आहे तिच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबतच्या प्रस्तावास प्रशासनाने विरोध केला त्यावेळी मा. आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, अशाप्रकारचा प्रस्ताव आणल्यास आपले नगरसेवक पद रद्द होवु शकते. जर आपण त्या मुलीच्या कुटुंबियांना मदत करु शकत नसु तर यांना कशी मदत करता येईल.

**<u>श्री. डी.जी. पवार, उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>**सदरहु विषय महासभेत आणला जाईल व गोषवा–यात केलेली चुक खात्री झाल्यानंतर सुधारण्यात येईल.

**<u>महापालिका सचिव:–</u>**सदरचा विषय महासभेपुढे आणवा लागेल.

**<u>काही सदस्य :–</u>**ठिक आहे.

**<u>सभापती, श्री. रमेश चव्हाण :–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. १७** :–यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) पुणे येथे नागरी प्रशासनामधील व्यवस्थापन पदवीत्तर पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षणासाठी श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांना प्रतिपुर्ती केलेल्या रुपये १,५५,०००/– खर्चाची माहिती नोंद करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

शासन निर्णय क्र संकिर्ण–२००६/५१३/प्र.क्र ९०/२००६/नवि–२० दिनांक २०/०९/२००६ अन्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) पुणे येथे नागरी प्रशासनामधील व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (Advanced Post Graudate Diploma in Urban Management) अभ्यासक्रमासाठी महापलिकेतर्फे प्रशिक्षणासाठी श्री युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांना कार्यालयीन आदेश क्र उमपा/साप्रवि/आस्था/३४७/२०१० दिनांक १३/०७/२०१० अन्वये त्यांना यशदा पुणे येथे नागरी व्यवस्थापन पदव्युत्तर पदविकेच्या अभ्यासक्रमासाठी मान्यता देण्यात आली होती. तसेच सदर प्रक्षिक्षणासाठी त्यांना येणारा खर्च रू १,५५,०००/– हा महापालिका अंदाजपत्रकातील तरतुद ए–२ कर्मचारी प्रशिक्षण या लेखाशिर्षातून प्रशिक्षण शुल्क अदा करण्याबाबत आदेश लेखा विभागास देण्यात आले होते.

सबब, श्री युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांनी सदर प्रशिक्षणासाठी लागणारा खर्च स्वत: केला असुन, डिसेंबर २०११ रोजी त्यांनी सदरचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण केला असुन त्याबाबतचे त्यांनी प्रमाणपत्र त्यांनी सादर केले आहे.

तरी, सदर प्रशिक्षणासाठी श्री युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांनी केलेला खर्चाची प्रतिपुर्ती रक्कम रू १,५५,०००/– लेखा विभागाने त्यांना अदा करण्यात आलेला आहे. सदरची बाब मा. स्थायी समितीसमोर माहिती व नोंद घेण्यासाठी सादर.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>** २०                **<u>दिनांक:– १३/९/२०१२</u>**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) पुणे येथील नागरी प्रशासनामधील व्यवस्थापन पदवीत्तर पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षणासाठी श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांना प्रतिपुर्ती केलेल्या रुपये १,५५,०००/— खर्चाची माहिती नोंद करीत नाही.

**कारण——**

१. सदरहु अधिका—याचे नियुक्ती प्राधिकरण महापालिका असून त्यांच्या समक्ष सदरची बाब सादर करणे गरजेचे राहील.

२. प्रशासनाने दिलेल्या गोषवा—यामधील माहितीप्रमाणे सदरहू प्रतिपुर्तीची रक्कम संबंधीत अधिका—यास अदा करण्यांत आलेली आहे ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १८ :—** विद्युत विभागांअर्तगतच्या पाच विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १८ :—** विद्युत विभागांअर्तगतच्या पाच विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहीती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( ड ) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजुर निवीदा रक्कम | कराराचा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका क्षेत्रातील मार्ग प्रकाशा साठी उभारलेल्या सोडीयम पथदिव्याच्या देखभाल व दुरूस्तीसाठी लागणारे १५० वॅट चे चोक व बल्ब या आवश्यक साहित्यांच्या खरेदी करिता. | ९,७४,१५०/— | १६/०७/२०१२ | में.मेहता ट्रेडर्स |
| २ | महापालिका क्षेत्रामध्ये पथदिवे चालू बंद करण्यासाठी बसविण्यात आलेल्या ऑटोमॅटीक स्विचिंग पॉईंटची | ४,१३,०००/— | १६/०७/२०१२ | में.बी.के.इलेट्रीकल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | देखभाल व दुरूस्तीचे कामा करण्या साठी आवश्यक साहित्यांच्या खरेदी करिता. | ५,०४,०००/— | १६/०७/२०१२ | में.हटर्स ट्रान्सइलेक्ट्रो • |
| ३ | महापालिका मुख्यालय व क्षेत्रातील मालमत्तांमध्ये विदयुत व्यवस्थेच्या देखभाल व दुरूस्तीसाठी लागणा—या साहित्यांची खरेदी करण्याकरीता. | ८,७५,९९५/— | १६/०७/२०१२ | मे.मोहित एंटरप्रायजेस |
| ४ | उल्हासनगर महानगरपालिकेतिल विदयुत विभगातील टेस्टींगं लॅबरोटी करता, रीर्सच आणि डेव्हलेमेन्ट केंद्र तसेच उर्जा,गुणवत्ता सुरक्षीतता करीता साहित्याची खरेदी / उभारणी करण्या करीता.. | ९,३०,०००/— | १६/०७/२०१२ | में.राजलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उहासनगर, जि.ठाणे. |
| ५ | उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर - ३, येथिल मुख्यालयालयातिल नविन बांधकाम असलेल्या दुसरया मजल्यावरील अभिलेखा विभागचे विदयुतिकरण करण्यासाठी | ५,००,०००/— | १६/०७/२०१२ | मे.गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था (म.वडोल गांव) ता. उल्हासनगर,जि.ठाणे. |

तरी सदरची माहीती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** २१ **दिनांकः— १३/९/२०१२**

सुचकाचे नाव :— श्रीमती आशा गुप्ता
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती ज्योती गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विद्युत विभागांअर्तगतच्या पाच विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९** :— उल्हासनगर महानगरपालिका अग्नी सुरक्षा सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी फायर वॉटर टेंडर राज्य शासन मान्य दराने खरेदी करणेस मान्यता देणे.

---

**सदस्या श्रीमती पंचशिला पवार :—**अग्निशमन विभागाचा हा विषय आहे. अग्निशमन विभागात सद्या किती गाडया आहेत? किती कर्मचारी कार्यरत आहेत? गाडयांच्या हिशोबाने तेथे वाहनचालक आहेत का?

**श्री. कुशवाहा, फायरमनः—**अग्निशमन विभागात सद्या ३४ कर्मचारी कार्यरत आहेत व एकुण ३ अग्निशमन वाहन उपलब्ध आहेत.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—**सदरचा विषय वगळुन पुढील सभेत घेण्यात यावा.

**श्री. डी.जी. पवार, उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—** शासन, मुंबई पोलिस यांनी प्रत्येक नगरपालिका/महानगरपालिका यामध्ये किती अग्निशमन वाहने असली पाहिजेत किती कर्मचारी असले पाहिजेत याबाबत एक गोषवारा तयार करुन दिला आहे. त्या अनुषंगाने २२२ कर्मचारी अग्निशमन विभागात लागणार आहेत.

**<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार :</u>**—अग्निशमन विभागात सध्या ३४ कर्मचारीच आहेत ना? अग्निशमन विभागात वाहनचालक किती आहेत? जेवढी वाहने आहेत तेवढे वाहनचालक उपलब्ध आहेत का? यासाठी पहिले कर्मचा—यांची भरती करा नंतर वाहन खरेदी करा. तसेही शासनाकडुन फक्त ३५ टक्के अनुदान मिळणार असून बाकी पैसे आपणांस भरायचे आहेत.

**<u>श्री. डी.जी. पवार, उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :</u>**—प्रथम वाहने खरेदी करावी लागतील आणि वाहने आल्यावर कर्मचारी भरतीसाठी पद निर्मीतीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. वाहन खरेदीसाठी निविदा न काढता शासन मान्य दराने खरेदी करायची आहेत. हे वाहन येण्यासाठी १२ ते १८ महिन्याचा कालावधी लागणार आहे. तसेच वाहन खरेदीचे आदेश दिले नाहीत तर कर्मचा—यांची भरती करण्यास मान्यता मिळणार नाही. म्हणुन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे.

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:</u>**—आता सध्या अग्निशमन विभागात किती कर्मचारी आहेत त्यापैकी कायम स्वरुपातील किती आणि तात्पुरत्या स्वरुपातील किती?

**<u>श्री. कुशवाहा, फायरमन:</u>**—३४ पैकी १५ कर्मचारी ठोकपगारावरील आहेत.

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:</u>**—ठोकपगावरील कर्मचा—यांना काम करतांना काही दुखापत किंवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची? यापुर्वी भिवंडीमध्ये दुर्घटना झाली असता आपल्या महापालिकेतुन अग्निशमन विभागाच्या गाडया पाठविण्यात आल्या होत्या त्यावेळी ठोकपगारावरील दोन कर्मचारी यांना दुखापत झाली होती भाजले होते तर त्यास जबाबदार कोण?

**<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार:</u>**— इतका महत्वाचा विभाग आहे तेथे पुरेशी वाहने व कर्मचारी नाहीत त्यामुळे शहरात काहीही अप्रिय घटना घडली तर त्यास जबाबदार कोण?

**<u>सभापती, श्री. रमेश चव्हाण :</u>**— अग्निशमन विभागासाठी आवश्यक असलेल्या पदांसाठी लवकरात लवकर भरतीची प्रक्रिया सुरु करण्यात यावी.

**<u>काही सदस्य :</u>**—पास—पास......

**<u>सभापती, श्री. रमेश चव्हाण :</u>**—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १९ :**— उल्हासनगर महानगरपालिका अग्नी सुरक्षा सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी फायर वॉटर टेंडर राज्य शासन मान्य दराने खरेदी करणेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

**आज** रोजी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या व क्षेत्रफळ लक्षात घेता शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अग्निशमन केंद्र I X FS – I विकसीत करणे व ८ फायरव्हॅन अग्निशमन विभागाकरीता असणे आवश्यक आहे. 'महाराष्ट्र अग्नि सुरक्षा' अभियानांतर्गत महापालिका अग्निशमन सेवेचे सक्षमिकरण करणेकरीता एकुण ४ अग्निशमन वाहने खरेदी करणे बाबत शासन निर्णयानुसार उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाची तुट दाखविलेली आहे. सदर तुट भरुन काढणेकरीता महाराष्ट्र शासन अनुदान देणार आहे. शासनाकडुन अनुदान प्राप्त होणेकरीता उल्हासनगर शहराचा MITIGATION PLAN व फायरस्टेशनचा D.P.R. शासनास सादर करणे विषयी लेखी कळविले होते. त्या अनुषंगाने सर्व बाबींचा पाठपुरावा करुन दिनांक ३१ मार्च २०१२ रोजीचे शासन निर्णयानुसार उल्हासनगर महापालिकेचे अग्निशमन केंद्र बांधणेकरीता व अग्निशमन वाहन खरेदीकरीता

शासनाच्या हिश्श्यापोटी अनुज्ञेय व मंजुर शासकीय अनुदान रक्कम रुपये ८५.७५ उदलाख एवढे अनुदान मिळाले आहे.

एकुण ४ वाहनांच्या फेब्रीकेशन करीता (RATE CONTRACT) रुपये १७,१५,००० X ४ = ६८,६०,०००/— व चेसीस मॉडेल TATA MODEL LPT 1613/42, 4225 MM WHEEL BASE TRUCK CHASSIS WITH COWL WITH 697 ENGINE BS III DJHRK करीता रक्कम रुपये १०,२३,७८६ X ४ = ४०,९५,१४४ (वाहतुक आकार व व्हॅट व्यतीरिक्त) असा एकुण रक्कम रुपये १,०९,५५,१४४/— खर्च येणार आहे आणि भारत सरकार, नवी दिल्ली यांचे DG S & D RATE CONTRACT ची प्रत सोबत जोडत आहे.

| SR NO | MODEL NO | DESCRIPTION | RATE | REMARK |
|---|---|---|---|---|
| 1 | TATA MODEL LPT 1613/42, 4225 MM WHEEL BASE TRUCK CHASSIS WITH COWL WITH 697 ENGINE BS III DJHRK | AS PER SPECIFICATION | 10,23,786 x 4 = 40,95,144/- (TRANSPORTATION CHARGES & VAT TAX EXTRA) | CHASSIS FOR 4 FIRE TENDERS |
| 2 | FIRE TENDER M/S VIJAY FIRE VEHICLE & PUMP LTD., MUMBAI | AS PER SPECIFICATION (A) 5000 LTS CAPACITY OF WATER TENDER (B) WATER MONITOR ON TOP OF THE VEHICLE & SHALL ROTATE in 360$^o$ (C) 35 FEET ALUMINIUAM EXTENSTION LADDER AS PER IS. 4571 DESIGNING FABRICATION ERECION COMMISSIONING & TESTING OF FIRE TENDER ALONG WITH FREE MAINTENANCE FOR 3 YEARS | 17,15,000 x 4 = 68,60,000/- | FABRICATION FOR 4 FIRE TENDERS |
| | | TOTAL | 1,09,55,144/- | |

| | |
|---|---|
| फायरस्टेशनकरीता तरतुद | १,८५,००,०००/— |
| शासनाचे हिश्श्यापोटी व मंजुर शासकीय अनुदान ३५ % नुसार | ४३,७५,०००/— |
| महापालिका हिश्श्यापोटी ६५ : नुसार | ८१,२५,०००/— |
| नविन गाडयांकरीता तरतुद | १,२०,००,०००/— |
| शासनाचे हिश्श्यापोटी व मंजुर शासकीय अनुदान ३५ : नुसार | ४२,००,०००/— |
| महापालिका हिश्श्यापोटी ६५ : नुसार | ७८,००,०००/— |

महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानामध्ये अग्निशमन केंद्र बांधकामासाठी एकुण खर्च रक्कम रुपये १,२५,००,०००/— एवढा खर्च दर्शविणेत आलेला आहे. शासन अनुदानामधुन ३५ टक्के यानुसार शासनाच्या हिश्श्यापोटी रक्कम रुपये ४३,७५,०००/— आणि महापालिकाचे हिश्श्यापोटी ६५ टक्के नुसार रक्कम रुपये ८१,२५,०००/— एवढा खर्च करावा लागणार आहे. (सन २०१२—१३ च्या अर्थसंकल्पात रक्कम रुपये १,८५,००,०००/— ची तरतुद केली आहे.)

तसेच नविन गाडीकरीता एकुण तरतुद रक्कम रुपये १,२०,००,०००/— एवढा खर्च करावा लागणार आहे. शासन अनुदानामधुन ३५ टक्के नुसार शासनाच्या हिश्श्यापोटी रक्कम रुपये ४२,००,०००/— आणि महापालिकाचे हिश्श्यापोटी ६५ टक्के नुसार रक्कम रुपये ७८,००,०००/— एवढा खर्च करावा लागणार आहे.

सध्या उल्हासनगर शहराची झपाटयाने होत असलेली लोकसंख्येची वाढ, अरुंद रस्ते, शहरातील व शहराबाहेरुन येणा—या वाहनांची वर्दळ, उंच उंच इमारती, दाटीवाटीचे शहर मोठयाप्रमाणात लघुउद्योग, त्याचप्रमाणे उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीत व हद्दीबाहेर २० कि.मी. पर्यंत सेवा देणे बंधनकारक आहे. असे शासनाच्या आदेशाचे पालन करीत असतांना शहराचा विचार करता उपरोक्त वाहने खरेदी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त सर्व परिस्थितीचा विचार करुन उल्हासनगर महानरगपालिका अग्निशमन विभागाकरीता एकुण ४ अग्निशमन वाहने करीता रुपये १,०९,५५,१४४/— (RATE CONTRACT) नुसार मंजुरी मिळावी. सोबत

शासनाचे गाडी बनविणेकरीता व चेसीस खरेदी करणेकरीता (RATE CONTRACT) गाडीचे SPECIFICATION जोडत आहे.

सदर खरेदी करीता एकुण खर्च रक्कम रुपये १,०९,५५,१४४/— इतका खर्च येणार असुन सदरचा खर्च अंदाज पत्रकातील लेखा शिर्ष PART I (ii) अग्निशमन वाहन खरेदी यामध्ये तरतुद असल्याकारणाने भागविता येईल.

तसेच शासन निर्णयात असेही आदेशीत करणेत आले आहे की, उपरोक्त चार वॉटर टेडरच्या चेसीसची खरेदी ही M/S TATA MOTERS LTD. यांचेकडुन भारत सरकार DG S & D नवी दिल्ली यांचे दिनांक ३१/०५/२०१२ रोजीचे पत्रानुसार जी दर संविदा निश्चित केली आहे. त्यानुसार व वॉटर टेंडरचे फॅब्रीकेशनचे काम राज्य शासनाच्या दरकरार (RATE CONTRACT) नुसार M/S VIJAY FIRE VEHICLE & PUMP LTD., ANDHERI (MUMBAI) व M/S DEVI FIRE SERVICES, SOLAPUR या कंपनीकडुन खरेदी करणेचे आदेश दिले आहेत.

सदर दोन्ही कंपनीचे RATE CONTRACT सारखे आहेत परंतु M/S VIJAY FIRE VEHICLE & PUMP LTD, ANDHERI ही कंपनी मुंबईत असल्यामुळे वाहनाचे निरीक्षण व तपासणी वारंवार करता येवु शकते तसेच ३ वर्षे वाहनाचे दुरुस्तीचे काम कंपनीमार्फत करुन देण्यात येणार आहे. अशा वेळी वाहन घेऊन जाणे/आणणे सोईचे होईल. त्यामुळे M/S VIJAY FIRE VEHICLE & PUMP LTD, ANDHERI यांचेकडुन वॉटर टेंडर फेब्रीकेशन काम राज्य शासनाच्या दरकरार (RATE CONTRACT) नुसार करणेचे शिफारस करण्यात येत आहे.

सबब भारत सरकारच्या DG S & D आणि राज्य शासनाच्या दर करार (RATE CONTRACT) व्दारा अधिकृत केलेल्या चेसीस M/S TATA MOTERS LTD. यांचेकडुन खरेदी करण्याचे तसेच M/S VIJAY FIRE VEHICLE & PUMP LTD, ANDHERI यांचेकडून वॉटर टेंडर फेब्रीकेशनचे काम राज्य शासनाच्या दर करार(RATE CONTRACT) नुसार १७,१५,००० X ४ = ६८,६०,०००/— व मेसर्स टाटा मोटर्स यांना TATA LPT 1613/42, 4225 MM WHEEL TRUCK CHASIS WITH 697 ENGINEE BSIII CHASIS पोटी (प्रती चेसीस ११,६५,२५९.२५ X ४ = ४६,६१,०३७ म्हणजेच ६८,६०,००० + ४६,६१,०३७ = १,१५,२१,०३७ एवढी रक्कम अदा करावी लागेल. त्यापैकी CHASIS करीता रक्कम रूपये ४६,६१,०३७ एवढी रक्कम PURCHASE ORDER सोबत अग्रीम स्वरुपात अदा करावी लागेल.

सदरचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव स्थायी समिती पूढे प्रस्तावित

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>** २२ <u>दिनांकः— १३/९/२०१२</u>

सुचकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के
अनुमोदकाचे नाव :— कु. जयश्री जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका अग्नी सुरक्षा सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी फायर वॉटर टेंडर राज्य शासन मान्य दराने खरेदी करण्यास व अंतर्भुत खर्च रू. **१,१५,२१,०३७/—** यांस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व त्या प्रयोजनार्थ डऽै ज्ज। डव्ज्मै स्ज्क यांचेशी चेसीस व इंजिन पुरविणे व डऽै टप्श्र।ल थ्प्त्म टम्भ्प्ब्स – च्न्ड्च स्ज्कए छक्भ्म्त्त यांचेकडून वॉटर टेंडर फेब्रीकेशन कामी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

**<u>सर्वानुमते</u>**
सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५.०५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. रमेश चव्हाण यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१४/९/२०१२

**दि. १४/९/२०१२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १४/९/२०१२ रोजी सांयकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण | सभापती |
| २ | श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ३ | सौ. ज्योती गायकवाड | सदस्या |
| ४ | सौ. नेहा भोईर | सदस्या |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवानी | सदस्य |
| ६ | सौ. मिना कुमार आयलानी | सदस्या |
| ७ | श्री. अकुंश म्हस्के | सदस्य |
| ८ | सौ. पचंशीला नाना पवार | सदस्या |
| ९ | सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी | सदस्या |
| १० | सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता | सदस्या |
| ११ | श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर | सदस्य |
| १२ | श्री. राजू रामसिंग कंडारे | सदस्य |
| १३ | सौ. जया मोहन साधवनी | सदस्या |
| १४ | श्री. गोदुमल किशनानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. कु. जयश्री जीवनलाल जग्यासी, २. डॉ. महेश गावडे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

४७.श्री. डी.जी. पवार, उप—आयुक्त
४८.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४९.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
५०.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
५१. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
५२.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
५३.श्री. गायकवाड, प्र.प्रभाग अधिकारी
५४.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
५५.श्री. राजेश घनघाव, लिपिक, मालमत्ता विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती विशाखा सावंत

सांयकाळी ५.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. डी.जी. पवार, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्यास्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

**काही सदस्यः–** या सभेपुढील चारही विषयांचे अदयाप प्रशासनाकडुन गोषवारे प्राप्त झाले नाहीत. गोषवारे प्राप्त होईपर्यंत या सभेचे कामकाज स्थगित करण्यात यावे.

**सभापती, श्री. रमेश चव्हाणः–**गोषवारे तयार होण्यास आणखी अर्धा तास लागणार असल्याने सभेचे कामकाज ६.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामचंद्र पारवानी

विषय :सभा स्थगित करणेबाबत....

***स्थगित प्रस्ताव :***

दिनांक १४/९/२०१२ रोजी आयोजित करण्यांत आलेली स्थायी समितीची तातडीची विशेष सभा सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित करणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. २२ अ** **दिनांक : १४/९/२०१२**

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता या सभेचे कामकाज सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

५.१० वाजंता सभेचे कामकाज सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित केल्याचे सभापती श्री. रमेश चव्हाण यांनी जाहिर केले.

सायंकाळी ६.२० वाजता सभेचे कामकाज पुन्हा सुरू करण्यांत आले. त्यावेळी खाली दर्शविलेले सदस्य/सदस्या सभेत अनुपस्थित होते/होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रमेश चव्हाण | सभापती |
| २ | श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ३ | सौ. ज्योती गायकवाड | सदस्या |
| ४ | सौ. नेहा भोईर | सदस्या |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवानी | सदस्य |
| ६ | श्री. अकुंश म्हस्के | सदस्य |
| ७ | सौ. पचंशीला नाना पवार | सदस्या |
| ८ | सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी | सदस्या |
| ९ | सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता | सदस्या |
| १० | श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर | सदस्य |
| ११ | श्री. राजू रामसिंग कंडारे | सदस्य |
| १२ | सौ. जया मोहन साधवनी | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री. गोदुमल किशनानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. सौ. मिना कुमार आयलानी, २. कु. जयश्री जीवनलाल जग्यासी, ३. डॉ. महेश गावडे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. डी.जी. पवार, उप–आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
५. श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
६. श्री. एम.जी गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
७. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
८. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१०.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

श्री. डी.जी. पवार, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्यास्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

**सदस्य श्री. राजु कंडारे :–**प्रभाग क्र. १ येथिल जकात नाका नं. १० ते गुलशन नगर, आयडीआय व अमरडाय कंपनीकडे जाणा–या रस्त्यांवर खुप खड्डे आहेत. या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम झाले पाहिजे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या दराने कुणी ठेकेदार रस्त्यावरील खड्डे भरायचे काम करेल किंवा नाही?

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**रस्त्यावरील खड्डे भरायचे काम कुणी ठेकेदार करेल की नाही?

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी :–**श्री. रामचंद्र पारवानी यांच्या प्रभागातील पाच रस्त्यांची कामे मंजुर झाली आहेत, त्यातील तीन कामे पूर्वी झाली आहेत व दोन कामे बाकी आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रभागातील कामे तर झाली आहेत पण या रस्त्याचे काम का होत नाही?

**सदस्या श्रीमती नेहा भोईर:–**रस्त्यांचे काम कोण करणार? शहाड फाटक येथिल रस्त्यांवर एवढे खड्डे आहेत की तेथून लोकांना करायला खुप त्रास होत आहे. त्या रस्त्याचे काम या यादीमध्ये समाविष्ट केलेले नाहीत. ते समाविष्ट केले जावे व गणपतीच्या अगोदर रस्त्यावरील खड्डे भरले जावेत.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**प्रशासनाने सुचविलेल्या या दरावर कुणी ठेकेदार काम करेल किंवा नाही?

**सदस्य श्री. राजु कंडारे:–** जकात नाका क्र. १० पासुन गूलशन नगरकडे जाणा–या रस्ता गॅस पाईप लाईन टाकण्यासाठी खोदला आहे. मला वाटते ते काम जवळ जवळ पुर्णही झाले आहे, परंतु खोदलेला रस्ता अदयाप पुर्ववत केलेला नाही.

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:–**पाईप लाईन टाकण्याचे काम थोडेसे बाकी आहे, ते पुर्ण झाल्यानंतर त्या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम केले जाईल. तसेच रस्त्यांवरील खड्डे भरण्याबाबत निविदा मागविण्यात आल्या होत्या. तीन निविदा कारांनी निविदा भरल्या होत्या. त्यातील लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स जयभारत कं.कंपनी यांच्याशी आणखी दर कमी करण्याबाबत वाटाघाटी करुन प्रस्ताव आपल्या समोर

सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार डांबराच्या दरामध्ये झालेली वाढ (स्टाररेट) आणि मुल्यवृध्दी (प्राईज एक्सक्लेनेशन) नुसार हे काम देण्याबाबतीत आपल्या समोर प्रस्ताव ठेवला आहे. व दोन वर्षापुर्वी जेव्हा रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम करण्यात आले होते तेव्हा स्टाररेटनुसारच करण्यात आले होते.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—** कोनार्कवाल्यास हे काम कोणत्या दराने देण्यात आले होते.

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:—**प्राकलनीय दरापेक्षा ७ टक्के वाढीव दराने देण्यात आले होते.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**आता यांचे दर प्राकलनीय दरापेक्षा ९ टक्के जास्त दराचे का आहेत?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:—** प्राकलनीय दरापेक्षा ७ टक्के जास्त दराने काम करावे असे मी ठेकेदारास सुचविले होते. मात्र त्यांनी प्राकलनीय दरापेक्षा ९टक्के वाढीव दराने काम करण्यास तो तयार असल्याबाबतचे पत्र दिले आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**प्राकलनीय दरापेक्षा ९ टक्के वाढीव दराने त्यास काम देण्यास आपण तयार आहात का?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:—**आम्ही तर प्राकलनीय दरावर त्यास काम देण्यास तयार आहोत. लघुत्तम दराच्या दुस—या क्रमांकाचा जो ठेकेदार आहे, तो दर कमी करण्यास तयार नाही त्यामुळे तो पुन्हा वाटाघाटीस येवु शकणार नाही.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**हे दोन्ही ठेकेदार जर काम करणार नसतील तर आपण काय करणार? या कामाबद्दल आपले नियोजन काय आहे?

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**महापालिकेने डांबराचा आपला स्वत:चा प्लान तयार करावा. तसेच कल्याण महानगरपालिकेतील व आपल्या येथिल डीएसआरचे दर काय आहेत?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:—**कल्याण व उल्हासनगरमधील डीएसआर दरात ३० ते ३५ टक्क्याचा फरक आहे. तेथे हायवे डीएसआरप्रमाणे प्राकलन तयार करण्यात आले आहे. ठेकेदाराने प्राकलनीय दरापेक्षा ४८ टक्के वाढीव दर दिले आहेत. त्यांच्याशी वाटाघाटी करुन प्राकलनीय दरापेक्षा ९ टक्के जास्त दराने काम देण्याचा प्रस्ताव आपणासमोर मंजुरीस आणला आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**पण ते काम गणपतीपुर्वी करायचे आहे.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**ठेकेदार म्हणतो की, ९ टक्के वाढीव दरापेक्षा कमी दराने काम होवु शकणार नाही. मात्र हे म्हणतात की, तुम्ही ७ टक्के वाढीव दरावर काम करा.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—**महानगरपालिकेची पत संपृष्टात आली आहे.

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:—**डांबराच्या दरामध्ये झालेल्या वाढीनुसार (स्टाररेटनुसार) काम करावे असे आम्ही सुचविले आहे. आणि लघुत्तम दराच्या दुस—या क्रमांकाचा जो ठेकेदार आहे, त्यांनी दर कमी करण्यास नकार देवुन तो निघुन गेला आहे.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**जो कोणी या दराने काम करण्यास तयार असेल त्यास हे काम दया. परंतु त्यामध्ये एक अट टाका की, गणपतीच्या अगोदर हे काम झाले पाहिजे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम कुणा कुणाला देत आहात?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:—**लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स जयभारत कंस्ट्रक्शन कंपनी यांना.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**चारही प्रभाग समिती क्षेत्रातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम एकाच ठेकेदाराला देत आहात काय?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:–**होय.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**परंतु शहरामधील काम होणे जरुरीचे आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**ठेकेदाराने जे दर दिले आहेत त्यानुसार आपण प्रस्ताव पास करा.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**कायदयामध्ये बसत असेल तर आपण हे काम त्यास दया.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**प्राकलनीय दरापेक्षा ९ टक्के वाढीव दराने जर आपण त्यास काम देवु इच्छित नसाल तर काय मग पुन्हा निविदा मागविणार? निविदा मागविल्या तर त्यात किती वेळ जाईल?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:–**पुन्हा निविदा मागविली तर कमीत कमी आठ दिवस जातील.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**मागील वर्षी हे काम कोनार्क कंपनीला कोणत्या दराने दिले होते?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि:–**प्राकलनीय दरापेक्षा ७ टक्के वाढीव दराने.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**तर या ठेकेदारास सुध्दा प्राकलनीय दरापेक्षा ७ टक्के वाढीव दराने दया.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**त्या दराने ठेकेदार काम करेल किंवा नाही ते अगोदर त्यास विचारा.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**सभापती महोदय, विचारा त्याला, मागील वर्षाच्या दराने तो काम करेल काय? सभापती महोदय आपण आदेश दया.

तरी उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 36बीओ006509200 (जुना क्र. 36/0325) साठी वर्ष 2012–13 करीता बजावण्यात आलेल्या मालमत्ता कर बिलात थकीत रकान्यामध्ये दर्षविण्यात आलेल्या रक्कमपैंकी रक्कम रू. 94923/– (वर्ष 1991–1992 ते 2011–2012 पर्यंत अतिरिक्त मालमत्ता कर आकारणी) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 152 नुसार निर्लेखित करणे तसेच सद्यस्थितीतील पुढीलप्रमाणे करपात्र बाबी गृहीत धरून मिळकतीचे करयोग्य वर्ष 2012–13 साठी निष्चित करणेसाठी मंजुरीकरीता मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आह

| Const. Type | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| एसीशिट ब्रिक्स | निवासी | ० | ०१–एप्रिल–८६ | १४४ | ० | १४४ |

स्थायी समिती ठराव क्र. २७ दिनांक:–

६/१२/२०१२

सुचकाचे नाव :– कु. जयश्री जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती ज्योती गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ३६बीओ००६५०९२०० (जुना क्र. ३६/०३२५) साठी वर्ष २०१२–१३ करीता बजावण्यात आलेल्या मालमत्ता कर बिलात थकीत रकान्यामध्ये (वर्ष १९९१–९२ ते २०११–२०१२ पर्यंत अतिरिक्त मालमत्ता कर आकारणीत) दर्शविण्यात आलेल्या रक्कमेपैकी रक्कम रु. ९४९२३/– निर्लेखित करणेस तसेच सद्यस्थितीतील १४४ चौ.फुट (एसीसी) निवासी मिळकतीचे वर्ष २०१२–१३ साठी करयोग्य मुल्य निश्चीत करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

**विषय क्र. ३ :–** कर आकारणी पुस्तकात नोंद असलेली मालमत्ता क्र. २३ठ७०२००४२६०० रद्द करुन वर्ष
२०१२–१३ अखेर थकित मालमत्ता कर रक्कम रुपये १८८३ . विलंब शास्ती
निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

—————————————————————————————————————————————

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**हा विषय सुध्दा यासारखाच आहे काय?

**श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक:–**होय.

**काही सदस्य :–**पास–पास……

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :–** कर आकारणी पुस्तकात नोंद असलेली मालमत्ता क्र. २३ठ७०२००४२६०० रद्द करुन
वर्ष २०१२–१३ अखेर थकित मालमत्ता कर रक्कम रुपये १८८३ . विलंब
शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

**श्रीम. पद्मीनी बाबुराव शिंदे रा. कृश्णा सोसायटीजवळ, नेहरू चौक, उल्हासनगर – २. यांनी दि. ०४/०७/२०१२ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र.** २३ ठ७ ०२००४२६०० **करीता पुढीलप्रमाणे हरकत दाखल केली आहे.**

संदर्भित मिळकत क्. **23 BI 020042600** ही चुकीच्या जागेवर कर आकारणी केल्यामुळे सदर मिळकत निर्लेखत करणेबाबत

विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की

१.  महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मिळकत क्र. २३ BI ०२००४२६०० मध्ये कर भरण्यास पात्र जबाबदार व्यक्ती म्हणून श्री. अंनत बाबुराव सोनावणे यांच्या नावाची नोंद करण्यात आलेलली आहे.

२.  उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत संदर्भित मिळकतीकरिता नमुद असलेल्या करपात्र बाबीचा तपषिल पुढीलप्रमाणे आहे.

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्षिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| झोपडे | निवासी | ८६९६२०११ | ० | ९६ | ० | ९६ |

१. संदर्भित मिळकत ही षायकीय जागेवर बांधकाम करून नविन कर आकरणी केल्यामुळे श्रीम. पद्मीनी बाबुराव शिंदे यांनी ती मिळकत रद्द करणेकरिता अर्ज दाखल केला असून अर्जदार व मिळकतधारक यांना सुनावणीची संधी देण्यात आली होती. सुनावणीस पद्मीनी बाबुराव शिंदे. या सुनावणी उपस्थित होते. मिळकतधारक सुनावणीस गैरहजर होता.

२. संदर्भित विभागाचे कर निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर जागेवर पुर्वी कचाराकुंडी होती त्याबाबत सोबत छायाचित्र जोडलेले आहे. परंतू सद्यस्थित सदर जागेवर झोपडे असून त्यामुळे सदर जागेवर करण्यात आलेली मालमत्ता कर आकारणी चुकीने झाल्याने ती रद्द करणेकरिता योग्य वाटते.

५. सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार २३**BI**०२००४२६०० ही मिळकत रद्द करून त्यापोटी आकारण्यात आलेला वर्ष २०१२–१३ अखेर थकीत मालमत्ता कर
रक्कम रू. १८८३/– + विलंब शास्ती निर्लेखित करणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. २८ दिनांकः–

६/१२/२०१२

सुचकाचे नाव :– डॉ. श्री. महेश गावडे
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु कंडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर आकारणी पुस्तकात नोंद असलेली मालमत्ता क्र. २३ठ७०२००४२६०० रद्द करुन वर्ष २०१२–१३ अखेर थकित मालमत्ता कर रक्कम रुपये १८८३. विलंब शास्ती निर्लेखित करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ४ :– सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत घनकच–यावर दुर्गंधीनाशक व घनकच–याचा स्तर कमी करण्यासाठी बायोकल्चर सोल्युशन औषध पुरविणेकामी प्रशासनाने लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स रॉयल इंटरप्रायझेस मुंबई यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**हा विषय काय आहे तो सविस्तरपणे सांगितला जावा, सविस्तर माहिती दिली जावी.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—**या विषयाची सविस्तर माहिती दिली जावी.

**महापालिका सचिव:—**हा विषय केवळ स्थायी समितीच्या माहितीसाठी आहे. घनकच—यावर दुर्गंधीनाशक व कच—याचा स्तर कमी करण्यासाठी बायो कल्चर सोल्युशन पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची आपणांस माहिती दयायची आहे.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—**डंम्पींग ग्राउंडवर जो कचरा टाकला जातो त्याची दुर्गंधी येवु नये म्हणुन त्यावर दुर्गंधीनाशक औषधांची फवारणी केली जाते, तसेच बायोकल्चर औषधाची कच—यावरील फवारणीमुळे कच—यावर गांडुळ तयार होवून कचरा दबुन कच—याचा स्तर कमी होतो. तसेच डम्पींग ग्राउंडच्या आजुबाजुला रहिवाशी क्षेत्र असल्यामुळे तेथिल कच—याच्या दुर्गंधीबाबत वारंवार तक्रारी करत असतात यासाठी हे दुर्गंधीनाशक औषधांची फवारणी करणे आवश्यक आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......
**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ४ :—** सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत घनकच—यावर दुर्गंधीनाशक व घनकच—याचा स्तर कमी करण्यासाठी बायोकल्चर सोल्युशन औषध पुरविणेकामी प्रशासनाने लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स रॉयल इंटरप्रायझेस मुंबई यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत घनकच—यावर दुर्गंधीनाशक व घनकच—याचा स्तर कमी करण्यायासाठी बायोकल्चर पुरविणेसाठी उत्पादक कंपनी किंवा त्यांचे अधिकृत विक्रेते यांचेकडुन सिलबंद निविदा मागविण्यातसाठी निविदा सुचना १) दै. प्रहार व २) दै. नगर न्युज या दैनिक वृत्तपत्रात दि.१२/७/२०१२ रोजी प्रसिध्द करून दिनांक २०/७/२०१२ रोजी पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त तिन निविदा दिनांक ०१/८/२०१२ रोजी दुपारी ४.०० वाजता उप—आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर उघडण्यात आल्या. तीनही निविदाकारांनी लिफाफा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपात्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचा निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर बायोकल्चर औषधे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | औषधाचे तपशिल | आवश्यक परिमाण | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त प्रति लिटर दर रुपये | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे. प्रोटेक, | मे. एस. के. सेल्स | मे. रॉयल इंटर. |
| १ | बायोकल्चर द्रव्य, घनकचऱ्यासाठी (लक्टोबॅसीलसबिफीडोबॅक्टीरीयम, रुमिनिकोकस आल्बस, बेसिलस कुरस्टकी सब, ट्रायकोडमो | २५०० लिटर | ४०५ | ४१०.४० | ३९० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | इतर इन्झाईम्सचे मिश्रण) | | | | |

उक्त नमुद तक्यानुसार निविदाकारांनी सादर केलेल्या दरांनुसार मे. रॉयल इंटरप्राईझेस, मुंबई यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. तरी वरील प्रमाणे न्युनतम दराच्या निविदाधारकास त्यांनी दिलेल्या दरांबाबत लगेचच वाटाघाटी करण्याच्या सुचना दिल्या, त्यानुसार निविदा समिती सदस्यांनी निविदाकारा सोबत केलेल्या वाटाघाटीअंती प्राप्त झालेल्या दराचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **औषधाचे तपशिल** | **आवश्यक परिमाण** | **प्राप्त झालेले दर रु.** | **वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर रु.** | **अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|---|---|
| १ | बायोकल्चर द्रव्य, घनकचऱ्यासाठी (लक्टोबॅसीलसबिफीडोबॅक्टीरीयम, रुमिनिकोकस आल्बस, बेसिलस कुरस्टकी सब, ट्रायकोडमो इतर इन्झाईम्सचे मिश्रण) | २५०० लिटर | ३९०/— | ३७५/— | ९,३७,५०० |

वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार व नमुद केलेल्या परीमाणा नुसार सदरचे बायोकल्चर सोल्युशन औषध खरेदीकरीता रू ९,३७,५००/— ( नऊ लाख सदोतिस हजार पाचशे मात्र ) खर्च होणार असून सदर निविदाकाराशी संविदा करण्यात आली आहे.

तद्नंतर सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीसमोर माहितीकरिता सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** २९ **दिनांक:—** ६/१२/२०१२

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— कु. जयश्री जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत घनकच—यावर दुर्गंधीनाशक व घनकच—याचा स्तर कमी करण्यासाठी बायोकल्चर सोल्युशन औषध पुरविणेकामी प्रशासनाने लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स रॉयल इंटरप्रायझेस मुंबई यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—** पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागाकडील इतर लेखाशिर्षामधील तरतूदीमधून अत्यावश्यक वाढीव तसेच अतिरिक्त खर्चासाठी वित्तीय वर्ष सन २०१२—१३ करीता अर्थसंकल्पीय तरतूदींचे पूर्नविनियोजन करणेस मान्यता देणे.

————————————————————————————————————————————

**श्री. एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंताः—**पाणी पुरवठा व मलनिस्सारण सारख्या अत्यावश्यक सेवेसाठी देखभाल दुरुस्ती अंतर्गत नित्याच्या व आवश्यक दुरुस्त्या, साहित्य खरेदी इत्यादी खर्चासाठी निधीची तरतूद होणे आवश्यक आहे. तसेच मार्च २०१२ पर्यंतच्या मंजुर कामावरील अतिरिक्त खर्चाचे समायोजन होणे आवश्यक आहे. त्यासाठी पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागाकडील इतर लेखाशिर्षामधील तरतुदी मधुन अत्यावश्यक वाढीव तसेच अतिरिक्त खर्चासाठी पुर्नविनियोजन प्रस्तावित करण्यात आले आहे. महासभेमध्ये जो अर्थसंकल्प मंजुर झालेला आहे, त्यामध्ये टॅकरद्वारे पाणी कुपनलिका दुरुस्ती पाणी पुरवठा साहित्य खरेदी जेटपंप बसविणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. त्यातील काही कामांची मागील वर्षाची देयके देणे बाकी आहेत. लेखा विभागाचे निर्देश आहेत की, मागील वर्षाची जेवढी काही बिले बाकी आहेत, त्यासाठी चालु वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये तरतुद असणे आवश्यक आहे. डीडीआरकडील कामांचाही यामध्ये समावेश आहे. चालु आर्थिक वर्षात खेमानी नाल्यासाठी १० कोटीच्या खर्चाची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु अदयापही या कामाची प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी प्राप्त होवुन निविदा प्रक्रिया पार पाडायची आहे. त्यामुळे या योजनेवरील १० कोटी एवढया प्रस्तावित खर्चातुन पाच कोटी शिल्लक ठेवुन पाच कोटीचा निधी वर्ग करण्याचे प्रस्तावीत केले आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—**आता यामध्ये असे लिहिले आहे की, नविन पाईप लाईन टाकायची आहे तर आता नविन पाईप लाईन कशी टाकली जाईल कोनार्क कंपनीला पाईप लाईन टाकण्याचे काम दिले होते त्याचे काय झाले? व आमच्या प्रभागामधील कामाचे प्राकलन मंजुर केले जात नाही त्याचे काय?.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—**मागील वर्षी एकसुध्दा पाईप लाईन टाकली नाही.

**श्री. एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता :—**नविन मोठी पाईप लाईन टाकण्याचे काम नाही आहे, दोन दोन इंचाच्या एक—एक, दोन—दोन किलोमिटर लांबीच्या पाईप लाईन टाकायच्या आहेत. आम्ही आता एवढची मागणी केली आहे की, मागील वर्षाची जी देयके प्रलंबित आहेत ती देण्यासाठी ज्या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक आहे, त्यातुन दुस—या लेखाशिर्षात निधी समायोजित करण्यास मंजुरी दिली जावी.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—**मागील वर्षात पाईप लाईन टाकण्याचे एक रुपयाचे सुध्दा काम झालेले नाही. आणि या वर्षी विविध लेखा शिर्षामध्ये निधीची जी तरतुद करण्यात आलेली आहे ती सर्व तरतुद दुस—या लेखाशिर्षात समायोजित करत असाल तर त्या लेखाशिर्षातील या वर्षाची कामे कशी होतील?

**सदस्य श्री. अंकुश म्हस्केः—**माझ्या प्रभागात इंग्रजांच्या कालावधीपासुनची पाईपलाईन आहे. तिच्या मागील २५—३० वर्षापासुन दुरुस्ती झाली नाही त्यामुळे ती सडुन गेली आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः—**या कामासाठी आम्ही जर नगरसेवक निधी दिला तर आपण काम कराल ना?

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—**किती निधी समायोजित करावयाचा आहे?

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—**डीडीआरकडे किती खर्चाच्या कामांची प्राकलने पडुन आहेत? ती कामे यामध्ये येतील किंवा नाही? आमच्या प्रभागामध्ये पाणी येत नाही.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—**काही नगरसेवकांनी आपापल्या प्रभागामध्ये कामे करुन घेतली आहेत, माझ्या प्रभागात काम झालेले नाही, ते होईल कि नाही? त्यासाठी निधी नाही असे सांगितले जाते, तर मग हा प्रस्ताव कसा आणला आहे?

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः—**तो निधी तर अगोदरच संपला आहे ना, आता थोडाच?

**सदस्या श्रीमती ज्योती कालानीः—**निवडणूक कालावधीमध्ये ५०—५० हजार रुपये खर्चाच्या कामाची प्राकलने तयार केली होती, ती कामे कोठे कोठे झाली आहेत? ही कामे कोठेच झालेली नाहीत, हे काम फक्त कागदावरच आहे, प्रत्यक्षात कामे झालेली नाहीत, ठेकेदारास देयक अदा केले आहे, ४५ लाख रुपये खर्चाचे ज्योती कॉलनी येथिल नाल्याचे काम आहे, ते काम झालेले नाही, त्याबाबत आता आताच मी आयुक्तांशी भांडण करुन आले आहे.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—**हा विषय महासभेमध्ये जावु दया.

यावेळी श्री. डी.जी. पवार, उप–आयुक्त, मुख्यालय यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:–**आम्ही या विषयाचा पुर्ण अभ्यास करु त्यानंतरच ठराव पारीत करु. तोपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवला जावा.

**श्री.एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता:–**तर मग सर्व कामे थांबुन जातील.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:–**काम न करताच खोटी देयके तयार केली आहेत.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**किती रक्कमेची देयके प्रलंबित आहेत? किती रक्कमेची देयके डीडीआरकडे पडुन आहेत? त्याची सविस्तर माहिती दिली जावी. व आम्हां सदस्यांच्या प्रभागात विकासकामे होतील कि नाही?

**श्री.एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता:–**याची पुर्ण यादी माझ्याकडे आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:–**सविस्तर यादी आपणाकडे आहे, आम्हांस तर दिली नाही ना?

**सदस्य श्री. सुरेश जाधव:–**व या निधीतुन हे लोक कोठे काम करणार आहेत?

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:–**ही सर्व कामे अगोदरच झालेली आहेत.

**श्री. एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता:–**आम्हांस दोन कोटी २० लाखाची आवश्यकता आहे व आमच्याकडे अगोदरचे आहेत १ कोटी ३० लाख. व या वर्षाचे १ कोटी १५ लाख आहेत. खेमानी नाल्याचा जो लेखाशिर्ष आहे त्यामधुन आम्ही ५ कोटी रुपये समायोजित करुन घेणार आहोत.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:–**सपना गार्डन येथे पाईपलाईनवर बुस्टर लावुन काम अर्धवट सोडले आहे त्यास एक वर्ष होवुन गेले बाकीचे काम प्रलंबित आहे ते कधी पूर्ण होणार?

**सदस्या श्रीमती आशा गुप्ता:–**माझ्या प्रभागामधील पाईपलाईनचे पाईप सडुन गेले आहेत, बदली केले जात नाहीत.

**सदस्य श्री. राजेश कंडारे:–**श्री. चार्लीजी हा प्रस्ताव पारीत करण्यासाठी पैसे आहेत का?

**श्री.एम.जी. गिरगांवकर, शहर अभियंता:–**अर्थसंकल्पाच्यावेळी महासभेने मंजुरी दिली आहे. व पाणी पुरवठा विभागाच्याच लेखाशिर्षातून दुस–या लेखाशिर्षात निधीचे समायोजन करायचे आहे.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:–**या प्रस्तावाचे काय झाले?

**महापालिका सचिव:–**प्रस्ताव पारीत केला आहे.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:–**पारीत केला?

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५ :—** पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागाकडील इतर लेखाशिर्षामधील तरतूदीमधून
अत्यावश्यक वाढीव तसेच अतिरिक्त खर्चासाठी वित्तीय वर्ष सन २०१२—१३
करीता अर्थसंकल्पीय तरतूदींचे पूर्नविनियोजन करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

पाणी पुरवठा व मलनि:स्सारण सारख्या अत्यावश्यक सेवेसाठी देखभाल दुरुस्ती अंतर्गत नित्याच्या व आवश्यक दुरुस्त्या, साहित्य खरेदी इ. खर्चासाठी निधीची तरतुद होणे गरजेचे आहे. तसेच मार्च २०१२ पर्यत मधील मंजुर कामांवरील अतिरीक्त खर्चाचे (Spill over) समायोजन होणे आवश्यक आहे.

सोबतच्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागाकडील इतर लेखाशिर्षामधील तरतुदी मधून अत्यावश्यक व वाढीव तसेच अतिरिक्त खर्चासाठी पुर्नविनियोजन प्रस्तावित करण्यात आले आहे. चालु अर्थिक वर्षात खेमाणी नाला भुयारी गटार योजना लेखा शिर्ष भाग २ क ७ नुयार एकुण रू. १० कोटी खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. परंतु अद्यापी या कामाची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी प्राप्त होवून निविदा प्रक्रिया व्हावयाची आहे. त्यामुळे या योजनेवरील रू. १० कोटी एवढया प्रस्तावित निधीतून रू. ५ कोटी तरतुद शिल्लक ठेवून उर्वरीत रू. ५ कोटी एवढा निधी वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात आला आहे तसेच लेखाशिर्ष भाग २ ब ९ मधील फॉरेस्ट नाका ते १७ सेक्शन पर्यंत नविन पाईप लाईन व इतर लेखाशिर्षतून संबधित लेखा शिर्षात वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार एकुण रू. ७.७५कोटी रूपयाचे पुर्नेविनियोजन करणे आवश्यक आहे सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

तरी पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागा अंतर्गत पुर्नविनियोजन प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करीत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३० **दिनांक:—** **६/१२/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना कुमार आयलानी

ही स्थायी समिती सोबत जोडलेल्या यादीत अंतर्भुत केलेल्या पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागाकडील इतर लेखाशिर्षामधील तरतूदीमधून अत्यावश्यक वाढीव तसेच अतिरिक्त खर्चासाठी वित्तीय वर्ष सन २०१२—१३ करीता अर्थसंकल्पीय तरतूदींचे पूर्नविनियोजन करणेस मान्यता देत आहे.

सदरहु यादी या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक
औषधे पुरविणे कामी बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

———————————————————————————————————————————————

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—**हा विषय काय आहे ते तर सांगा. डेंग्युविषयी कोणती औषधे खरेदी केली आहेत.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण:—**श्री. केणी, हा प्रस्ताव काय आहे ते जरा समजावून सांगा.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**शहरातील नागरीकांचे आरोग्य आबाधित ठेवण्यासाठी ही जंतुनाशक औषधे खरेदी करणे आवश्यक होते.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—**शहरात मध्यंतरी सर्वत्र डेंग्युची साथ पसरली होती.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**तेच, शहरात डेंग्युची साथ पसरली होती, त्यामुळे जेथे जेथे दुर्गंधी आहे तेथे तसेच शहरामध्ये जेथे जेथे सार्वजनिक कार्यक्रम असतात तेथील वातावरण अल्हाददायक ठेवण्यासाठी जंतुनाशक औषधांची फवारणी केली जाते. वातावरण निर्मीतीसाठी सुगंधीत मायक्रोफाईन पावडरची फवारणी केली जाते.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**आपण जी पावडर फवारणी करता तिला सुगंध असतो का? आणि ती कुठे कुठे मारली जाते ते सांगा? आता कोठे मारली असेल ते सांगा, तेथे जावुन मी पाहुन येतो तिला सुगंध आहे का?

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**वेगवेगळया प्रकारची किटकनाशके, जंतुनाशक औषधे व पावडर असते. जर्मिटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंट पावडर, मायक्रो फाईन पावडर इत्यादी सुगंधीत पावडर वातावरण निर्मितीसाठी वापरल्या जातात.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**ही सर्व नावे फक्त बिलावरच असतात. ३०—३० लाखाच्या ज्या पावडर आपण सांगता त्या फक्त पेपरवरच असतात. प्रभागामध्ये जो माल पाठविला जातो तो मी घेवुन येतो. त्यामध्ये कोठे सुगंधीत पावडर आहे ते मला दाखवा. हे लोक सुगंधीत पावडर वापरतच नाहीत आणि जे काही ऑईल येते ते कोठेतरी गायब होवुन जाते.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—**त्यामुळेच तर शहरामध्ये रोगराई पसरत आहे.

**सदस्य डॉ. श्री. महेश गावडे:—**आमच्या येथे जंतुनाशकांची फवारणी झाल्यानंतर डेंग्युचे दोन रुग्ण आढळुन आले आहेत.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**जें औषध फवारणीसाठी पाठविले जाते तेच औषध वापरले जाते का?

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**डायल्युशसनचे प्रमाण कमी, जास्त होवु शकते. डायल्युशसनचे प्रमाण कमी जास्त झाल्याने औषधांचा प्रभाव कमी—जास्त होत असतो.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—**माझ्या प्रभागात जंतुनाशक औषधे बरोबर येतात.

**सदस्य डॉ. श्री. महेश गावडे:—**माझ्या प्रभागात जंतुनाशक औषधांची फवारणी झाल्यानंतरही डेंग्युचे दोन रुग्ण आढळुन आले आहेत.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—**श्री. केणी, जेव्हा नविन औषधे येतील तेव्हा ती डॉ. गावडे साहेबांना दाखवा.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**जंतुनाशक फवारणीचा काही उपयोगच होत नाही.

**सदस्या श्रीमती नेहा भोईर:—**माझ्या प्रभागात फवारणीचा टॅंकर किती दिवसात येईल?

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:**—१९ दिवसानंतर येईल.

**काही सदस्य :**—पास—पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :**—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :**—उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक औषधे पुरविणे कामी बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

सार्वजनिक आरोग्य विभागास उल्हासनगर शहराच्या स्वच्छता, साफसफाईचे कामासाठी व नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने किटकनाशक/जंतुनाशक/ औषधे दरवर्षी खरेदी करणे आवश्यक असते. त्यानुसार मा. आयुक्त सो यांच्या दि. १/८/२०१२ रोजी अन्वये मान्यता घेऊन सदर औषधे खरेदीची निविदा सुचना १) दै. पुढारी व २) दै. वार्ताहार या दैनिक वृत्तपत्रात दि. ५/८/२०१२ रोजी प्रसिध्द करून दिनांक ३०/८/२०१२ रोजी पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्राप्त चार निविदा दिनांक १/९/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता उप—आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर उघडण्यात आल्या. प्राप्त चार निविदाकारांनी लिफाफा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपात्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचा निविदेचा दुसरा लिफाफा उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या सदर जंतुनाशक/किटकनाशक/अळीनाशक /डासनाशक औषधे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | औषधांचे नांव व त्यांचा तपशील | परिमाण | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. डॉल्फीन | मे. मित्र हर्बल | मे. रविराज | मे. रॉयल | |
| १ | काळे फिनाईल, शौचालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये), ग्रेड—१ | ७००० लिटर | १७० | २२५ | ७५ | ९२ | ५२५००० |
| २ | बॅक्टोक्लीन, व्हाईट क्लीनर, शौचालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक ) | ७००० लिटर | ७९ | ९२ | ८० | ८९ | ५५३००० |
| ३ | साईथ्रिऑन ५० % किटकनाशक, | ५०० लिटर | ८७८ | ८८७ | ९०० | ८९१ | ४३९००० |
| ४ | जर्मिटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंट पावडर | ५००० किलो | ६१ | ६४ | ७२ | ६८ | ३०५००० |
| ५ | रोडेन्टीसाइड झिंक फोस्फाईड, ५०० ग्रॅम पॅकींग, उंदीरनाशक | १८० पॅकेट | | | | | |
| ६ | फिनाईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता—यासाठी | १००० किलो | ३९० | २३५ | २०५ | २१५ | २०५००० |
| ७ | बायोकल्चर पावडर, कच—याचे विघटन करण्यासाठी | ५००० किलो | ९४ | ८४ | ८८ | ९२ | ४२०००० |
| ८ | मायक्रो फाईन पावडर, सुगंधित वातावरण निर्मिती करण्यासाठी | ५००० किलो | १८० | १४८ | १३५ | १५० | ६७५००० |
| ९ | बॅक्टो फ्री, किटकनाशक, दुर्गंधीनाशक | ७५०० | ९८ | ९६ | १०२ | ९९ | ७२०००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किलो | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | क्लीनो व्हाईट, दुर्गंधीनाशक, डब्युएचओ, स्पेसिफीकेशन प्रमाणे | ४००० लिटर | २०० | १९९ | **१७५** | १८५ | ७००००० |
| ११ | फाईट आउट, अळीनाशक, हर्बल | ५०० लिटर | १५०० | १३०० | **१०५०** | १२५० | ५२५००० |
| १२ | वेक्टोबॅक, एएस १२०० अळीनाशक, डब्युएचओ प्रमाणीत, एनविबिडीसी प्रोग्राम | ५०० लिटर | १४९० | १५५० | १६०० | **१४५०** | ७२५००० |
| १३ | सॅफीनोथ्रिल, ५ %ईसी, डास नाशक डब्युएचओ प्रमाणीत, एनविबिडीसी प्रोग्राम | ३०० लिटर | १३८९ | १३५० | १४५० | **१२६०** | ३७८००० |
| १४ | सेप्टोक्लीअर, बोलस, (टॅबलेट्स), ४० ग्रॅम, शौचालयांचे सेप्टीक टॅकसाठी | १२०० टॅबलेट्स | ३२९ | ३१५ | ३२५ | **३००** | ३६०००० |
| १५ | फ्रेश ऑल डिलक्स, ७५ ग्रॅम, कार्यालयांसाठी | ५०० नग | **८२** | ९४ | ८८ | ९० | ४१००० |
| १६ | वेस्ट ट्रिट पावडर, ( सिलीकेट पावडर, झेडबेस पावडर, एन्टीसेप्टीक पावडर, मिनरल पावडर (दुर्गंधीनाशक व रोगजंतूंचा अटकाव करण्यासाठी)) | ५००० किलो | ८० | **७५** | ८५ | ७९ | ३७५००० |
| १७ | पिप बेट, २% ग्रन्युअल्स, माशानाशक | ८०० किलो | **८२०** | ८८० | ८७० | ८५० | ६५६००० |
| १८ | हॅड्रोक्लोरीक ॲसीड, मुतारी, शौचालय सफाईसाठी | ३००० लिटर | ४० | ३४ | **२८** | ३२ | ८४००० |
| | | | | | | | ७६८८००० |

उक्त सादर केलेल्या दरांनुसार नमूद औषधे खरेदि करण्यास रु. ७६,८६,०००/— (शहात्तर लाख शहाऐंशी हजार मात्र.) खर्च येणार आहे. उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. २,३,४,१५ व १७  या करीता मे. डॉल्फीन सेल्स, कल्याण यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. अ.क्र. ७, ९ व १६ या करीता मे. मित्र हर्बल प्रा.लि. कंपनी डोंबिवली यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत, अ.क्र. तर अ.क्र. १,६,८,१०,११ व १८ या करीता मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व अ.क्र. १२,१३ व १४ याकरीता मे. रॉयल इंटरप्राईझेस, मुंबई यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. तर अक्र. ५ रोडेन्टीसाइडसाठी कोणत्याही निविदाकाराने दर सादर कलेले नाहीत.

उक्त सादर केलेल्या न्युनतम दरांची वाटाघाटी करण्यासाठी निविदाकारांकडुन न्युनतम दर सादर केलेल्या जंतुनाशक औषधे दरांबाबत जा. क्र.उमपा/उप—आ/आवि/२०१ दिनांक ३/०९/२०१२ रोजी अन्वये निविदाकारांना वाटाघाटीसाठी पत्र देऊन त्यांच्याशी प्राप्त झालेले न्युनतम दरांनुसार वाटाघाटी करण्यात आल्या आहेत. व त्यानुसार संबंधीत न्युनतम दराच्या निविदाकारांनी लेखी पत्र दिलेली आहेत. वाटाघाटी दरम्यान संबधीत निविदाकारांनी इतर नगरपालिकेत/महापालीकेत पुरवठा केलेल्या दरांची प्रती व उत्पादक कंपन्याची दरांच्या छायांकीत प्रती सादर केलेल्या आहेत. त्यानुसार प्राप्त दर वाजवी आहेत. आरोग्य विभागाने प्राप्त निविदा दराबाबत दिलेल्या अभिप्रायाशी इतर विभाग असहमत असल्यास त्यांचे देखील स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे. मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या आदेशा नुसार काळे फिनाइल दरांबाबत पुनश्च वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार सदर पुरवठादाराने काळे फिनाईल रु.५९ प्रति लिटरचे दर रु. ५१.४५ प्रति लिटर करुन त्या दराने पुरवठा करण्याचे मान्य केले. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | औषधांचे नांव व त्यांचा तपशील | परिमाण | सन २०११—१२ चे प्राप्त दर | निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | | वाटाघाटी अंती प्राप्त दर | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. डॉल्फीन | मे. मित्र हर्बल | मे. रविराज | मे. रॉयल | | |
| १ | काळे फिनाईल, शौचालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये), ग्रेड—१ | ७००० लिटर | ४९ | | | **७५** | | **५१.४५** | ३६०१५० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | बॅक्टोक्लीन, व्हाईट क्लीनर, शौचालयांसाठी (२५ लि. प्लास्टीक | ७००० लिटर | ——— | ७९ | | | | ६३ | ४४१००० |
| ३ | साईथ्रिऑन ५० % किटकनाशक, | ५०० लिटर | ——— | ८७८ | | | | ८७५ | ४३७५०० |
| ४ | जर्मिटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टंट पावडर | ५००० किलो | ५८ | ६१ | | | | ६० | ३०००००० |
| ५ | रोडेन्टीसाइड झिंक फोस्फाईड, ५०० ग्रॅम पॅकींग, उंदीरनाशक | १८० पॅकेट | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | | निरंक |
| ६ | फिनाईल (डांबर) गोळया, जंतुनाशक, मुता—यासाठी | १००० किलो | ——— | | | २०५ | | १६० | १६००००० |
| ७ | बायोकल्चर पावडर, कच—याचे विघटन करण्यासाठी | ५००० किलो | ७९ | | ८४ | | | ८२ | ४१००००० |
| ८ | मायक्रो फाईन पावडर, सुगंधित वातावरण निर्मिती करण्यासाठी | ५००० किलो | ११२ | | | १३५ | | ११६ | ५८००००० |
| ९ | बॅक्टो फ्री, किटकनाशक, दुर्गंधीनाशक | ७५०० किलो | ——— | | ९६ | | | ९२ | ६९००००० |
| १० | क्लीनो व्हाईट, दुर्गंधीनाशक, डब्युएचओ, स्पेसिफीकेशन प्रमाणे | ४००० लिटर | १०९ | | | १७५ | | १२० | ४८००००० |
| ११ | फाईट आउट, अळीनाशक, हर्बल | ५०० लिटर | ——— | | | १०५० | | ९०५ | ४५२५०० |
| १२ | वेक्टोबॅक, एएस १२०० अळीनाशक, डब्युएचओ प्रमाणीत, एनविबिडीसी प्रोग्राम | ५०० लिटर | ——— | | | | १४५० | १४४२.५० | ७२११२५० |
| १३ | सॅफीनोथ्रिल, ५ % ईसी, डास नाशक डब्युएचओ प्रमाणीत, एनविबिडीसी प्रोग्राम | ३०० लिटर | १२६० | | | | १२६० | १२५४.५० | ३७६३५० |
| १४ | सेप्टोक्लीअर, बोलस, (टॅबलेट्स), ४० ग्रॅम, शौचालयांचे सेप्टीक टॅकसाठी | १२०० टॅबलेट्स | ——— | | | | ३०० | ३०० | ३६०००० |
| १५ | फ्रेश ऑल डिलक्स, ७५ ग्रॅम, कार्यालयासाठी | ५०० नग | ७७ | ८२ | | | | ७८ | ३९००० |
| १६ | वेस्ट ट्रिट पावडर, ( सिलीकेट पावडर, झेडबेस पावडर, एन्टीसेप्टीक पावडर, मिनरल पावडर (दुर्गंधीनाशक व रोगजंतूंचा अटकाव करण्यासाठी)) | ५००० किलो | ६९ | | ७५ | | | ७३ | ३६५०००० |
| १७ | पिप बेट, २% ग्रन्युअल्स, माशानाशक | ८०० किलो | ६५० | ८२० | | | | ६९० | ५५२००० |
| १८ | हॅड्रोक्लोरीक ॲसीड, मुतारी, शौचालय सफाईसाठी | ३००० लिटर | ——— | | | २८ | | २७ | ८१००० |
| | | | | | | | | | ६८०५७५० |

उक्त वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार व नमुद केलेल्या परीमाणा नुसार जंतूनाशके औषधे खरेदीकरीता रू ६८,०५,७५०/— ( अडुसष्ट लाख पाच हजार सातशे पन्नास मात्र ) खर्च अपेक्षित आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त औषधांसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मे. डॉल्फीन सेल्स, कल्याण, मे. मित्र हर्बल प्रा. लि. कंपनी डोंबिवली, मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व मे. रॉयल इंटरप्राईझेस, मुंबई यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता जंतुनाशक/किटकनाश औषधांचे न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारांचे दर स्विकृत होऊन त्यांच्याशी संविदा करण्या करीता मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ३१** **दिनांकः— ६/१२/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— कु. जयश्री जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील स्वच्छता व साफसफाईचे प्रयोजनार्थ जंतुनाशक/किटकनाशक औषधे पुरविणे कामी प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

**विषय क्र. ७ :—** ॲन्टी रॅबिज व्हायल्स पुरविणे कामी मे. नमन इंटरप्राईझेस या न्यनुत्तम दराचे
निविदाकराशी संविदेस मान्यता देणे

————————————————————————————————————————————

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—**ठेकेदार वेगवेगळे आहेत की एकच आहे.

**महापालिका सचिव:—**एकच आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७ :—** ॲन्टी रॅबिज व्हायल्स पुरविणे कामी मे. नमन इंटरप्राईझेस या न्यनुत्तम दराचे निविदाकराशी संविदेस मान्यता देणे

**प्रस्तावना**

वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता आवश्यक ॲन्टी रेबिज व्हॅक्सीन खरेदी करण्याकरिता मा. आयुक्त यांचे मजुरीनुंसार निविदा सुचना अनुक्रमे दै. लोकनायक व दै. नगरन्युज यां वर्तमानपत्रात दि. २०/०७/२०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. विहित कालावधीत ३ निविदाकारांनी निविदा मुल्य अदा करुन निविदा खरेदी केल्या होत्या. तसेच विहित कालावधीत ३ निविदाकारांनी निविदा सादर केल्या होत्या. तरी प्राप्त निविदा दि. १२/०९/२०१२ रोजी उप — आयुक्त (वै.आ.वि.) यांचे दालनात उप — आयुक्त (वै.आ.वि.), वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक तसेच निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या. सदर तिन्हीही निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तींची पुर्तता केलेली आहे. तरी सदर निविदेत खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र. | तपशिल | आवश्यक परिमाण | मागील वर्षीचे दर | निविदाकाराचे नाव प्राप्त दर | | | वाटाघाटीनं तरचे प्राप्त दर | एकूण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. नमन इंटरप्राईझेस | मे. आर.एस. इंटरप्राईझेस | मे. उषा फार्मासुटीकल्स | | |
| १ | Inj. Anti Rabies Vaccine I M | ६८०० व्हॉयल्स | रु २९०/— प्रति व्हॉयल्स | **रु ३२६/— प्रति व्हॉयल्स** | रु ३७५/— प्रति व्हॉयल्स | रु ३५७/— प्रति व्हॉयल्स | रु २९०/— प्रति व्हॉयल्स | १९,७२,००० |

| | |
|---|---|
| एकूण | १९,७२,००० |

सदरचे प्राप्त दर हे मागील वर्षीच्या दरापेक्षा जास्त असल्याने सदर निविदाकार यांचेशी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी प्राप्त दराबाबत वाटाघाटी दि. १३/९/२०१२ रोजी केल्या असून मे. नमन इंटरप्राईझेस यांनी वाटाघाटी अंती रु २९०/– प्रति व्हायल्स दर सादर केले आहेत. तरी सदर दर हे मागील वर्षीएवढे व एम.आर.पी पेक्षा कमी आहेत. तरी सदर निविदाकारांचे दर स्विकृत करुन त्यांना वरील एकुण ६८०० व्हायल्स पुरवठा करण्याबाबत आदेशित करण्याचे प्रस्तावित करणेत येते. सदर व्हॉयल्स खरेदी करणेकरिता एकुण रु १९,७२,०००/– (रुपये एकोणीस लाख बाहत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अंदाजपत्रक सन २०१२ – १३ मधील कुत्रांच्या दंशावर औषधोपचार खर्च यातील रु ३५,००,००० यातून करण्याचे प्रस्तावित करणेत येते. सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीची मान्यता मिळावी, ही विनंती.

मान्यतेस्तव सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३२ **दिनांक:–**

**६/१२/२०१२**

सुचकाचे नाव :– श्रीमती बेबी भोईर

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती ज्योती गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ॲन्टी रॅबिज व्हायल्स पुरविणे कामी मे. नमन इंटरप्राईझेस या न्युनत्तम दराचे निविदाकराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ८ :–** डम्पिंग ग्राउंडवरील घनकचरा सपाटीकरणासाठी आवश्यक मशिनरी भाडेतत्वावर उपलब्ध करून धेणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि., नवी मुंबई यांचेशी संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:–**हा विषय काय आहे, माहिती दिली जावी.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :–**ज्या ठेकेदाराला येथुन हटवायचे आहे, त्यालाच काम देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आला आहे.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:–**शहरात कचरा नाही आहे का? व हा प्रस्ताव कोणत्या ठेकेदाराविषयी आहे.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**ॲन्थोनीचा प्रस्ताव आहे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:–**हे काम कुणाच्या देखरेखीत होईल?

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षकः—**स्वच्छता निरिक्षकाच्या देखरेखीत हे काम होईल.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**कच—याचे सपाटीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. सपाटीकरण केले नाही तर शहरामध्ये रोगराई वाढु शकते. त्यासाठी कच—याचे सपाटीकरण करणे आवश्यक आहे. खरे तर ॲन्थोनीला हे काम देताच कामा नये. त्यास आपल्याला या महापालिकेतुन हटवायचे आहे. आता त्यास हे काम दिले तर महासभेत त्याच्या विरोधात आपण काय बोलणार?

**सदस्या श्रीमती ज्योती कालानीः—**शहरातील कचरा तर उचलला गेला पाहिजे ना?.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**कच—याचे सपाटीकरण होत आहे की नाही हे काम कोणता अधिकारी पाहत आहे, किती तास काम होत आहे?

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**आमचे स्वच्छता निरिक्षक आहेत, मुकादम आहेत आणि त्यांच्याबरोबर दोन—दोन, तीन—तीन कामगारही आहेत.

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**या प्रस्तावास आपण आता येथे मंजुरी देवु या. पण पुढील महासभेत ॲन्थोनी विषयीचा जेव्हा विषय येईल तेव्हा त्याबाबत आपण तेथे सविस्तर चर्चा करु या.

**काही सदस्य :—**पास—पास......
**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८ :—**डंम्पिंग ग्राउंडवरील घनकचरा सपाटीकरणासाठी आवश्यक मशिनरी भाडेतत्वावर
उपलब्ध करून धेणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा.लि.,
नवी मुंबई यांचेशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक २२/६/२०१२ रोजीच्या मान्यतेनुसार, डंपिंग ग्राउंडवरील घनकचरा सपाटीकरणासाठी आवश्यक मशिनरी भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी अल्पमुदत निविदा सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

डंपिंग ग्राउंडवरील कचरा सपाटीकरणाच्या कामाच्या प्राप्त दोन दस्ताऐवज तपासणी करुन निविदा समिती सदस्यांनी लिफाफा क्र. २ उघडण्याच्या सुचना दिल्या त्यानुसार प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे. डंपिंग ग्राउंडवरील कचरा सपाटीकरणासाठी आवश्यक मशनरीचा दर खालील प्रमाणे आहे.

| ैतण छवण | क्मेबतपचजपवद | डध्े द्रजवदल त्ंजम चमत ीवनत ;त्ैण्द्ध | डध्े छंदकपदप त्ंजम चमत ीवनत ;त्ैण्द्ध |
|---|---|---|---|
| **१ण०** | **ठनससकव्रमत** | | |
| १ण१ | ठम्डस् ठनससकव्रमत क द्द ८० वत मुनपअंसमदज | १५०० | २००० |

| | | | |
|---|---|---|---|
| १०२ | ठम्डस् ठनससकव्रमत क दृ १२० वत मुनपअंसमदज | २०९५ | २४०० |
| **२००** | **च्वबसंपद दृ डंबीपदम** | | |
| २०१ | च्वबसंपद म्। १०० वत मुनपअंसमदज दृ ;पजी इनबामजद्ध | १३९५ | १५८० |
| २०२ | च्वबसंपद म्। २०० वत मुनपअंसमदज दृ ;पजी इनबामजद्ध | १७५० | २१०० |
| **३००** | **म्गबंअंजवत स्वंकमत** | | |
| ३०१ | म्गबंअंजवत स्वंकमत ;श्रब्ठ ३क्द्ध वत मुनपअंसमदज ूपजी तिवदज इनबामज ंदक इंबा ीवम | ९१५ | १२०० |
| ४०० | **व्द बंसस ब्वदजतंबजवत ेंसस चतवअपकम** | | |
| ४०१ | ॅजमत जंदामत वित पितम मगजपदहनपेीपदह **;त्ंजम चमत जतपचद्ध** | ७०० | १००० |
| ४०२ | ैपच सवंकमतए भ्ववा सवंकमत ूपजी ब्वदजंपदमतण **;त्ंजम चमत कंलद्ध** | २८०० | १५०० |

पात्र निविदाकारांमध्ये उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे स्किप लोडर/ हुक लोडरचे दर वगळता मे. अॅन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. यांनी सादर केलेले दर न्युनतम असल्याने जा.क्र. उमपा/आवि/उप–आ/१६८/१२ दिनांक ०३/०८/२०१२ रोजी अन्वये वाटाघाटासाठी उपायुक्त (आरोग्य) यांच्या कार्यलयात उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार उपायुक्त (आरोग्य) यांनी दिनांक १३/८/२०१२ रोजी वाटाघाटी केलेल्या आहेत. सदर वाटाघाटीअंती मे. अॅन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. नवी मुंबई यांनी सादर केलेले दर योग्य असून त्यापेक्षा कमी दर करता येणे शक्य नसल्याचे नमुद करुन त्याप्रमाणे लेखी पत्र दिलेले आहे.

डंपिंग ग्राउंडवर घनकचरा सपाटीकरणासाठी उक्त नमुद ऑन कॉल मशनरी शिवाय प्रामुख्याने डोझर डी–८० व पोक्लेन इक्स २०० या मशिनरीची आवश्यकता आहे. सदरचे दर दि. २२/६/२०१२ रोजी मागविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार जास्त आहेत. मात्र पोक्लेन मशिनचे प्राप्त झालेले दर हे महाराष्ट्र जीवन प्राधीकरण सन २०११–१२ च्या दर पत्रकानुसार व बुल डोझरचे दर एम.आय.डी.सी. सन २००९–१० च्या दर पत्रकानुसार नुसार वाजवी आहेत. सदरच्या दोन्ही मशिन प्रति दिन किमान ६ तास चालल्यास प्राप्त न्युनतर दरा नुसार अंदाजीत खर्च खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

| **क्र.** | **तपशील** | **प्रति तास** | **एकूण दिवस** | **अपेक्षित रक्कम** |
|---|---|---|---|---|
| | बुल डोझर, डी–८० | १५०० | ३६५ | ३२,८५,०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ०/— |
| | पोक्लेन, इक्स २०० | १७५० | ३६५ | ३८,३२,५०<br>०/— |
| | एकूण | | | ७१,१७,५००<br>/— |

मात्र मा. आयुक्त सो. यांनी दिनांक २७/९/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार बुलडोझर व पोक्लेन मशिनच्या दर कमी करण्याबाबत ठेकदाराशी फेर वाटाघाटी करण्याबाबत आदेश दिले. त्यानुसार जा. क्र.उमपा/आवि/उप—आ/ २४२ दिनांक २७/९/२०१२ रोजी मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. ली. कंपनी यांना पुनश्च वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. त्यानुसार उपायुक्त (आरोग्य) यांच्या सोबत सदर दरांबाबत दिनांक २८/९/२०१२ रोजी वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी दरम्यान डिझेलचे भाव मोठया प्रमाणात वाढल्याने व मशनरींचा मेंटनंन्स कॉस्ट लक्षात घेता वाटाघाटी अंती दिलेल्या दरांपेक्षा कमी दर करणे शक्य नसल्याचे नमूद केले व त्याप्रमाणे लेखी पत्र दिलेले आहे. वाटाघाटी अंती सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| .क्र. | तपशील | प्रति तास दर (रुपये) | फेरवाटाघाटी अंती प्राप्त झालेल दर | एकूण दिवस(प्रति दिन किमान ६ तास) | अपेक्षित रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | बुल डोझर, डी—८० | १५०० | १४६९ | ३६५ | ३२,१७,११०/— |
| | पोक्लेन, इक्स २०० | १७५० | १७०० | ३६५ | ३७,२३,००० /— |
| | एकूण | | | | ६९,४०,११०/— |

सदरचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रक सन २०१२—२०१३ च्या भाग—१ सी—१(१), कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकात रुपये ६,०९,००,०००/— तरतुद करण्यात आली आहे, सदरचा खर्च त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. मा. आयुक्त सो. यांनी क्र. ५९१ दिनांक १६/७/२०१२ रोजीच्या परीपत्रकानुसार सन २०११—१२ रोजी केलेल्या कामाचे प्रलंबित असणारे देयक व चालु अर्थिक वर्षातील देयके वजा करता रुपये ५,१३,१८,५६५/— रुपये निधी शिल्लक आहे. सदरचा खर्च त्यातून भागविता येईल.

तरी न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि., नवी मुंबई यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ३३** **दिनांक:— ६/१२/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डंम्पिंग ग्राउंडवरील घनकचरा सपाटीकरणासाठी आवश्यक मशिनरी भाडेतत्वावर उपलब्ध करून घेणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा.लि., नवी मुंबई यांचेशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

**विषय क्र. ९ :—** श्री. भास्कर वैद्य पे ॲण्ड पार्कसाठी नियुक्त अभिकर्ता यांना सीएचएम कॉलेजच्या भिंतीजवळ, निक्कु प्लाझा अपार्टमेंट समोर, उल्हासनगर—३ येथिल जागेऐवजी शांतीनगर पेट्रोल पंपासमोरील जागा ५ वर्षातील उर्वरीत कालावधीसाठी पे ॲण्ड पार्ककामी उपलब्ध करुन देणे विषयी धोरणात्मक निर्णय घेणे.

———————————————————————————————————————————

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u>**त्यांच्याकडुन महापालिकेला किती भाडे मिळते?

**<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—</u>**शातींनगर येथिल पेट्रोल पंप तर बंद झाला आहे ना?

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>**पेट्रोल पंपाच्या समोरील बाजुस पे ॲण्ड पार्कसाठी जागा दयायची आहे.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u>**त्यांच्याकडुन प्रतिमहिना भाडे किती येते?

**<u>श्री. राजेश घनघाव, लिपिक, मालमत्ता विभाग:—</u>**प्रतिमहिना चार हजार रुपये.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—</u>**त्यांना या अगोदर ५ वर्षासाठी परवानगी दिलेली आहे आणि एक वर्षाचा कालावधी बाकी आहे. एक वर्षानंतर पे ॲण्ड पार्क बंद केला जावा. अगोदर जी जागा दिली होती ती सुध्दा १०० फुट रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होत होती.

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>**सीएचएम कॉलेज येथे त्यास पे ॲण्ड पार्कसाठी जी जागा देण्यात आली होती ती जागा स्कॉयवाकच्या कामामुळे बाधित झाल्याने तेथिल पे ॲण्ड पार्क बंद करण्यात आले आहे परंतु त्याच्याकडुन घेतलेली अनामत रक्कम आपणाकडे पडुन आहे का?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……
**<u>सभापती, श्री. रमेश चव्हाण :—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ९ :—** श्री. भास्कर वैद्य पे ॲण्ड पार्कसाठी नियुक्त अभिकर्ता यांना सीएचएम कॉलेजच्या भिंतीजवळ, निक्कु प्लाझा अपार्टमेंट समोर, उल्हासनगर—३ येथिल जागेऐवजी शांतीनगर पेट्रोल पंपासमोरील जागा ५ वर्षातील उर्वरीत कालावधीसाठी पे ॲण्ड पार्ककामी उपलब्ध करुन देणे विषयी धोरणात्मक निर्णय घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

अर्जदार श्री. भास्कर वैद्य यांनी सी.एच.एम. कॉलेजच्या भिंतीजवळ निक्कु प्लाझा अपार्टमेंट समोर, उल्हासनगर—३ येथे स्कायवाकचे काम चालू असल्याने जागा बाधीत झाल्यामुळे त्या जागेऐवजी शांतीनगर पेट्रोल पंपासमोरील जागेत पर्यायी जागा मिळावी म्हणून विनंती केलेली आहे.

श्री. भास्कर वैद्य यांना स्थायी समिती ठराव क्र. १२६, दिनांक २७/२/२००९ नुसार ५ वर्षाच्या कराराने कार्यादेश उमपा/मालमत्ता/२८८, दिनांक १३/११/२००९ अन्वये चालविणेसाठी देण्यात आले होते.

सदर जागेवर सध्या स्कायवॉकचे काम चालु असल्याने जागा बाधित झाल्याचे निदर्शनास आणून दिलेले आहे. प्रस्तावित जागा ही १०० फुटाच्या रस्त्यालगत आहे असे नगररचना विभागाचे अभिप्राय आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने सदरची जागा स्कायवाकमुळे बाधित झाल्याने तेथे पार्किंग चालु ठेवणे योग्य नाही असा अभिप्राय दिलेला आहे.

उपरोक्त अभिप्राय विचारात घेता तसेच महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होवु नये या दृष्टीने कंत्राटदाराचे जितके क्षेत्र होते तितकेच क्षेत्र प्रस्तुत ठिकाणी उर्वरित कालावधीसाठी देणे उचित वाटते, मात्र सदरची जागा १०० फुटाच्या रोडमध्ये असल्याने प्रस्तावाबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३४

**दिनांक:—६/१२/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना कुमार आयलानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. भास्कर वैद्य पे ॲण्ड पार्कसाठी नियुक्त अभिकर्ता यांना सीएचएम कॉलेजच्या भिंतीजवळ, निक्कु प्लाझा अपार्टमेंट समोर, उल्हासनगर—३ येथिल जागेऐवजी शांतीनगर पेट्रोल पंपासमोरील जागा ५ वर्षातील उर्वरीत कालावधीसाठी पे ॲण्ड पार्ककामी उपलब्ध करुन देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

**विषय क्र. १० :—** विद्युत विभागांअर्तगतच्या सात विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

————————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. रमेश चव्हाण :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १० :—** विद्युत विभागांअर्तगतच्या सात विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहीती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( ड ) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजुर निवीदा रक्कम | कराराचा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उल्हासनगर – ५, येथील नेताजी चौक जवळील अग्निशामक दल (ऑफिसचे) विदयुतिकरण करण्यासाठी | ५,५०,०००/– | १०/०९/२०१२ | मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| २ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं ४ आणि ५ मध्ये बसवलेल्या पथ दिव्यांची नीगा व दुरुसती करण्या करिता. | ८,७५,०००/– | ०५/१०/२०१२ | मे.जनसेवा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| ३ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं १, मध्ये बसवलेल्या पथ दिव्यांची नीगा व दुरुसती करण्या करिता. | ८,५०,०००/– | ०८/१०/२०१२ | मे. आशा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| ४ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं २, मध्ये बसवलेल्या पथ दिव्यांची नीगा व दुरुसती करण्या करिता. | ८,६५,०००/– | ०८/१०/२०१२ | मे.रेणुकामाता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| ५ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं ३, मध्ये बसवलेल्या पथ दिव्यांची नीगा व दुरुसती करण्या करिता. | ९,१०,०००/– | ०८/१०/२०१२ | मे.जकनुश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| ६ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं ४, मध्ये बसवलेल्या पथ दिव्यांची नीगा व दुरुसती करण्या करिता. | ८,९०,०००/– | ०८/१०/२०१२ | मे.स्वराज मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे. |
| ७ | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं ५, मध्ये बसवलेल्या पथ दिव्यांची नीगा व दुरुसती करण्या करिता. | ८,८०,०००/– | ०८/१०/२०१२ | मे.सागर मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर जि. ठाणे. |

तरी सदरची माहीती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३६ **दिनांक:–** ६/१२/२०१२

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मिना कुमार आयलानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विद्युत विभागांअर्तगतच्या सात विविध कामांच्या सविंदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :– प्रस्तावाची सूचना**

दिनांक २९/५/२०१२ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. ४ मध्ये काहीही अंतर्भुत

असले तरीही महापालिका पदाधिका—यांना वाढीव मानधन भत्ता, अतिथी
भत्ता, बैठक
भत्ता देयक दिनांक १/४/२०१२ पासून किंवा पदाधिका—यांनी
पदभारधारण केलेच्या
दिनांकापासून प्रशासनाने अदा करण्याविषयीचा स्थायी समिती सदस्य श्री.
रामचंद्र
पारवानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

————————————————————————————————————————————

**<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—</u>**महापालिकेकडे पैसे नाहीत, महापालिकेची आर्थिक स्थिती खराब आहे अशा परिस्थितीत वाहनभत्ता आणि इतर भत्ते वाढुन देणे बरोबर नाही.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>**शासनाकडुन मंजुरी आलेली नाही ती येवु दया, ती आल्यानंतर देवु या.

**<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—</u>**या अगोदर शासन मंजुरीच्या अगोदरच वाहनभत्ता व इतर भत्ते अदा करण्यात आले आहेत.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>**त्या ठरावामध्ये काही अटी घातलेल्या आहेत, त्या काय आहेत ते पहा जरा.

**<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—</u>**सर्व सभापतींना महापालिकेकडुन वाहनचालकासह वाहने पुरविली तर त्यास किती खर्च येईल? याचा अंदाज केला आहे का?

**<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—</u>**महापालिकेकडे पैसे नाहीत. तरीही वाहनभत्ता वाढविण्याबाबत बोलत आहात. अधिका—यांनी सांगावे की त्या ठरावामध्ये काय अटी घालण्यात आलेल्या आहेत? ठराव शासनाकडुन मंजुर होवुन आला तर आम्ही देवु.

**<u>श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक:—</u>**ठराव करुन शासनाकडे पाठवु. शासनाकडुन मंजुरी आल्यानंतरच त्याप्रमाणे भत्ते अदा केले पाहिजेत.

**<u>महापालिका सचिव:—</u>**याबाबत स्थायी समितीमध्ये व महासभेत अगोदरच ठराव झालेला आहे. त्या ठरावास अधिग्रहीत करुन वाढीव भत्ते अदा करणेकामी हे ठराव पारीत करु इच्छितात.

**<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—</u>**तसे करु शकतात का?

**<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—</u>**तर मग आम्हां सर्व सभापतींना महापालिकेची वाहने दया. १९९७ मध्ये जेव्हा आम्ही सभापती झालो होतो तेव्हा तत्कालीन आयुक्त यांनी पंधरा—पंधरा हजार रुपये वाहनभत्ता देणे सुरु केले होते. त्यानंतर जे सभापती झाले होते त्यांना वाहनभत्ता मिळाला नव्हता. परंतु नंतर तो आम्ही शासनाकडुन मंजुर करुन आणला व त्यानुसार त्यांनाही आम्ही वाहनभत्ता दिला होता.

**<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—</u>**महापालिकेकडे पैसेच नाहीत तुम्हांला वाढीव.

**<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—</u>**पैसे आहेत की नाही ते महापालिका पाहिल.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......
**<u>सभापती, श्री. रमेश चव्हाण :—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ११ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

दिनांक २९/५/२०१२ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. ४ मध्ये
काहीही अंतर्भुत
असले तरीही महापालिका पदाधिका—यांना वाहन भत्ता, अतिथी
भत्ता,
बैठक भत्ता देयक दिनांक १/४/२०१२ पासून किंवा
पदाधिका—यांनी पदभारधारण

केलेच्या दिनांकापासून प्रशासनाने अदा करण्याविषयीचा स्थायी समिती सदस्य श्री.

रामचंद्र पारवानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

स्थायी समिती ठराव क्र. ४, दिनांक २९/५/२०१२ स्थायी समितीने महापालिकेच्या पदाधिका–यांना वाढीव वाहन भत्ता, अतिथी भत्ता, बैठक भत्ता शासन मंजूरी नंतर देणेबाबी केलेल्या ठरावामध्ये काही अंतर्भूत असल्यास दिनांक १/४/२०१२ पासून किंवा पदाधिका–यांनी पदधारण केल्याच्या दिवसापासून शासन मंजूरी प्रलंबित प्रशासनाने देयक अदा करण्यास मान्यता देणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३७ **दिनांक:–** **६/१२/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २९/५/२०१२ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. ४ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरीही महापालिका पदाधिका–यांना वाहन भत्ता, अतिथी भत्ता, बैठक भत्ता देयक दिनांक १/४/२०१२ पासून किंवा पदाधिका–यांनी पदभारधारण केलेच्या दिनांकापासून अदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.०८ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. रमेश चव्हाण यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.